सोलापूर तरुण भारत
Solapur Tarun Bharat
न मे कर्मफले स्पृहा
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर रविवार, दि. २९ जून २०२५ वर्ष - तिसरे अंक ८७ पाने : ८ किंमत रु. ६/-
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# जिल्ह्यातील ७७५ सरपंच पदाचं आरक्षण जाहीर

मुंबई : राज्यातील ग्रामीण भागात ७५५ ग्रामपंचायतींचे आरक्षण नुकतेच जाहीर करण्यात आले आहे. त्यामुळे २०११ च्या जनगणनेनुसार लोकसंख्याच्या दृष्टीने अनुसूचित जाती, जमाती, आणि ओबीसींचे आरक्षण जाहीर करण्यात आले असून त्यात महिलांना सरपंच पदासाठी नेतृत्व करण्याची संधी मिळणार आहे. येत्या चार महिन्यात स्थानिक स्वराज्य संस्थाचे निवडणूक होण्याची चर्चा आहे. जिल्हा परिषद, नगरपंचायत, आणि परिषदांच्या निवडणुका जाहीर होण्याची शक्यता असल्याने जिल्ह्यात ग्रामीण भागातील ७५५ ग्रामपंचायतींच्या सरपंचपदाचे आरक्षण जाहीर करण्यात आले. त्यामुळे राजकीय रणधुमाळीला वेग येणार आहे. ग्रामीण भागातील सरपंच पदासाठी अनुसूचित जातीतील १२७ सरपंच पद आरक्षित आहे.

त्यात महिलांसाठी ३८९ सरपंचपदासाठी जागा आहेत. व अनुसूचित जमातीसाठी ९९ सरपंच पदे आरक्षित असून यात ५१ महिलांचा समावेश असणार आहे. ओबीसी प्रवर्गातील २०४ सरपंच असून यात १०६ महिलांचा समावेश आहे. ३२५ सरपंच पद हे खुल्या प्रवर्गासाठी असून यात १६५ पदे हे महिलांसाठी राखीव आहे.या आरक्षण प्रक्रियेमुळे अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागासवर्ग, सर्वसाधारण व विशेषतः महिलांना नेतृत्वाची संधी मिळेल. महिलांसाठी एकूण सरपंच पदांपैकी किमान ५० टक्के आरक्षण लागू करण्यात आले आहे.

२०२५ - २०३० वर्षांकरीता हे आरक्षण असणार आहे. यात ५० टक्के महिला सरपंचांच्या आरक्षणाचाही समावेश आहे. ग्रामविकास व जलसंधारण विभाग आणि महाराष्ट्र शासन यांच्या अधिसूचनेनुसार ग्रामपंचायतींतील सरपंच पदांचे तालुकानिहाय व प्रवर्गनिहाय आरक्षण निश्चित करण्यात आले आहे. हा निर्णय मुंबई ग्रामपंचायत (सरपंच, उपसरपंच निवडणूक) नियम, १९६४ मधील नियम ३(अ), ३(ब) आणि ४ अनुसार घेण्यात आला आहे. यानुसार, जिल्हाधिकारी डॉ. विपिन इटनकर यांनी अधिसूचना जारी केली आहे.

# आयपीएस पराग जैन भारताचे नवे 'RAW' प्रमुख

प्रतिनिधी: भारताची परकीय गुप्तचर संस्था म्हणून जगभरातही ख्याती असलेल्या रिसर्च अँड नालिसिस विंग (Research and Analysis Wing (RAW) या संस्थेची नवी धुरा आयपीएस अधिकारी पराग जैन यांच्याकडे सोपवली गेली आहे. १९८९ बँचचे अधिकारी पराग जैन हे ३० जून २०२५ पासून नवा पदभार स्विकारणार आहेत.

रवी सिन्हा यांच्याबदली आता जैन यांची नियुक्ती करण्यात आली आहे. रवी सिन्हा यांचा कार्यकाळ ३० जूनला संपत आहे. त्यामुळे पुढील दोन वर्षांसाठी जैन यांची नियुक्ती सरकारने केली आहे. पराग जैन यांनी ऑपरेशन सिंदूर मध्ये बौद्धिक क्षमतेचा आधारे गुप्त माहिती गोळा केली होती. त्यांच्या या कामगिरीनंतर आता रॉ ची जबाबदारी त्यांच्या खांद्यावर आली आहे. त्यांनी देशाच्या विविध पातळीवरील सुरक्षा यंत्रणेत काम केले आहे. त्यांचा प्रदिर्घ अनुभव पाहता त्यांची या पदावर वर्णी लागली आहे.

सध्या पराग जैन हे एव्हिएशन रिसर्च सेंटरचे मुख्य आहेत. मोदी सरकारने त्यांची वर्णी लावली असल्याने सध्याच्या क्लिष्ट जागतिक वातावरणाचे आव्हान त्यांच्यासमोर उभे आहे. प्रसारमाध्यमांनी दिलेल्या माहितीनुसार, जैन यांनी कॅनडा मधील खलिस्तानी कारवायांवर नियंत्रण मिळविण्यासाठी प्रयत्न केले होते. तसेच जम्मू काश्मीर येथे कलम ३७० हटवण्यात आल्यानंतर परिस्थिती नियंत्रणात आणण्यास प्रयत्न केले होते.

# राज्यातील सर्वात मोठे स्क्रॅपिंग सेंटर एसटीच्या जागेवर उभारणार

मुंबई : एसटी विभागीतल जुनी वाहने स्क्रॅप करून त्याचे सुटे भाग पुन्हा वापरात येणार नाहीत, अशा पद्धतीने त्यांची विल्हेवाट लावणारे सर्वात मोठे स्क्रॅपिंग सेंटर (भंगार केंद्र) एसटी महामंडळ सार्वजनिक- खाजगी भागीदारी तत्त्वावर उभारणार असुन त्याद्वारे उत्पन्नाचा वेगळा स्त्रोत भविष्यात एसटीला निर्माण होईल! असा दावा परिवहन मंत्री व एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी केला. ते २७ जून रोजी या संदर्भात बोलावलेल्या एसटी महामंडळाच्या आढावा बैठकीमध्ये बोलत होते. या बैठकीला एसटी महामंडळाचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. माधव कुसेकर यांच्यासह सर्व खात्याचे प्रमुख उपस्थित होते.

केंद्र शासनाद्वारे २०२१ मध्ये रजिस्टर व्हेईकल स्क्रॅपिंग फॅसिलिटी नावाने १५ वर्षापेक्षा जुनी वाहने स्क्रॅप करून त्यांच्या सुट्ट्या भागाचा पुनर्वापर होणार नाही, अशा पद्धतीने त्यांची विल्हेवाट लावण्यात यावी. यासाठी नवे धोरण बनवण्यात आले. सदर धोरण महाराष्ट्र शासनाने सन. २०२३ मध्ये स्वीकारले असून ऑटोमोटिव्ह इंडस्ट्रि स्टँडर्ड च्या अटी शर्तीनुसार स्क्रॅपिंग केंद्राला मान्यता देण्याचे निश्चित केले आहे. त्यानुसार एसटी महामंडळाला देखील राज्यात ३ ठिकाणी अशा प्रकारचे स्क्रॅपिंग सेंटर उभारण्याची परवानगी मिळाली असून त्यापैकी पहिले आणि राज्यातील सर्वात मोठे स्क्रॅपिंग सेंटर छत्रपती संभाजी नगर जिल्ह्यातील खुलताबाद येथे असलेल्या एसटी महामंडळाच्या १०० एकर जागेवर सार्वजनिक- खाजगी भागीदारीतून उभारले जाणार आहे.

## उत्पन्न देणारा नवा स्त्रोत

मंत्री सरनाईक म्हणाले की, सध्या शासनाच्या परवानगी ने राज्यात ८ संस्था स्क्रॅपिंग केंद्र चालवत असून त्यांची वर्षाला किमान १००० वाहने स्क्रॅप करण्याची क्षमता आहे. अशा संस्थांना शासनाच्या वतीने परवानगी देणारे परिवहन खाते हे देखील माझ्या अखत्यारीत असल्यामुळे एसटीचा अध्यक्ष

आणि परि
प्रकल्पाला
वाहने शास्त्रो
विल्हेवाट
एसटीच्या म
एक नवा
होईल, अ

# अभिनेत्री निशा रावलचा पतीकडून झालेला छळ

मुंबई : अभिनेत्री निशा रावलने तिचा पूर्वाश्रमीचा पती आणि 'ये रिश्ता क्या कहलाता है' फेम अभिनेता करण मेहरा याच्यावर गंभीर आरोप केले आहेत. निशाच्या म्हणण्यानुसार, गरोदर असताना, अगदी मृत बाळ जन्माला आल्याच्या दुःखद प्रसंगातही करणने मारहाण केली.

एका मुलाखतीत निशा रावलने तिच्या आयुष्यातील एका अत्यंत कठीण प्रसंगाबद्दल सांगितले. ती पाच-सहा महिन्यांची गरोदर असताना तिचा गर्भपात झाला. गर्भातील बाळाच्या हृदयात तीन छिद्रे होती आणि डॉक्टरांनी ते फार काळ जगणार नाही असे सांगितले होते. तब्बल २० तास प्रसूती वेदना सहन करून तिने मृत बाळाला जन्म दिला. हा तिच्या आयुष्यातील अत्यंत नाजूक आणि दुःखद प्रसंग असतानाही, तिचा पती करण मेहराने तिला मारहाण केली, असा धक्कादायक खुलासा निशा रावलने केला आहे. या संपूर्ण काळात ती एकटीच रुग्णालयात गेली होती आणि तिच्यासोबत घरातील कोणीही नव्हते. निशा रावलने प्रसारमाध्यमांशी बोलताना करणच्या दुसऱ्या मुलीशी असलेल्या अफेअरबद्दलही सांगितले.

# तामिळनाडू पॅसेंजर ट्रेन रुळाहून घसरली, प्रवाशांमध्ये गोंधळ

चेन्नई: तामिळनाडूच्या रानीपेट जिल्ह्यात एक प्रवासी ट्रेन रुळावरून घसरली, त्यानंतर काही काळ गोंधळ उडाला.

जिल्ह्यातील चित्तेरी रेल्वे स्थानकावर अरक्कोनम-कटपाडी मेमू पॅसेंजर ट्रेन (६६०५७) रुळावरून घसरल्याची बातमी समोर आली आहे. शनिवारी पहाटे तामिळनाडूच्या रानीपेट जिल्ह्यातील चित्तेरी रेल्वे स्थानकावर लोको पायलटला असामान्य आवाज आल्याने आणि त्याने तातडीने ट्रेन थांबवल्याने संभाव्य दुर्घटना टळली.

सुरुवातीच्या अहवालांमध्ये रेल्वे रुळावरून घसरल्याचे दिसून आले होते, घटनास्थळावरील दृश्यांमध्ये ट्रॅकचा एक भाग स्पष्टपणे खराब झालेला दिसत होता. प्रत्यक्षदर्शींनी सांगितले की, चित्तेरी स्थानकावरून ट्रेन सुटल्यानंतर काही वेळातच मोठा आवाज ऐकू आला, ज्यामुळे पायलटला त्वरित प्रतिसाद मिळाला. घटनास्थळी असलेल्या एका वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्याने पुष्टी केली की कोणतीही दुखापत किंवा जीवितहानी झाली नाही.

मात्र यानंतर, दक्षिण रेल्वेने स्पष्टीकरण दिले आहे की कोणतेही डबे रुळावरून घसरलेले नाहीत. ही घटना चित्तेरी स्टेशनवरील यार्ड रोड १ लूप लाईनवर घडली - एक नियुक्त देखभाल सावधगिरीचे ठिकाण जिथे २० किमी प्रतितास वेग मर्यादा आधीच लागू होती.

## नेमके काय घडले?

रेल्वेच्या निवेदनानुसार, परिस्थितीची जाणीव असलेल्या लोको पायलटने रात्री ९:१५ वाजता असामान्य आवाज ऐकू आल्यानंतर ट्रेन तात्काळ थांबवली. तपासणी केल्यानंतर त्याला ट्रॅकवर वेल्ड फ्रॅक्चर आढळले. हा दोष आधीच ओळखला गेला होता आणि खबरदारीचा उपाय म्हणून जॉगल फिश प्लेट्सने तो सुरक्षित करण्यात आला होता. ट्रॅक सुरक्षित घोषित करण्यापूर्वी ट्रेन सुमारे एक तास थांबली आणि त्याच भागातून पुढे गेली. या विभागात रेल्वे सेवा आता सामान्यपणे सुरू आहेत, वेळापत्रकात कोणताही व्यत्यय आला नाही.

२०११ मध्ये झालेल्या प्राणघातक ट्रेन टक्करची धास्ती

चित्तेरीच्या मागील सुरक्षिततेच्या रेकॉर्डमुळे या घटनेने चिंता निर्माण केली असली तरी - २०११ मध्ये झालेल्या प्राणघातक ट्रेन टक्करमध्ये ११ जणांचा मृत्यू आणि ७० हून अधिक जखमी झाले होते. यावेळी लोको पायलटने जलद कारवाई केल्याने आणि आधीच अस्तित्वात असलेल्या सुरक्षा उपायांमुळे कोणतीही हानी टाळण्यास मदत झाली.

# महाराष्ट्रात ५१ आयपीएस अधिकाऱ्यांच्या बदल्या

मुंबई : महाराष्ट्र सरकारच्या गृह विभागाने ५१ भारतीय सेवा अधिकारी आणि ८१ राज्य पोलिस सेवा अधिकाऱ्यांच्या बदल्या केल्या आहेत. पोलिस यंत्रणा प्रभावी बनवण्यासाठी राज्य सरकारच्या गृह विभागाने निर्णय घेतला असून काही अधिकाऱ्यांना पदोन्नती देण्यात आली आहे. यात मुंबई, नागपूर, पुणे, नाशिक आणि छत्रपती संभाजी नगर इत्यादी जिल्ह्यांचा समावेश आहे. सरकारच्या आदेशानुसार तीन नवीन पोलिस आयुक्तांच्या बदल्या पुणे शहरात करण्यात आल्या. पुण्यातील परिमंडळ दोन विभागाच्या पोलिस उपायुक्त स्मार्तना पाटील यांची पोलिस प्रशिक्षण विभागात बदली करण्यात आली. वाहतूक विभागाचे उपायुक्त अमोल झेंडे यांचीही बदली करण्यात आली.

पुण्यातील शस्त्र तपासणी शाखेच्या पोलिस अधीक्षक तेजस्वी सातपुते यांची राज्य राखीव पोलिस दल गट १, पुणे येथे कमांडर म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. दरम्यान, ठाणे शहरातील पोलिस उपायुक्त महेंद्र पंडित यांची मुंबईत बदली करण्यात आली आहे. याशिवाय, पुण्यातील डीसीपी स्मार्तना पाटील यांची खंडाळा येथील पोलिस प्रशिक्षण केंद्रात बदली करण्यात आली आहे.

# किनवट अंडरब्रिजप्रकरणी राष्ट्रीय जनजाती आयोगाच्या आदेशाने पाहणी

**तभा वृत्तसेवा**
**किनवट, दि.२८ जून -**

शहरातील बहुचर्चित व वादग्रस्त रेल्वे अंडर ब्रिजप्रकरणी आज एक महत्त्वपूर्ण घडामोड घडली. बहुसंख्य नागरिक, शेतकरी, विद्यार्थी यांच्यासाठी जिवनमरणाचा प्रश्न ठरलेल्या या प्रश्नासंदर्भात आ. भिमराव केराम यांनी राष्ट्रीय जनजाती आयोगाकडे दाखल केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने दिनांक २६ जून रोजी आयोगाचे अध्यक्ष अतरसिंह आर्य यांच्या दिल्ली येथील दालनात सुनावणी पार पडली. त्यानंतर आज आयोगाच्या आदेशाने प्रत्यक्ष स्थळ पाहणी घेण्यात आली.



या पाहणीमध्ये आ. भिमराव केराम, दक्षिण मध्य रेल्वे नांदेड विभागाचे असिस्टंट व्यवस्थापक मीना, राष्ट्रीय जनजाती आयोगाचे वरिष्ठ अन्वेषक गोवर्धन मुंडे, सहाय्यक जिल्हाधिकारी झेनिथ चंद्र दोनतुला (खड), सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी, नगर परिषदेचे कार्यालय अधीक्षक भालेराव आणि अन्य संबंधित अधिकारी उपस्थित होते. पाहणीदरम्यान परिसरातील शेतकरी, विद्यार्थी, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पाहणीदरम्यान नागरिकांनी थेट आपल्या अडचणी अधिकाऱ्यांसमोर मांडल्या. शेतकऱ्यांचे निवेदन स्वीकृत करण्यात आले. अंडर ब्रिजच्या अपुरी रुंदीमुळे निर्माण झालेल्या अडचणी प्रत्यक्ष पाहताना रेल्वे अधिकाऱ्यांनीही अंशतः जबाबदारी स्वीकारली असून, ब्रिजमुळे वाहतुकीची कोंडी होत आहे, यास दुजोरा दिला.

यावेळी आ. भिमराव केराम यांनी प्रशासनातील समन्वय अभाव हाच मुख्य दोष असल्याचे स्पष्टपणे मांडले. तक्रारीमध्ये वास्तविक तथ्य आढळल्याचे आयोगाने मान्य केले असून या प्रकरणाची पुढील फेरसुनावणी दिल्ली येथे घेण्यात येणार आहे. पाहणीचा तांत्रिक अहवाल रेल्वे व महसूल प्रशासन आयोगासमोर सादर करणार आहे.

दरम्यान, या प्रकरणात तातडीने काहीही निर्णय न झाल्याने येत्या ६ महिन्यांसाठी हा प्रश्न प्रलंबित राहणार असल्याचे संकेत मिळाले आहेत. त्यामुळे किनवट शहर आणि परिसरातील सुमारे १० ते १५ गावांचे नागरिक, विशेषतः शाळकरी विद्यार्थी, आजारी रुग्ण आणि शेतकऱ्यांना दळणवळणासाठी अजूनही मोठा फेरा मारावा लागणार आहे.

आजच्या पाहणीत भाजपा, शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस (दोन्ही गट), वंचित बहुजन आघाडी यांच्यासह विविध राजकीय पक्षांचे पदाधिकारी, कार्यकर्ते, पत्रकार, सामाजिक कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. यामुळे अंडर ब्रिजप्रश्नी नागरिकांचा आवाज अधिक प्रभावीपणे पुढे पोहोचला आहे.

# संत महंत यांना एकत्र आणण्याचे सामर्थ्य माणुसकी धर्मात : भदंत डॉ उपगुप्त महाथेरो

पूर्णा,प्रतिनिधी /

सर्व जाती धर्माच्या संत ,महंत यांना एकत्र आणण्याचे सामर्थ्य माणुसकी धर्मात असल्याचे प्रतिपादन पूर्णा बुध्द विहार समिती चे अध्यक्ष भदंत डॉ. उपगुप्त महाथेरो यांनी त्यांच्या सत्काराला उत्तर देताना व्यक्त केले.

बी.आर.आंबेडकर स्मारक समिती तथा बुद्ध विहार समिती,पूर्णा यांना महाराष्ट्र शासनाने समाज भूषण पुरस्काराने सन्मानित केल्याबद्दल या समितीचे अध्यक्ष म्हणून भदंत उपगुप्त महास्थविर यांचा पूर्णा न. प. च्या प्रांगणात सार्वजनिक भीम व बुद्ध जयंती मंडळ २०२५ च्या वतीने आयोजित करण्यात आला होता.या प्रसंगी भदंत डॉ उपगुप्त यांना शाल,पुष्पगुच्छ,आणि सन्मानचिन्ह देवून जयंती मंडळाच्या सर्व पदाधिकारी यांनी सन्मानित केले.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थानी माजी नगराध्यक्ष उत्तमराव कदम हे होते तर स्वागताध्यक्ष म्हणून माजी नगराध्यक्ष मोहनराव मोरे हे होते.

या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून श्री.सदुरू व्यंकटेश दाजी महाराज संस्थान,धनगर टाकळी चे मुख्य वेदमूर्ती उमेश महाराज टाकळीकर, गुरुबुद्धी स्वामी चे प्रमुख डॉ.नंदकिशोर शिवाचार्य महाराज, जामा मस्जिद चे पेशइमाम मौलाना शमीम अहमद रीजवी,वारकरी मंडळाचे जिल्हाध्यक्ष सोपानकाका बोबडे, प्राचार्य फादर मायकल फ्रान्सिस, सुप्रसिध्द आंबेडकर वादी विचारवंत प्राचार्य डॉ.कमलाकर कांबळे,अंबेजोगाई, प्रा.डॉ. नीता गायकवाड,प्राचार्य डॉ.गणेश जोशी,आंबेडकरवादी विचारवंत प्रकाश कांबळे यांचे सह भदंत महाविरो थेरो,अहमदपूर,भदंत बोधी धम्मो,नांदेड.भदंत पय्यावंश,भदंत पय्यासार यांची विचार मंचावर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थिती होती.या मान्यवरांनी भदंत उपगुप्त थेरो यांच्या कार्याबद्दल आपल्या मनोगतात गौरव करून त्यांचा सत्कार केला.

या प्रसंगी विद्या प्रसारणी शाळेचे अध्यक्ष डॉ विनय वाघमारे, संतोष एकलारे,श्याम कदम,विजय कदम,उत्तम कांबळे,महाराष्ट्र बँकेचे व्यवस्थापक चंद्रकांत कच्छवे,रेल्वे सेवानिवृत्त कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष अशोक व्ही.कांबळे,मिलिंद कांबळे,सुभाष ओझा, सुनील सौंदर्मल,भगवान पाटील, अनिता सरोदे,दिलीप गोडबोले,निरंजना महिला मंडळ, तक्तशिला महिला मंडळ,रोहिणी महिला मंडळ,विशाखा महिला मंडळ,या व विविध शहरातून आलेल्या महिला मंडळांनी,संस्था व नागरिकांच्या वतीने भदंत डॉ उपगुप्त महस्थविर यांचा पुष्पगुच्छ,शाल,भेटवस्तू देऊन सत्कार करण्यात आला.

या प्रसंगी पत्रकार मधुकर खंदारे यांना ही समाज भूषण पुरस्कार मिळाल्याने त्यांचाही जयंती मंडळाच्या वतीने सन्मानचिन्ह,शाल,पुष्पहार देवून सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक ज्येष्ठ आंबेडकरवादी विचारवंत प्रकाश कांबळे यांनी केले.तर सूत्र संचलन जगदीश जोगदंड यांनी केले. सदरचा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी जयंती मंडळाचे अध्यक्ष तथा न.प.चे गटनेते उत्तम खंदारे, ॲड. हर्षवर्धन गायकवाड,चक्रवर्ती वाघमारे,दादाराव पंडित,प्रवीण कनकुटे,गौतम दीपके,साहेबराव सोनवणे,दिलीप गायकवाड, चेतनंद वाघमारे,भीमा वाहुळे, उत्तम कापुरे,मोहन लोखंडे,आनंद काळे,ड. धम्मा जोंधळे,अनिल खर्गखराटे,विजय जोंधळे,विश्वनाथ गवळी,डॉ. केशव जोंधळे अमृत मोरे,सुरेश हटकर,मधुकर गायकवाड,शिवाजी वेडे,सिध्दार्थ भालेराव,त्रिंबक कांबळे,तुकाराम ढगे, लक्ष्मण गायकवाड,आदींनी परिश्रम घेतले.

या प्रसंगी पत्रकार मंडळींनीही भदंत डॉ उपगुप्त महास्थविर यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला. या कार्यक्रमास पूर्णा शहरातील आणि मराठवाड्यातील सर्व जिल्ह्यातील नागरिकांनी मोठ्या प्रमाणात उपस्थिती दर्शविली होती.



# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## व्यवसाय परवाना कायमस्वरुपी रद्द करा; आयुक्तांना निवेदन

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २८ जून -**
लातूर शहरातील व्यवसाय परवाना (ट्रेड लायसन्स) कायमस्वरुपी रद्द करावा, अशी मागणी लातूर व्यापारी महासंघाच्यावतीने महापालिका आयुक्तांकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

महापालिकेच्या नूतन आयुक्त मानसी मीना यांना देण्यात आलेल्या निवेदनात म्हटले आहे की, लातूर शहरातील सर्व व्यापारी संघटनांचे प्रतिनिधीत्व लातूर व्यापारी महासंघातर्फे केले जाते. सर्व व्यापारी संघटनांच्या पदाधिकाऱ्यांच्या नुकत्याच पार पडलेल्या बैठकीत व्यवसाय परवानासंदर्भात चर्चा करण्यात आली.

या बैठकीत सर्व व्यापारी संघटनांनी महापालिकेने व्यवसाय परवाना कायमस्वरुपी रद्द करावा, अशी मागणी लावून धरली. केंद्र व राज्य शासनाने जीएसटी कायदा संमत करताना जीएसटी कराव्यतिरिक्त व्यापाऱ्यांना इतर कोणतेही कर लागू करण्यात येणार नाहीत, असे आश्वासन दिले होते.

सध्या व्यापार व उद्योगाधंद्यांमध्ये मोठ्या प्रमाणात स्पर्धा निर्माण झाली आहे. विशेषतः ऑनलाइन ट्रेडिंग व मॉल संस्कृतीमुळे लहान, मध्यम व्यापारी, व्यावसायिक अडचणीत सापडला आहे. त्यामुळे महापालिकेतर्फे लागू करण्यात आलेला व्यवसाय परवाना कायमस्वरुपी रद्द करावा व लातूर शहरातील व्यापार-उद्योग वृध्दीसाठी सहकार्य करण्याची विनंती आयुक्त मानसी मीना यांना प्रत्यक्ष भेटून करण्यात आल्याची माहिती लातूर व्यापारी महासंघाचे अध्यक्ष रामदास भोसले, विशाल अग्रवाल, राघवेंद्र ईटकर यांच्यासह महासंघाच्या अन्य पदाधिकाऱ्यांनी दिली. या मागणीसंदर्भात व्यापारी संघटनांसोबत चर्चा करुन योग्य तो निर्णय घेण्याचे आश्वासन आयुक्तांनी दिल्याचे रामदास भोसले यांनी सांगितले.



### संक्षिप्त वृत्त...

## ‘एक जवान, एक झाड अभियान’

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २८ जून -**
पर्यावरण संरक्षणाबाबत जनजागृती वाढविण्यासाठी केंद्रीय राखीव पोलीस दलाच्या नवआरक्षी प्रशिक्षण केंद्रात ‘एक जवान, एक झाड’ अभियानांतर्गत ५०० वृक्षांचे रोपण करण्यात आले.

पर्यावरण संरक्षण आणि हरित भारत अभियानांतर्गत केंद्रीय राखीव पोलीस दलाच्यावतीने ‘एक जवान, एक झाड’ या विशेष कार्यक्रमांतर्गत आंबा, कडुलिंब, पिंपळ यासारख्या ५०० देशी वृक्षांचे रोपण करण्यात आले.

## जड वाहनांची खरेदी आता ‘अवघड’

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २८ जून -**
मोटार वाहन कर सुधारणाबाबत काढण्यात आलेल्या अधिसूचनेचे पालन १ जुलैपासून होणार आहे. वाहनांच्या रकमेनुसार कर दर आकरण्यात आले आहेत.

सीएनजी किंवा एलपीजीवर चालणारी खाजगी संवर्गातील वाहने ज्यांची किंमत ही १० लाखापर्यंत असेल त्यास ७ टक्के कर आकारला जात होता. आता त्यामध्ये १ टक्क्यांनी वाढ केली असून ८ टक्के झाला आहे. ज्या वाहनांची किंमत २० लाखापर्यंत आहे त्यांना ९ टक्के तर ज्यांची किंमत २० लाखांहून अधिक आहे त्या वाहनास १० टक्के कर द्यावा लागणार आहे. बॅटरीवर चालणाऱ्या वाहनाची किंमत ही ३० लाखांपेक्षा जास्त असेल तर ६ टक्के कर आकारला जाणार आहे. यापार्वी क्रेन, क्रॉम्प्रेसर्स, प्रोजेक्ट किंवा खनित्रे यांच्या वजनावर वार्षिक कर आकारला जात होता आता वाहनाच्या किंमतीच्या ७ टक्के एक रकमी कर अदा करावा लागणार आहे. या कराच्या अनुषंगाने शासनाने १७ जून रोजी अधिसूचना काढली होती. या अधिसूचनेची अंमलबजावणी होणार असल्याचे उप प्रादेशिक परिवहन अधिकारी आशिषकुमार अय्यर यांनी सांगितले आहे.

## अंगावर कचरा टाकल्याने लोखंडी रॉडने मारहाण

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २८ जून -**
तालुक्यातील हाडोळती येथे महिलेने घरा समोरच्या अंगणातील कचरा झाडून तो रोडवर टाकत असताना एका व्यक्तीच्या अंगावर पडला. कचरा माझ्या वडिलांच्या अंगावर का टाकला ? म्हणत मुलाने चार जणांना लोखंडी रॉड व बेल्टने बेदम मारहाण केल्याची घटना गुरुवार घडली. याप्रकरणी अहमदपूर पोलिसांत दोघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तालुक्यातील हाडोळती येथील सुमनबाई गुरुनाथ राजुरे यांनी आपल्या घरासमोरील अंगणातील कचरा झाडून तो रोडवर टाकत असताना गावातीलच जावेद करीमसाब शेख यांच्या अंगावर पडला. चुकून पडल्याने महिलेने माफी देखील मागितली. मात्र, घटनास्थळी जावेद शेख यांचा मुलगा आयान जावेद शेख आला व घडलेला प्रकार बघून सुमनबाई गुरुनाथ राजुरे व त्यांचा मुलगा नामदेव राजुरे, पती गुरुनाथ राजुरे व मुलाचा मावस भाऊ सुनिल धोंडीबा हिवरे यांना धमकी देत लोखंडी रॉडने व बेल्टने डोक्यात, हातावर, डोळ्यावर मारहाण करून जीवे मारण्याची धमकी दिली. नामदेव गुरुनाथ राजुरे (वय ४१) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून जावेद करीमसाब शेख, आयान जावेद शेख यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## पाच जणांकडून महिलेला जबर मारहाण, गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २८ जून -**
बांधाच्या खालून जनावरे घेऊन जावा, शेतात जनावरे सोडू नका असे म्हणल्यावर शेजारच्या शेतकऱ्याने ६० वर्षीय वयोवृद्ध शेतकरी आजीबाईंना जिवंत मारण्याच्या उद्देशाने दगड व काठ्यांनी बेदम मारहाण केल्याची घटना तालुक्यातील जेवरी येथे शुक्रवार (दि. २७) रोजी सकाळी घडली. मारहाणीत महिला गंभीर जखमी झाली असून तिची प्रकृती गंभीर असल्याचे सांगितले जात आहे.

तालुक्यातील जेवरी येथील संतूबाई रघूनाथ आगलावे यांनी शेजारी त्यांच्या शेतात घालत असल्याने, तुम्ही बांधावरून जनावरे घेऊन जावा असे म्हणल्याचा राग धरून शेतकरी विठ्ठल आगलावे, दत्ता आगलावे, नामदेव आगलावे, लखन क्षीरसागर, आकाश क्षीरसागर यांनी संतुबाईला मारहाण केली.

# पावसाची दडी ; कोरड्या आभाळाकडे शेतकऱ्यांचे डोळे

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २८ जून -**
मे महिन्यात मान्सूनपूर्व पाऊस झाल्याने यंदा पावसाळा चांगला राहील, अशी आशा होती. मात्र, मृग नक्षत्रात पावसाने दडी मारली. अल्प पावसावर काही शेतकऱ्यांनी पेरण्या केल्या होत्या. त्यांच्यावर दुबार पेरणीचे संकट ओढावण्याची शक्यता असून, मागील वीस दिवसांपासून पावसाने उघडीप दिली आहे. यामुळे पेरण्या खोळंबल्या आहेत. रासायनिक खते व बी-बियाणे खरेदी शेतकऱ्यांनी केली असून, अनेकांना कर्ज काढून खरेदी करावी लागली आहे. आता पावसासाठी आभाळाकडे डोळे लागले आहेत.



यंदा पेरणीचे नियोजन करून शेतकऱ्यांकडून शेतीची पूर्व मशागत करून शेती पेरणीयोग्य तयार करण्यात आली आहे. अनेक शेतकऱ्यांनी पाऊस वेळेवर येईल या आशेने खते, बी-बियाणे खरेदीही करून ठेवले आहेत. जिल्ह्यातील शेतकरी अगदी एप्रिल व मे महिन्यापासूनच कामाला लागले. उन्हाळी मशागतीची कामे सुरू करण्यापूर्वीच अवकाळी पाऊस बरसला. या पावसाने वेळेत उन्हाळी मशागतीची कामे करता आली नाहीत. हजारो हेक्टर क्षेत्रावर रब्बी हंगामातील पिके घेतल्यापासून ‘जैसे थे’ स्थिती आहे. तुरीचे पीक घेतलेल्या जमिनीत तुराट्या उभ्या आहेत. तर ज्वारीच्या जमिनीत तशीच स्थिती आहे. त्यात चांगला अवकाळी पाऊस झाल्याने मशागतीचीही कामे करणे कठीण झाले. त्यामुळे यंदा पेरण्यांना कालावधी लागला. माळरानावरील मशागती करून शेतकऱ्यांनी पेरण्या उरकल्या.

मे महिन्यात जिल्ह्यात मान्सूनपूर्व पावसाने चांगलेच थैमान घातले होते. त्यानंतर जून महिन्याच्या पहिल्या आठवड्यातही पावसाने जोर धरला होता.

मात्र, मागील वीस दिवसांपासून पावसाने दडी दिली आहे. यामुळे शेतकऱ्यांनी पेरण्या थांबवल्या आहेत. काळ्या जमिनीत वापसा नसल्याने व मशागतीअभावी अद्याप अनेक शेतकऱ्यांना पेरण्या करता आल्या नाहीत. गेल्या आठवडाभरापासून सकाळ आणि संध्याकाळी ढगाळ वातावरण तर दिवसभर स्वच्छ सूर्यप्रकाश व सुसाट वारा वाहत आहे. यामुळे जमिनीतील ओलावाही कमी होत आहे. ऐन पावसाळ्यात पावसाने दीर्घ दडी मारली असून पावसासाठी शेतकऱ्यांचे डोळे आभाळाकडे लागले आहेत.

### मराठवाड्यात सर्वाधिक क्षेत्रावर सोयाबीन घेणारा जिल्हा

मराठवाड्यात सर्वाधिक क्षेत्रावर सोयाबीन घेणारा जिल्हा अशी लातूरची ओळख आहे. खरीप हंगामातील प्रमुख व नगदी पीक म्हणून सोयाबीनकडे पाहिले जाते. या हंगामावर शेतकऱ्यांचे वर्षभराचे अर्थकारण अवलंबून असते. जिल्ह्यातील लाखो हेक्टर शेती ही हंगामी पावसाच्या भरोशावर केली जाते. वेळेवर पाऊस झाला तरच शेतकऱ्यांसह सर्वच सुरळीत चालते. जिल्ह्यात यावर्षीही विक्रमी क्षेत्रावर सोयाबीनचा पेरा होण्याचा अंदाज वर्तविण्यात येत आहे.

## ‘मराठा क्रांती’चे महाराजांना अभिवादन

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २८ जून -**
लातूर जिल्हा मराठा क्रांती मोर्चाच्यावतीने लोकराजे, राजर्षी शाहू महाराजांना जयंतीनिमित्त अभिवादन करण्यात आले. शहरातील राजर्षी शाहू महाराज चौकातील राजर्षी शाहू महाराजांच्या पुतळ्याचे आणि प्रतिमेचे समाजबांधवांनी पूजन केले.

राजर्षी शाहू महाराजांनी बहुजन समाजाच्या उत्कर्षासाठी तसेच सामाजिक एकतेसाठी केलेल्या कार्याचे स्मरण करीत यावेळी समाजबांधवांनी त्यांचा जयजयकार केला. यावेळी लातूर जिल्हा मराठा क्रांती मोर्चाचे डॉ. हर्षवर्धन राऊत, ॲड. उदय गवारे, डॉ. बी. आर. पाटील, प्रमोद साळुंके, धनंजय शेळके, अभिमन्यू जगदाळे यांच्यासह समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## ढाकणीच्या सरपंच, उपसरपंचासह कार्यकर्त्यांचा भाजपत प्रवेश

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २८ जून -**
तालुक्यातील ढाकणी येथील ग्रामपंचायतीचे सरपंच किशोर सुडके, उपसरपंच पवन जाधव यांच्यासह अन्य कार्यकर्त्यांनी भाजपचे नेते, लातूर ग्रामीणचे आमदार रमेश कराड यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून येथील ‘संवाद’ कार्यालयात भाजपमध्ये प्रवेश केला.



लातूर ग्रामीण मतदारसंघातील गावागावात, वाडी-वस्तीत मूलभूत सुविधांसह विविध विकासकामांना आमदार रमेश कराड यांच्या माध्यमातून शासनाच्या विविध विभागांतर्गत मोठ्या प्रमाणात निधी मिळत आहे. या निधीतून प्रत्येक ठिकाणी रखडलेल्या विकासकामांना गती मिळत आहे. आमदार कराड यांच्या माध्यमातून होत असलेल्या कामांना प्रेरित होऊन मतदारसंघातील अनेकजण भाजपमध्ये प्रवेश करत आहेत. ढाकणी येथील ग्रामपंचायतीचे सरपंच किशोर सुडके, उपसरपंच पवन जाधव, सदस्य विठ्ठल श्रावण सुरवसे, अनिल एकनाथ जाधव, कल्याण भगवानराव माने, आकाश अनुरथ करदुडे, स्वप्नील बिभिषण काळे यांच्यासह अनेकांनी आमदार कराड यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून भाजपमध्ये प्रवेश केला. यावेळी आमदार कराड मित्रमंडळाचे अध्यक्ष प्रदीप पाटील खंडापूरकर, भाजपचे मंडल अध्यक्ष सूरज शिंदे, माजी तालुकाध्यक्ष बन्सी भिसे, श्यामसुंदर वाघमारे आदींची उपस्थिती होती. भाजपमध्ये प्रवेश केलेल्यांना सन्मानाची वागणूक दिली जाईल, असा विश्वास देऊन आमदार रमेश कराड यांनी शासनाच्या माध्यमातून ढाकणी गावचा सर्वांगीण विकास करू, अशी ग्वाही दिली.

## शारदा सेमी स्कूलमध्ये शाहू महाराजांना अभिवादन

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २८ जून -**
येथील अंबाजोगाई रोडवरील शारदा सेमी इंग्लिश स्कूलमध्ये लोकराजा, राजर्षी शाहू महाराज यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.

रॉयल एज्युकेशन सोसायटीचे संस्थापक अध्यक्ष डॉ. एम. आर. पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य प्रा. लक्ष्मण पुरी होते. प्रारंभी प्राचार्य पुरी यांनी छत्रपती शाहू महाराजांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यानिमित्त बाल गटातील विद्यार्थ्यांनी राजर्षी शाहू महाराजांची वेशभूषा परिधान केली होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दर्शना बोराडे यांनी केले. प्रास्ताविक रोहिणी कदम यांनी केले. आभार अश्विनी पवार यांनी मानले. यावेळी शिक्षिका मानसी पाटील, रेणुका समुद्रे, वर्षा कांबळे आदी उपस्थित होते.

## सुरतच्या व्यापाऱ्याला कोट्यवधी रुपयांना लुटले

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २८ जून -**
सुरत येथील एक व्यापारी नांदेड येथून बीड मार्गे सुरतला जात असताना बुधवारी रात्री १० वाजेच्या सुमारास कोपरा पुलाजवळ अज्ञात सहा चोरट्यांनी व्यापाऱ्याची गाडी अडवून १ कोटी ८० लाख रुपयांची रोकड हिसकावून घेऊन पोबारा केला. व्यापाऱ्याच्या तक्रारीवरून किनगाव पोलीस ठाण्यात शुक्रवारी पहाटे गुन्हा करण्यात आला आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, सुरत येथील व्यापारी किरीटभाई पटेल, चालक व इतर एक जण असे तिघेजण बोलेरो जीपने (जी. जे १५ सी. एन ६४९३) शुक्रवारी रात्री नांदेड येथून बीड मार्गे सुरत जात होते. अहमदपूर किनगाव दरम्यान कोपरा पुलाजवळील खराब रस्त्यावर पाठलाग करणाऱ्या कारमधील अज्ञात सहा जणांनी व्यापाऱ्याची गाडी आडवून चालकाच्या बाजूची काच फोडून चालकास खाली ओडले. गाडीतील तिघांनाही शास्त्राची भिती दाखवून त्यांच्याकडून १ कोटी ८० लाख रुपयांची रोकड हिसकावून घेतली. लागलीच दरोडेखोरांनी त्या ठिकाणाहून पोबारा केला. लातूर पोलिसांना घटना समजतात घटनास्थळी दाखल झाले.

यावेळी लातूर पोलीस अधीक्षक सोमय्या मुंडे, अप्पर पोलीस अधीक्षक डॉ. अजय देवरे, सहाय्यक पोलीस अधीक्षक चंद्रकांत रेड्डी यांनी भेट देऊन बराच वेळ किनगाव परिसरात पहाटे पर्यंत तळ ठोकून होते. सर्वत्र शोधाशोध घेतली परंतु हाती काहीच न लागल्याने शेवटी शुक्रवारी सकाळी किरीटभाई सोमाभाई पटेल यांच्या फिर्यादीवरून गुरंन १४२ / २५ कलम३१० (२) अन्वये सहा अज्ञात आरोपी विरोध किनगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

या चोरीचा या दरोड्याचा तात्काळ तपास करण्यासाठी पोलीस अधीक्षक सोमय्या मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली चार पथकद्वारे शोध मोहीम राबवली आहे. पथकातील पोलीस पुरावे मिळवण्याचा आतोनात प्रयत्न करीत आहेत. हा गुन्हा खरा की बनावट यांचाही पोलीस तपास करत आहेत.

## सोनसाखळी चोर महिला जेरबंद; दीड लाखाचा ऐवज जप्त

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २८ जून -**
स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने महिलांच्या गळ्यातील मंगळसूत्र, गंठण चोरणाऱ्या एका महिलेस अटक करून १ लाख ५८ हजार रुपये किमतीचे सोन्याचे ३० तोळे वजनाचे दागिने जप्त केले. यातून दोन गुन्हे उघडकीस आले आहेत.

पोलीस अधीक्षक सोमय मुंडे व अपर पोलीस अधीक्षक डॉ. अजय देवरे यांच्या मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सुधाकर बावकर यांच्या नेतृत्वात पथके नेमून चोरीच्या गुन्ह्यांचा तपास करण्यात येत आहे. पथकामार्फत जिल्ह्यातील विविध गुन्हेगारांची माहिती गोळा करण्यात येत होती. तसेच गोपनीय बातमीदार नेमून त्यांच्याकडून माहिती घेण्यात येत होती. दरम्यान, मंगळवारी (दि.२४) मिळालेल्या माहितीवरून चोरलेले सोन्याचे दागिने विकण्याच्या प्रयत्नात असलेल्या सीमा विनायक मस्के (वय ५०, रा. बालाजीनगर, लातूर) या महिलेस गरुड चौक परिसरातून ताब्यात घेऊन कसून चौकशी करण्यात आली. मागील काही महिन्यांपासून लातूर शहरातील मध्यवर्ती बसस्थानक आणि अहमदपूर बस स्थानकामध्ये गर्दीचा फायदा घेऊन, बसमधून चढ-उतार करणाऱ्या महिलांच्या गळ्यातील मंगळसूत्र, गंठण चोरल्याची तिने कबुली दिली.

जिल्ह्यातील पोलीस ठाण्यांतील अभिलेखाची माहिती घेतली असता, गांधी चौक व अहमदपूर येथील प्रत्येकी १ गुन्हा असे दोन गुन्हे उघडकीस आले आहेत. आरोपी महिलेकडून चोरलेले १ लाख ५८ हजार रुपये किमतीचे ३० तोळे वजनाचे सोन्याचे दागिने जप्त करण्यात आले आहेत. पुढील तपासासाठी आरोपीला गांधी चौक पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे.

वरिष्ठांच्या मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सुधाकर बावकर यांच्या नेतृत्वात पोलीस उपनिरीक्षक संजय भोसले, पोलीस अंमलदार संजय कांबळे, योगेश गायकवाड, सूर्यकांत कलमे, राजेश कंचे, तुळशीराम बरुरे, विनोद चलवाड, महिला पोलीस अंमलदार प्रगती राजपूत, अलका बोमुटवाड, चालक पोलीस अंमलदार चंद्रकांत केंद्रे यांनी ही सेवा बजावली.

## दयानंद फार्मसीचा विद्यार्थी जीपॅट परीक्षेत भारतात ३८ वा

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २८ जून -**
जीपॅट परीक्षेत लातूरच्या दयानंद फार्मसीचा महाराष्ट्रात दबदबा कायम असून, भारत सरकारच्या नॅशनल बोर्ड ऑफ एक्झामिनेशन्स इन मेडिकल सायन्सेसद्वारे अखिल भारतीय स्तरावर फार्मसीच्या विद्यार्थ्यांसाठी घेण्यात आलेल्या जीपॅट (ग्रॅज्युएट फार्मसी अपटीट्युड टेस्ट) या परीक्षेत दयानंद कॉलेज ऑफ फार्मसी या महाविद्यालयातील तब्बल २३ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. विशेष म्हणजे श्रीनिवास कपाळे हा ३२८ गुण प्राप्त करून ऑल इंडिया रँक ३८ वा आला.

जीपॅट परीक्षेत पात्र ठरलेल्या विद्यार्थ्यांना वार्षिक दीड लाख रुपये शिष्यवृत्ती शासनामार्फत प्राप्त होते. या परीक्षेत विद्यार्थ्यांचा उत्साह वाढावा म्हणून दयानंद शिक्षणसंस्थेतर्फे प्रथम आलेल्या विद्यार्थ्याला ११ हजार रुपये आणि इतरांना प्रत्येकी तीन हजार रुपये बक्षीस देण्यात येणार आहे.

जीपॅट या परीक्षेत दयानंद कॉलेज ऑफ फार्मसीचा श्रीनिवास कपाळे हा ३२८ गुण प्राप्त करून ऑल इंडिया रँक ३८वा आला. तसेच सिध्दय्या हिरेमठ २७७, हणमंत विजापुरे २६०, प्रतीक्षा गाडे २४६, गायत्री मिसळे २४२, वेदांती सुरनर २३७, प्रतीक्षा कंजे २२६, सचिन सालमोटे २२२, श्रेया दिवाण २१९, वैष्णवी कवळगावकर २१३, रोहित भोसले २०६, शीतल बिराजदार २०३, प्रतीक पवार २०२, प्रथमेश ससाणे १९८, आदित्य गायकवाड १९४, साक्षी हुलसूरकर १८१, गोपिका पवार १७९, निशिगंधा लोकरे १७६, सुदर्शन कांबळे १७३, श्वेता वाकळे १६२, साईनाथ सूर्यवंशी १५९, पल्लवी पाचपिंडे १२२, राई पाध्ये १०१ गुण मिळवत राष्ट्रीय स्तरावर यश प्राप्त केले आहे.

या यशाबद्दल दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मीरमण लाहोटी, उपाध्यक्ष अरविंदराव सोनवणे, सचिव रमेश बियाणी, सहसचिव विशाल लाहोटी, सहायक सचिव अजिंक्य सोनवणे, कोषाध्यक्ष संजय बोरा, प्राचार्या डॉ. क्रांती सातपुते, जीपॅट विभागप्रमुख डॉ. अर्चना येलमटे यांच्यासह प्राध्यापकांनी कौतुक केले आहे.

## अमोल तांबे लातूरचे पोलीस अधीक्षक

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २८ जून -**
पोलीस अधीक्षक सोमय मुंडे यांची पुणे शहर पोलीस उपायुक्त म्हणून बदली करण्यात आली आहे. लातूरचे नवे पोलीस अधीक्षक म्हणून पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणचे पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांची नियुक्ती करण्यात आली आहे.



शासनाच्या गृह विभागाने शुक्रवारी राज्यातील वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांच्या बदल्या केल्या आहेत. त्यात लातूरचे पोलीस अधीक्षक सोमय मुंडे यांची पुणे येथे पोलीस उपायुक्त म्हणून, तर अपर पोलीस अधीक्षक डॉ. अजय देवरे यांची धुळ्याचे अपर पोलीस अधीक्षक म्हणून बदली करण्यात आली आहे.

## भारतीय बौध्द महासभेतर्फे गुणवंतांचे कौतुक

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २८ जून -**
भारतीय बौध्द महासभा जिल्हा शाखा लातूरच्यावतीने राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांची जयंती व संविधान अमृत महोत्सवदिनानिमित्त संविधान ग्रंथ तसेच सन्मानपत्र देऊन गुणवंत विद्यार्थ्यांचे कौतुक करण्यात आले.

अध्यक्षस्थानी जिल्हाध्यक्षा आशा चिकटे होत्या. यावेळी प्रमुख मार्गदर्शक म्हणून राज्य संघटक प्रा. बापू गायकवाड उपस्थित होते. प्रमुख पाहुणे म्हणून राज्य संघटक डी. एस. नरसिंगे, राज्य संघटक दैवशाला गायकवाड, कनिष्ठ अभियंता श्याम सुरवसे, पत्रकार राजहंस कांबळे, प्रा. डॉ. बालाजी गव्हाळे, प्रकाश कांबळे, वंचित बहुजन आघाडीचे रेणापूर तालुकाध्यक्ष आर. के. आचार्य यांची प्रमुख उपस्थिती होती.



यावेळी ‘भावी आयुष्यातील आव्हाने’ या विषयावर प्रा. गायकवाड आणि नरसिंगे यांनी मार्गदर्शन केले. यावेळी प्रा. बापू गायकवाड म्हणाले, देशाचा सुजान नागरिक घडवायचा असेल तर आज धम्माची गरज आहे.

विद्यार्थ्यांनी बुध्द विचारांचे आचरण करावे. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी देशाचे संविधान लिहिले. ते लिहिताना त्यांच्या डोळ्यांसमोर न्याय, स्वातंत्र्य, समता आणि बंधुता होती.

यावेळी गुणवंत विद्यार्थ्यांचे कौतुक करण्यात आले. राजर्षी शाहू महाराज जयंतीचे औचित्य साधून तसेच भारतीय संविधानाच्या हिरक महोत्सवी वर्षानिमित्त सिध्दार्थ बुध्द विहार, सिध्दार्थ हाउसिंग सोसायटी, येथे वृक्षारोपण करण्यात आले. प्रास्ताविक प्रचार, पर्यटन विभागाचे जिल्हा उपाध्यक्ष राजेंद्र क्षीरसागर यांनी तर सूत्रसंचालन जिल्हा उपाध्यक्ष गौतम बनसोडे यांनी केले.

यशस्वीतेसाठी धम्म संस्थेचे जिल्हा सरचिटणीस अभिमन्यू लामतुरे, कोषाध्यक्ष अर्जुन कांबळे, महिला जिल्हा सरचिटणीस वंदना कांबळे, कोषाध्यक्ष माया कांबळे, जिल्हा उपाध्यक्ष राजाराम साबळे आदींनी पुढाकार घेतला.

# आपलेपणाच्या सूत्रात सगळ्यांना गुंफणे हेच रा.स्व.संघाचे काम : मोहन भागवत

पुणे : विविधतेने नटलेल्या जगाच्या मुळाशी एकच तत्व आहे. ते ओळखून वागणे म्हणजे आपलेपणा होय. तोच समाजाचा स्थायी भाव आहे. आपलेपणाच्या सूत्रात सगळ्यांना गुंफणे हेच राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे काम आहे. माणूस आपलेपणाकडे झुकला तर देवरुप होतो. एकांतामध्ये आत्मसाधना आणि लोकांती सेवा, परोपकाराचे कार्य करणारे आदर्श समाजात आहेत, असे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक मोहन भागवत यांनी सांगितले.

आयुर्वेद भास्कर कै. वैद्य परशुराम य. वैद्य खडीवाले तथा दादा यांच्या उत्तुंग जीवनकार्याच्या आढावा घेणा-या 'दर्शन योगेश्वराचे - आयुर्वेद भास्कर दादा वैद्य खडीवाले' या चरित्रग्रंथाचे प्रकाशन बालगंधर्व रंगमंदिर येथे आयोजित कार्यक्रमात झाले. यावेळी सिंबायोसिस आंतरराष्ट्रीय विद्यापीठाचे कुलपती पद्मभूषण डॉ. शां.ब.मुजुमदार, वैद्य विनायक परशुराम वैद्य खडीवाले, संगीता विनायक वैद्य खडीवाले, डॉ. राजीव ढेरे आदी उपस्थित होते. तसेच पुण्यासह संपूर्ण महाराष्ट्रातील आयुर्वेद, संशोधन आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाशी निगडीत अनेक मान्यवर कार्यक्रमाला उपस्थित होते.



मोहन भागवत म्हणाले, महापुरूषांच्या वाटेने जायला सामान्य माणूस कचरतो. मात्र, आपलेपणाची वाट चोखाळणाऱ्या माणसांना तो आप्त समजतो. या आपलेपणानेच सर्वांचे जीवन उजळून निघावे, त्यासाठी कर्तूत्व खर्च करून स्वतःचेही जीवन उजळून टाकण्याची प्रेरणा समाजाला पुढे नेते. त्यातूनच समाजाचे परिवर्तन घडते, असा विश्वास डॉ. भागवत यांनी व्यक्त केला.

डॉ. शां.ब.मुजुमदार म्हणाले, रा.स्व. संघ हा दादा खडीवाले यांचा श्वास व ध्यास होता. आयुष्यात त्यांनी जनकल्याण रक्तपेढीसह जे अनेक सामाजिक व विविध प्रकल्प केले, त्यामागे रा. स्व. संघाची प्रेरणा होती. संघाचे शताब्दी वर्ष आणि दादांच्या चरित्रग्रंथाचे प्रकाशन हा देखील योगायोग असल्याचे त्यांनी सांगितले.

विनायक खडीवाले म्हणाले, आयुर्वेद, समाजसेवा, संशोधन यांसह जनकल्याण रक्तपेढी, जनकल्याण नेत्रपेढी, हरी परशुराम औषधालय कारखाना व दवाखाना, निराधार मुलांकरता आधार केंद्र, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठामध्ये औषधी वनस्पती उद्यान उभारणी, निराधार महिलांकरता वंदनीय ताई आपटे महिला विकास प्रतिष्ठान अशा अनेक संस्थांची उभारणी दादांनी केली आहे. त्यांनी आयुर्वेद व रा. स्व. संघाविषयी च्या १०० च्या पेक्षा जास्त पुस्तके लिहिली. विविध क्षेत्रात दादांचे मोठे कार्य आहे. ते यामाध्यमातून समाजासमोर आणण्याचा प्रयत्न आहे.

## पुण्यातच नव्हे, तर महाराष्ट्रात आयुर्वेदाचे विद्यापीठ नाही : डॉ. शां.ब.मुजुमदार

**आयुर्वेद शास्त्रात पुणे हे नेहमीच अग्रगण्य राहिले आहे. आयुर्वेदाचे अनेक जाणकार आणि ज्यांनी आयुर्वेदासाठी आयुष्य वेचले, अशा दिग्गज व्यक्ती पुण्यात आहेत. पुण्यात आजमितीस ३० विद्यापीठे आहेत. आयुर्वेद शास्त्राची ही मोठी परंपरा पुण्यात असूनही पुण्यातच काय महाराष्ट्रात आयुर्वेदासाठी विद्यापीठ नाही, अशी खंत डॉ. शां.ब.मुजुमदार यांनी व्यक्त केली. ते म्हणाले, राजस्थान आणि गुजरात मध्ये मात्र विद्यापीठ आहे. पुण्यामध्ये आयुर्वेद विद्यापीठाची नितांत आवश्यकता असून रा.स्व. संघाच्या शताब्दी निमित्त पुण्यात आयुर्वेद विद्यापीठासाठी प्रयत्न व्हावे, अशी अपेक्षा त्यांनी मोहन भागवत यांच्याकडे व्यक्त केली.**

संगीता विनायक वैद्य खडीवाले म्हणाल्या, बीड सह पुणे जिल्ह्यामध्ये विविध १२५ ठिकाणी दादांनी मोफत आरोग्य शिबिरे आयोजित करून १ लाखाहून अधिक रुग्णांना आरोग्य सेवा दिली आहे. तसेच ठाणे जिल्ह्यातील पालघर तालुक्याच्या पुढे देवबांध या ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणात सर्व डोंगर हिरवे करण्यासाठी दादांनी मोहीम हाती घेतली होती. याशिवाय वैद्य ग्रंथ भांडार, महर्षी अण्णासाहेब पटवर्धन वैद्यकीय पुरस्कार, आयुर्वेद प्रचारक व हिंदू तनमन, विश्व वैद्य संमेलने, अन्नकोट प्रदर्शने असे अनेक उपक्रम देखील दादांनी राबवले. मनपा कोटणीस दवाखान्यात एचआयव्ही एड्स करीता ३० वर्षे त्यांनी मोफत रुग्णसेवा दिली. तब्बल ४० वर्षे त्यांनी गुरुकुल पद्धतीने विनामूल्य आयुर्वेद प्रशिक्षण वर्ग घेतले. त्यांच्या कार्याची महती सांगणारा हा चरित्रग्रंथ ३२० पानांचा आहे, असेही त्यांनी सांगितले.

रोहित जोगळेकर आणि वैद्य अनंत निमकर यांनी मान्यवरांचा परिचय करून दिला. ग्रंथनिर्मितीमध्ये मोलाचा सहभाग असलेल्या तनुजा राहणे आणि गिरीश दात्ये यांचा विशेष सन्मान यावेळी करण्यात आला. वैद्य शुभंकर कुलकर्णी आणि वैद्य आशुतोष जातेगावकर यांनी धन्वंतरी स्तवन सादर केले. स्नेहल दामले यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. राजीव ढेरे यांनी आभार मानले.

## महाराष्ट्र मेडिकल कौन्सिलच्या वैद्यकीय मेडिकल निग्लीजन्स समितीवर डॉ. उज्वला दहीफळे (कराड) यांची नियुक्ती



छत्रपती संभाजीनगर, दि. २७ जून : जिल्ह्यातील वैद्यकीय मेडिकल निगलिजन्स संबंधित प्रकरणांवर चौकशी करण्यासाठी स्थापन करण्यात येणाऱ्या समितीवर महाराष्ट्र मेडिकल कौन्सिलच्या वतीने डॉ. उज्वला दहिफळे (कराड) यांची प्रतिनिधी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

ही नियुक्ती कौन्सिलचे प्रशासक डॉ. विंकी रुघवानी यांच्या आदेशानुसार करण्यात आली असून, यासंदर्भातील अधिकृत पत्र महाराष्ट्र मेडिकल कौन्सिल, मुंबई यांनी २७ जून २०२५ रोजी जिल्हा शल्यचिकित्सक, जिल्हा रुग्णालय, छत्रपती संभाजीनगर यांना पाठवले आहे. सन २०१० मधील शासन निर्णयानुसार, जिल्हा स्तरावर वैद्यकीय निष्काळजीच्या तक्रारींवर सुनावणी घेण्यासाठी एक समिती स्थापन करणे बंधनकारक करण्यात आले आहे. या समितीत महाराष्ट्र मेडिकल कौन्सिलचा एक प्रतिनिधी असणे अनिवार्य आहे.

या निर्णयानुसार आता डॉ. उज्वला दहीफळे ( कराड )या समितीमध्ये कौन्सिलच्या प्रतिनिधी म्हणून सहभागी होतील. त्या सर्व बैठका व सुनावणी प्रक्रियेत सहभागी राहून वैद्यकीय निष्काळजीप्रकरणांच्या चौकशीस हातभार लावतील. या चौकशी समितीमुळे वैद्यकीय क्षेत्रातील पारदर्शकता, जबाबदारी आणि रुग्णांचे अधिकार अबाधित राहतील, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## पुष्पराज परत येतोय, आणखी फायरसह

मुबई: झी सिनेमा घेऊन येतोय पुष्पाचा तुफानी अनुभव, पुष्पा २: रिलोडेडच्या स्वरूपात, जी यावर्षीची सर्वात मोठी ब्लॉकबस्टर ठरणार आहे. या विस्तारित आवृत्तीमध्ये २० मिनिटांचं असं फुटेज आहे जे याआधी कधीही रिलीज झालं नव्हतं - ज्यामध्ये आग, राग, आणि उत्साह पुन्हा जिवंत होतो. नव्या हाय-ऑक्टेन ॲक्शन सिक्वेन्सपासून ते भावनिक क्षणांपर्यंत ही आवृत्ती चाहत्यांना ते सर्व काही देते, जे त्यांना माहितही नव्हतं की त्यांनी चुकवलं आहे. तर पाहायला विसरू नका - रविवार, २९ जून २०२५ रोजी संध्याकाळी ७ वाजता, केवळ झी सिनेमावर.

## एसुसचा 'बियॉन्ड इनक्रेडिबल विथ एसुस' उपक्रम

पुणे: तायवानची आघाडीची टेक्नॉलॉजी कंपनी एसुसने पुण्यात आपल्या प्रमुख सामुदायिक उपक्रम 'बियॉन्ड इनक्रेडिबल विथ एसुस'च्या दुसऱ्या अध्यायाचे आयोजन केले. एंटीसोशल पुणे येथे आयोजित या उत्साही कम्युनिटी मीट-अपमुळे गेमिंग समुदायाला एकत्र आणले गेले आणि दिवसभर चालणाऱ्या संवादात्मक सत्रांत लोकांचा उल्लेखनीय सहभाग दिसून आला. या सत्रांमध्ये सहभागी नागरिकांनी एसुस ब्रँड व त्यांच्या नव्या उत्पादनांबाबत चर्चा केली. पहिल्या अध्यायाला मिळालेल्या उत्तम प्रतिसादाच्या आधारावर, एसुस हा उपक्रम इतर शहरांतही नेण्याची योजना आखत आहे, जेणेकरून लोकांना प्रत्यक्ष उत्पादनांचा अनुभव घेता येईल, त्यावर प्रतिक्रिया देता येईल आणि सामुदायिक संवाद अधिक दृढ करता येईल. पुणे चॅप्टरमध्ये उपस्थितांना आरओजी जेफीरस जी१४, आरओजी फ्लो झेड १३, नुकतेच लाँच झालेले विवोबुक १४ फ्लिप आणि स्नॅपड्रॅगन-संचालित झेनबुक ए १४ यांसारख्या नाविन्यपूर्ण उत्पादनांबाबत माहिती मिळाली.

## सर्वात महत्त्वाकांक्षी उत्पादन पोर्टफोलिओ लाँच केला

छत्रपती संभाजीनगर - देशातील प्रमुख औद्योगिक क्लस्टर्स आणि ग्रोथ कॉरिडॉरना पाठबळ देण्याच्या उद्देशाने भारतीय इलेक्ट्रिकल आणि ऑटोमेशन क्षेत्रातील आघाडीची कंपनी लॉरिट्झ नूडसन इलेक्ट्रिकल अँड ऑटोमेशनने आज त्यांच्या आतापर्यंतच्या सर्वात मोठ्या उत्पादन पोर्टफोलिओचे अनावरण केले. या महत्त्वाकांक्षी उपक्रमाचा एक भाग म्हणून, ब्रँड देशातील ३० औद्योगिक शहरांमध्ये फिरून भारतातील उत्पादन आणि पायाभूत सुविधा केंद्रांच्या मध्यभागी तंत्रज्ञानाचा अवलंब वाढविण्यासाठी स्थानिक नेते, भागधारक आणि इकोसिस्टम भागीदारांशी संवाद साधत आहे.

## 'ग्लोबल व्हिजन अनव्हीलिंग' कार्यक्रमाची केली घोषणा

नाशिक - एक पेड माँ के नाम या मोहिमेअंतर्गत अवघ्या १ तासात ५ लाखांहून अधिक झाडे लावून, सेव्ह अर्थ मिशनने हवामान बदलाविरुद्ध ऐतिहासिक पाऊल उचलले आणि जगाचे लक्ष आपल्याकडे वेधले. या जागतिक विक्रम-निर्मिती कार्यक्रमाचे आंतरराष्ट्रीय स्तरावर कौतुक झाले आणि फोर्ब्स, फॉक्स, बिझनेस इनसाइडर, तसेच इतर प्रमुख राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय माध्यमांवर प्रमुखतेने प्रसिद्ध झाले.आता, सेव्ह अर्थ मिशन जागतिक स्तरावर आपली उपस्थिती नोंदवण्यासाठी सज्ज आहे.संस्थेने आपल्या सर्वात मोठ्या आंतरराष्ट्रीय कार्यक्रम - सेव्ह अर्थ मिशन ग्लोबल व्हिजन अन्वेल्िंग - ह्याची अधिकृत घोषणा केली आहे. हा कार्यक्रम सेव्ह अर्थ मिशन च्या जागतिक रणनीतीच्या सुरुवातीचे प्रतीक आहे, ज्याचा उद्देश २०४० पर्यंत ३० अब्ज झाडे लावणे आणि पृथ्वीला नेट झीरो कार्बन उत्सर्जनाच्या दिशेने नेणे आहे.

## लॉरिट्झ नूडसन इलेक्ट्रिकल अँड ऑटोमेशनने उत्पादन पोर्टफोलिओ लाँच

छत्रपती संभाजीनगर - देशातील प्रमुख औद्योगिक क्लस्टर्स आणि ग्रोथ कॉरिडॉरना पाठबळ देण्याच्या उद्देशाने भारतीय इलेक्ट्रिकल आणि ऑटोमेशन क्षेत्रातील आघाडीची कंपनी लॉरिट्झ नूडसन इलेक्ट्रिकल अँड ऑटोमेशनने आज त्यांच्या आतापर्यंतच्या सर्वात मोठ्या उत्पादन पोर्टफोलिओचे अनावरण केले. या महत्त्वाकांक्षी उपक्रमाचा एक भाग म्हणून, ब्रँड देशातील ३० औद्योगिक शहरांमध्ये फिरून भारतातील उत्पादन आणि पायाभूत सुविधा केंद्रांच्या मध्यभागी तंत्रज्ञानाचा अवलंब वाढविण्यासाठी स्थानिक नेते, भागधारक आणि इकोसिस्टम भागीदारांशी संवाद साधत आहे. कमी-व्होल्टेज, औद्योगिक ऑटोमेशन आणि नवीन ऊर्जा लँडस्केपसाठी आवश्यक उपायांवर लक्ष केंद्रित करून, लॉरिट्झ नूडसेन तंत्रज्ञानावर आधारित परिवर्तन घडवत आहे जे भारताच्या औद्योगिक केंद्रांपर्यंत पोहोचते. ही ऐतिहासिक मोहीम सरकारच्या विकसित भारत २०४७च्या दृष्टिकोनाशी सुसंगत असून, तंत्रज्ञानदृष्ट्या प्रगत, आर्थिकदृष्ट्या लवचिक आणि एनर्जी-स्मार्ट भारत निर्माण करण्याच्या कंपनीच्या वचनबद्धतेला अधोरेखित करते.

## खरेदी विक्री संघाच्या निवडणुकीत शिवशाही पॅनल विजयी

तभा वृत्तसेवा

कन्नड:दि.२८ जून -तालुका शेतकरी सहकारी खरेदी-विक्री संघाची निवडणुकीत१५ संचालक पदासाठी ३० उमेदवारांन मध्ये निवडणुक शनिवार(दि.२८) रोजी पार पडून जिल्हा बँकेचे माजी अध्यक्ष नितिन पाटील , माजी आमदार उदयसिंग राजपूत , किशोर पाटील,भाजपा जिल्हाध्यक्ष संजय खंबायते , शिवसेना तालुकाप्रमुख केतन काजे (शिंदेगट) शिवसेना तालुकाप्रमुख (उबाठा) यांच्या नेतृवाखाली असलेल्या शेतकरी विकास पॅनलचे सर्व उमेदवार पराभुत झाले तर तर आमदार संजना जाधव ,माजी उपनगराध्यक्ष जावेद शेख कृ उ बा सभापती डॉ. मनोज राठोड , उपसभापती जयेश बोरसे , साईनाथ आल्टाड



यांच्या नेतृवाखाली असलेल्या शिवशाही पॅनल चे सर्व उमेदवार विजयी झाले आसुन यात सोसायटी मतदार संघात १०६ पैकी १०६ मतदान होऊन ६ मतदान बाद झाले विजयी उमेदवार व मिळालेले मतदान रंगनाथ आल्हाड ६३ (सर्वाधिक मतदान), भगवान कांदे ५९, राजकुमार गंगवाल ६२, रामेश्वर घनकर ५५, ज्ञानेश्वर निकम ५६, आकाश बोलधने ५६, प्रविण राठोड ५२.

वैयक्तिक मतदार संघात ६२० पैकी ५८२ मतदान होऊन २६ मतदान बाद झाले

विजयी उमेदवार व मिळालेले मतदान - अब्दुल वाहब अब्दुल असद ३०२, निरंजन चव्हाण ३४५, आप्पासाहेब जाधव ३११

महीला राखिव मतदार संघात विजयी उमेदवार व मिळालेले मतदान - मिनाबाई बन्सीधर निकम ३७४, सुनिता उल्हास मालोदे ३६०

इतर मागासवर्गीय मतदार संघात विजयी उमेदवार व मिळालेले मतदान - प्रताप गुजर ३८३

अनुसुचीत जाती जमाती मतदार संघात विजयी उमेदवार व मिळालेले मतदान -लक्ष्मण साठे ३४४

विमुक्त व भटक्या जाती विजयी उमेदवार व मिळालेले मतदान -प्रकाश राजपूत ३९८

निवडणुक निर्णय अधिकारी साय्यक निबंधक विनय धोटे, साय्यक निर्णय अधिकारी सुनिल कासतोडे, मतदान केंद्र अध्यक्ष पी . आर. जगरवाल, के.एस.चव्हाण, डि.आर. केदारे,मतदान अधिकारी टि. बी.काळे यांनी तर सुरक्षा पोलिस उपनिरीक्ष के.फे. जारवाल, चांद मेंडेके, पोहेकाँ संजय आटोळे तर वैयक्तिक मतदार संघातील ६२० पैकी ५८२ मतदान झाले

## संघ संस्कारामुळेच राज्यकर्त्यातील कार्यकर्ता घडतो

### मराठवाडा युवक विकास मंडळातर्फे संवाद कार्यक्रमात मंत्री लोढा यांची उपस्थिती

छत्रपती संभाजीनगर/ प्रतिनिधी संघ संस्कारामुळेच राज्यकर्त्यातील कार्यकर्ता घडतो, असे प्रतिपादन कौशल्य विकास, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी केले. ते मराठवाडा युवक विकास मंडळातर्फे अभाविप प्रांत कार्यालय महालक्ष्मी चौक एन २ सिडको येथे गुरुवारी आयोजित संवाद कार्यक्रमात बोलत होते.

याप्रसंगी प्रवीण घुगे, मंडळाचे अध्यक्ष नरहरी शिवपुरे, सचिव ड.अरविंद केंद्रे, प्रा. गजानन सानप, रत्नाकर कुलकर्णी, दिवाकर कुलकर्णी, किरण पाटील, सविता कुलकर्णी, योगिता पाटील, मिलिंद पोहनेरकर, केशव पारटकर, प्रा. नवनाथ आघाव यांची प्रमुख उपस्थिती होती. संवाद कार्यक्रमात मुलाखतकार सुहास वैद्य यांनी विविध प्रश्नावर लोढा जिना बोलते केले. ते पुढे म्हणाले लहानपणापासूनच माझ्यावर संघाचे संस्कार झाले. महाविद्यालयीन जीवनात विद्यार्थी परिषदेत कार्यरत होतो. विद्यापीठ निवडणुकांमध्ये हिरीरीने सहभाग देखील घ्यायचो. संघर्षशील जीवनाचा राजकारणात उपयोग होत आहे. मराठवाड्यात रोजगार कसा वाढेल, यासाठी कौशल्य विभागामार्फत विशेष प्रयत्न करण्यात येणार आहेत. मराठवाडा युवक विकास मंडळाने छत्रपती संभाजीनगरला नवीन आयटी कंपन्या येऊन स्थानिक युवकांना रोजगार उपलब्ध झाला पाहिजे यासाठी पुढाकार घेतला आहे. यासाठी सर्वतोपरी मदत करण्याचे यावेळी आश्वासित देखील केले. या कार्यक्रमात सरस्वती भुवनचे नवनियुक्त प्राचार्य सतीश पाटील, आयएमआयचे नवनिर्वाचित अध्यक्ष डॉ. अनुपम टाकळकर, डॉ. अश्विन रांजणीकर यांचा मंत्री मंगलप्रभात लोढा यांच्या हस्ते शाल, पुस्तक व पुष्पगुच्छ देऊन सन्मानित करण्यात आले.

कार्यक्रमास अभाविप प्रांत मंत्री वैभवी डिवरे, प्रा. सर्जेराव जिगे, अविनाश जागीरदार, मनोज शेवाळे, अनिल टाकळकर, सुरेश मुंडे, डॉ. रमेश जायभाय यांची उपस्थिती होती. सूत्रसंचालन तृप्ती पालोदकर यांनी केले तर कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरिता डॉ. मनोहर बनस्वाल, वंदना मातेकर, अनंत सोनैकर, शिवा देखने, ज्ञानेश्वर शिंदे यांनी परिश्रम घेतले.

## विनयभंग प्रकरणी मालपूर येथील एकास कारावास व दंड

तभा वृत्तसेवा

कन्नड :- दि.२८ जून - तालुक्यातील मालपूर ( बहिरगाव ) येथे एका महिलेला रस्त्यावर अडवून विनयभंग केल्या प्रकरणी मालपूर येथील कैलास रावसाहेब म्हसरुप रा. मालपुर ता. कन्नड या आरोपीतास कन्नड येथील प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी श्रीमती विजया काटकर यांच्या न्यायालयात विविध कलमाखाली १२ महिने १५ दिवसाचा कारावास व ६० दिवसाच्या आत १ एक लाख रुपये पिडीतास दयावे नसता ४५ दिवसाचा कारावास अशी शिक्षा सुनावली आहे.सदर प्रकरण १७ जानेवारी २०१८ रोजीचे असून या रोजी आरोपिताने सायंकाळी फिर्यादी महिलेला पांदी रस्त्यात अडवून लज्जा वाटेल असे बोलून विनयभंग करण्यात आला होता. कन्नड शहर पोलिस ठाण्यात याबाबत गुन्हा दाखल करण्यात आला होता. या घटनेचा तपास पोलिस हवालदार किरण गंडे यांनी करून दोषारोप दाखल करण्यात आले होते.तपासीक अंमलदार तथा पोलीस हवालदार किरण गंडे यांनी गुन्हयाचा सखोल तपास करुन,

आरोपी कैलास रावसाहेब म्हसरूप याच्या विरुध्द खटल्याचे शासकीय अभियोक्ता डि.ए. शेळके यांनी न्यायालयासमक्ष योग्य तो युक्तीवाद करुन सबळ असे पुरावे निदर्शनास आणून दिले. कन्नड कोर्ट पैरवी म्हणुन पोलीस हवालदार गणेश चेळेकर व पोलीस अंमलदार सुशिल सुरवडे यांनी काम पाहिले आहे.

सदर खटल्यामधील आरोपीस शिक्षा लावल्याची ऊत्तम कामगिरी कन्नड उप विभागीय पोलीस अधिकारी विजयकुमार ठाकुरवाड, कन्नड शहर पोलिस निरीक्षक आर.बी. सानप यांच्या मार्गदर्शनाखाली तपासीक अंमलदार पोलीस हवालदार किरण गंडे, कोर्ट पैरवी पोलीस हवालदार गणेश चेळेकर व पोलीस अंमलदार सुशिल सुरवडे यांनी केली आहे.

## सोयगाव आगारात दाखल झालेल्या नवीन ५ अत्याधुनिक बसेसचे लोकार्पण



तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.२८ जून

सोयगाव आगारात दाखल झालेल्या नवीन ५ अत्याधुनिक बसेसचे लोकार्पण आमदार अब्दुल सत्तार यांच्याहस्ते संपन्न झाले.सोयगाव येथील आगारात हा कार्यक्रम पार पडला. आमदार अब्दुल सत्तार यांच्या पुढाकाराने सोयगाव आगरासाठी पहिल्या टप्यात १० अत्याधुनिक बस मंजूर झालेल्या असून त्यातील ५ बसेस आज सोयगाव आगरास प्राप्त झाल्यात.उर्वरित बसेस लवकरच सोयगाव आगारात दाखल होणार असल्याची माहिती आमदार अब्दुल सत्तार यांनी यावेळी बोलतांना दिली.नवीन अत्याधुनिक बससेवा अधिक सुरक्षित,आरामदायक आणि पर्यावरण पूरक प्रवासाचा अनुभव देण्याच्या उद्देशाने सुरू करण्यात आल्या आहेत.विशेष म्हणजे साध्या दरात या बसने प्रवास करता येणार असल्याने प्रवाशांनी या सुविधेचा लाभ घ्यावा असे आवाहन आ.अब्दुल सत्तार यांनी केले.

सिल्लोड आणि सोयगाव आगाराला नवीन बस मिळाव्यात तसेच दोन्ही बस स्थानकात विकास कामे करणे व प्रवाशांना अधिकाधिक सुविधा देण्यासंदर्भात दि.१८ मार्च २०५ रोजी मुंबई येथे आ.अब्दुल सत्तार व परिवहन मंत्री ना. प्रताप सरनाईक यांच्या प्रमुख उपस्थितीत बैठक झाली होती. सिल्लोड व सोयगाव आगारास प्रत्येकी २० नवीन बसेसची उपलब्धता करून देण्याची मागणी आ.अब्दुल सत्तार यांनी केली होती.त्यानुसार मंत्री प्रताप सरनाईक यांनी सिल्लोड आणि सोयगाव आगरासाठी तात्काळ प्रत्येकी ५ या प्रमाणे १० बसेस प्राथमिक स्तरावर उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेतला. यापूर्वी सिल्लोड ला ५ नवीन बस मिळाल्या तर त्यातील पाच बसेस आज सोयगाव आगारास उपलब्ध झालेल्या आहेत.त्याचा लोकार्पण सोहळा मान्यवरांच्या उपस्थितीत पार पडला.

याप्रसंगी शिवसेना उपजिल्हाप्रमुख प्रभाकर ( आबा ) काळे,तालुकाप्रमुख धरमसिंग चव्हाण,शहरप्रमुख संतोष बोडखे, माजी जि. प. अध्यक्ष श्रीराम पा. महाजन, माजी उपाध्यक्ष केशवराव पा. तायडे, माजी सभापती रामदास पालोदकर, सिल्लोडचे माजी उपगराध्यक्षा विनोद मंडलेचा, सोयगाव नगरपंचायत शिवसेना गटनेता अक्षय काळे, नॅशनल सूतगिरणीचे संचालक राजेंद्र ठोंबरे, प्रशांत क्षीरसागर, गोपीचंद जाधव तसेच आगार प्रमुख मनीष जवळीकर,स्थानक प्रमुख सतीश अंभोरे, सहाय्यक वाहतूक निरीक्षक कैलास बागुल यांच्यासह युवासेनेचे कुणाल राजपूत,नगरसेवक कदिर शहा,रमेश गव्हाडे, सामाजिक कार्यकर्ते श्रावण राठोड,श्रावण जाधव,सरपंच सुरेश चव्हाण, विक्रम चौधरी,जीवन पाटील,भारत तायडे,मोतीराम पंडीत,सोयगाव आगारातील आगार प्रमुख मनिष जवळेकर, स्थानक प्रमुख संतिष अंभोरे,सहाय्यक वाहतूक निरीक्षक कैलास बागुल,वाहतूक नियंत्रक ज्ञानेश्वर वाडेकर,सह प्रशासकीय यांत्रिकी व चालक,वाहक मोठ्या संख्येने आदिंची उपस्थिती होती.

## बिडकीन येथील ब्लु व्हॅली इंग्लिश स्कुल मध्ये 'एक पेड माँ के नाम' उपक्रम झाडे लावुन साजरा



बिडकीन दि २८ जून - पैठण तालुक्यातील बिडकीन येथील शेठ मोतीलाल तोतला शैक्षणीक संस्था संचलित ब्लु व्हॅली इंग्लिश स्कुल मध्ये 'एक पेड माँ के नाम' हा उपक्रम झाडे लावुन मोठ्या उत्साहामध्ये पार पडला. या उपक्रमामध्ये प्रमुख उपस्थिती म्हणुन बिडकीन शालेय केंद्रप्रमुख रमेश पवार सर हे उपस्थित होते. प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते सरस्वती पुजनाने कार्यक्रमाची सुरूवात करण्यात आली. शाळेचे संस्थापक अध्यक्ष सतिश तोतला व शाळेच्या मुख्यध्यापीका सविता तोतला यांच्या हस्ते प्रमुख पाहुण्याचे शाल व श्रीफळ देवुन सत्कार करण्यात आला. रमेश पवार सर यांनी शाळेच्या कामकाजाचे कौतुक करुन पुढील होणाऱ्या वाटचालीस शुभेच्छा दिल्या तसेच सर्व विद्यार्थ्यांना झाडे लावण्याचे उपयोग व फायदे सांगितले. विद्यार्थ्यांसाठी हा उपक्रम असल्यामुळे शाळेतिल सर्व विद्यार्थ्यांनी आपल्या सोबत वेगवेगळ्या फुलाचे व फळाचे झाडे सोबत घेवुन आले. व ते सर्व झाडे प्रमुख पाहुण्यांच्या उपस्थिती मध्ये शालेय परीसरा मध्ये लावण्यात आली. या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन शाळेचा विद्यर्थी कुणाल चव्हाण याने केले. तर आभार प्रदर्शन वर्षा चव्हाण यांनी केले. हे अभियान यशस्वी करण्यासाठी शाळेतील सर्व विद्यार्थी, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी परीश्रम घेतले.

## शिवेंद्र प्रमोद काकडे याचे नवोदय परीक्षेत यश



पैठण दि २८ :- भारतीय शिक्षण प्रसारक संस्था, अंबाजोगाई द्वारा संचलित आर्य चाणक्य प्राथमिक विद्यामंदिर, पैठण येथील विद्यार्थी चि.शिवेंद्र प्रमोद काकडे यांची नवोदय परीक्षेत यश संपादन केले आहे. शैक्षणिक वर्ष २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या जवाहर नवोदय परीक्ष द्वारे चि.शिवेंद्र प्रमोद काकडे यांची निवड जवाहर नवोदय केंद्रीय विद्यालय, कन्नड येथे झाली आहे. विशेष म्हणजे विविध स्पर्धा परीक्षा मंथन , ऑलिम्पियाड, शिष्यवृत्ती परीक्षेत देखील घवघवीत यश संपादन शिवेंद्र ने मिळविले आहे. विशेष म्हणजे या शैक्षणिक वर्षातील हा तिसरा विद्यार्थी नवोदय पात्र ठरला आहे.शहरी भागातील विद्यार्थ्यांमध्ये आर्य चाणक्य प्राथमिक विद्या मंदिराच्या मुलांनी आत्तापर्यंत बाजी मारली हे विशेष त्यामध्ये चि.सोहम नितीन देशपांडे व चि. समर्थ गणेश फटांगडे यांनी नवोदय परीक्षेत हे देखील विद्यार्थी पात्र ठरले आहे.जिल्ह्यातील शहरी भागासाठी सर्व साधारण गटासाठी (खुला गट )९ जागा असतात त्यापैकी ३ विद्यार्थी आर्य चाणक्य प्राथमिक विद्यामंदिर, पैठण चे आहेत. या यशाबद्दल शिवेंद्र चे, त्याच्या पालकांचे व मार्गदर्शक शिक्षकांचे अभिनंदन शाळेचे डॉ. पद्मकुमार कासलीवाल,जुगलकिशोर लोहिया, ,विद्यासभा अध्यक्ष भा.शि.प्र. डॉ.जयंत जोशी,भा.शि.प्र संस्था केंद्रीय सदस्य विजय चाटुपळे,डॉ.राम लोंढे शिवाजी मारवाडी, नंदकिशोर मालानी,डॉ. अशोक पल्लोड,किशोर चौहान,किशोर भाकरे , प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक भास्कर कुलकर्णी, माध्यमिक विभागाच्या मुख्याध्यापिका ज्योती जोशी आदींनी केले.

## माझे पात्र क्वचितच बोलते पण नेहमीच बाजी मारून जाते

सोनी सबवरील 'तेनाली रामा' ही एक ऐतिहासिक मालिका आहे. या मालिकेत तेनाली (कृष्ण भारद्वाज) रामाच्या चातुर्याच्या आणि सुजाणतेच्या रोचक कथांची मांडणी केली आहे. ही मालिका सर्व वयोगटातील लोकांच्या पसंतीस उतरली आहे. या मालिकेतील एक अत्यंत मनोरंजक पात्र आहे, विजयनगर साम्राज्यातील कोतवालाचे. हा शांत स्वभावाचा कोतवाल निखिल आर्य या अभिनेत्याने खूप ताकदीने आणि गांभीर्याने साकारला आहे. अत्यंत तीव्र, उत्कट प्रसंगांमध्ये देखील त्याचा शांत, अबोल परफॉर्मन्स उठून दिसतो. या मनमोकळ्या संभाषणात निखिल आर्यने या मालिकेविषयी, आपल्या प्रभावी व्यक्तिरेखेविषयी आणि आपल्या सह-कलाकारांशी असलेल्या नात्याविषयी सांगितले आहे.

## सक्षम पालक असल्याचे सिद्ध करण्याचा कैरीचा प्रयत्न

सोनी सबवर अलीकडेच सुरू झालेली 'उफ्फ ये लव है मुश्किल ...' ही मालिका त्यातील लोभस व्यक्तिरेखा आणि नव्या प्रकारच्या कथानकामुळे लगेच लोकांची आवडती झाली आहे. मालिकेची नायिका कैरी शर्मा (आशी सिंह) एक होतकरू वकील आहे आणि खूप परिश्रमानंतर स्वतःसाठी आणि आपल्या भावंडांसाठी एक स्थिर भविष्य निर्माण करण्याची धडपड करत आहे. पण तिला सतत आयुष्यात धक्के मिळत असतात. कैरीच्या प्रवासात युग (शब्बीर अहलूवालिया)ची मोठी भूमिका आहे. युग एक हुशार आणि गंभीर प्रकृतीचा वकील आहे. त्याचा एक भूतकाळ आहे, ज्यातून त्याचे व्यक्तिमत्व घडले आहे. त्यामुळे या दोघांचा संबंध तितकाच गुंतागुंतीचा आणि तरीही आकर्षक आहे.

## रणविजय सिंघा झी टीव्हीवरील 'छोरियाँ चली गाव' या शो चे सूत्रसंचालन करण्यासाठी सज्ज

भारताच्या विविधतेचा आणि भावनिक सखोलपणाचा उत्सव साजरा करणाऱ्या वेगळ्या नॉन-फिक्शन फॉरमॅटच्या परंपरेला पुढे नेत झी टीव्ही वाहिनी 'छोरियाँ चली गाव' या शो ची सुरुवात करण्यासाठी सज्ज आहे. हा ताज्या दमाचा आणि खास रिॲलिटी शो इंडिया आणि भारत या दोन जगांना एकत्र आणतो. 'आपका अपना झी' या नवीन ब्रँड ओळखीअंतर्गत हा शो प्रेक्षकांना परिवर्तन, सांस्कृतिक एकरूपता आणि मानवी नात्यांच्या हृदयस्पर्शी प्रवासावर घेऊन जाण्याचे वचन देतो.

## अग्रलेख...

# संरक्षण मंत्र्यांची 'पोलादी' भूमिका

शांघाय सहकार्य संघटनेची (एससीओ) चीनमधील किंगदाओ येथे नुकतीच झालेली शिखर परिषद भारताच्या कठोर भूमिकेमुळे चर्चेचा विषय ठरली. कोणत्याही आंतरराष्ट्रीय परिषदेच्या समारोपानंतर सदस्य देशांच्या स्वाक्षरीने एक संयुक्त निवेदन जारी केले जात असते. हे निवेदन म्हणजे त्या परिषदेच्या बैठकीतील कामकाजाचा एकप्रकारचा आढावा आणि पुढील वर्षाच्या कामाचा आराखडा असतो. पण यावेळी शांघाय सहकार्य संघटनेच्या बैठकीचे संयुक्त निवेदन जारी न होताच सूप वाजले. दहशतवादाच्या मुद्यावर या परिषदेतील सदस्य देशांच्या दुटप्पी भूमिकेमुळे हे घडले. तोंडाने दहशतवाद आणि दहशतवादी घटनांचा निषेध करायचा, मात्र प्रत्यक्ष कृतीची वेळ आली की कच खायचा, याचे दर्शन यातून जगाला घडले.

शांघाय सहकार्य संघटनेची स्थापना २००१ मध्ये शांघायमध्येच चीन, रशिया, भारत, पाकिस्तान, किर्गीस्तान, कजाकिस्तान, तजाकिस्तान आणि उजबेकिस्तान या आठ देशांनी एकत्र येत केली होती. परस्पर सहकार्य आणि सुरक्षा हा संघटना स्थापन करण्यामागचा उद्देश होता. मात्र या संघटनेच्या स्थापनेमागचे मूळ उद्दिष्ट हरवल्यासारखे झाले आहे. संघटनेच्या नावातील सहकार्य हरपल्यासारखे दिसते आहे. पहलगाम येथील अतिरेकी हल्ला तसेच सीमेपलीकडील दहशतवाद या मुद्यांचा संयुक्त निवेदनात समावेश करण्याची भारताची आग्रही भूमिका होती. पण चीन आणि पाकिस्तान तसेच अन्य देशांनी बोटचेपी भूमिका घेतली. भारतातर्फे परिषदेत सहभागी झालेले संरक्षण मंत्री राजनाथसिंह यांनी या संयुक्त निवेदनावर स्वाक्षरी करण्याचे नाकारत एकप्रकारे आपला निषेध नोंदवला. त्याचप्रमाणे दहशतवादाच्या मुद्यावर भारताच्या असलेल्या ठाम भूमिकेचेही जगाला दर्शन घडवले. भारताने संयुक्त निवेदनावर स्वाक्षरी करण्यास नकार दिल्यामुळे यावेळी संयुक्त निवेदन जारी न होताच या परिषदेचे कामकाज गुंडाळावे लागले. एकप्रकारे संघटनेची नाचक्की झाली. जगातील कोणत्याही भागात झालेल्या दहशतवादी घटनांचा निषेध करण्याची तसेच दहशतवादाला खतपाणी घालणाऱ्या देशांची जबाबदारी निश्चित करण्याची तसेच त्यांना आरोपीच्या पिंजऱ्यात उभे करण्याची राजनाथसिंह यांची मागणी होती.

शांघाय सहकार्य संघटना ही सदस्य देशाच्या संरक्षण मंत्र्याची बैठक असते. पहलगाम येथील दहशतवादी हल्ल्याला प्रत्युत्तर म्हणून तसेच दहशतवादापासून स्वत:चा बचाव करण्यासाठी आणि सीमेपलीकडून होणारे हल्ले रोखण्यासाठी भारताने आपल्या संरक्षणाच्या अधिकाराचा वापर करत ऑपरेशन सिंदूर राबवले, असे राजनाथसिंह यांनी परिषदेच्या बैठकीत भारताची भूमिका स्पष्ट करताना म्हटले. पहलगाम येथील हल्ल्याचा तसेच पाकसमर्थित दहशतवादी कृत्याचा उल्लेख संयुक्त निवेदनातून करण्यात यावा, या भारताच्या भूमिकेचा राजनाथसिंह यांनी पुनरुच्चार केला. असा उल्लेख झाला असता तर आंतरराष्ट्रीय व्यासपीठावर पाकिस्तान उघडा पडला असता, त्यामुळे पाकिस्तानच्या मदतीला त्याचा मित्र आणि तारणहार चीन नेहमीप्रमाणे धावून गेल्यामुळे पाकिस्तानची लाज राखली गेली. पहलगाम येथील अतिरेकी हल्ला पाकिस्तानातील लष्कर-ए-तोयबाशी संलग्न 'द रेझिस्टन्स फ्रंट' या संघटनेने केला होता. या संघटनेची कार्यपद्धती लष्कर-ए- तोयबासारखीच होती. ऑपरेशन सिंदूरच्या माध्यमातून भारताने पाकिस्तानमधील दहशतवाद्यांची ठिकाणे उद्ध्वस्त केली. सदस्य देशांनी सामूहिक सुरक्षा आणि रक्षणासाठी दहशतवादाचा जगाला भेडसावणारा धोका कायमस्वरूपी नष्ट करण्यासाठी एकत्र येण्याचे आवाहनही राजनाथसिंह यांनी केले होते.

गेल्या काही वर्षांत संयुक्त राष्ट्र, शांघाय सहकार्य संघटना, ब्रिक्स आदी संघटना आपले औचित्य हरवून तर बसल्या नाहीत, असे वाटते. मुळात ज्या कारणांसाठी या संघटनांची स्थापना करण्यात आली होती, त्याच्या मूळ स्वरूपापासून त्या विचलित झाल्याचे जाणवते आहे. त्यामुळे अनेकदा नेमकी आणि कठोर भूमिका घेण्याऐवजी या संघटना जगातील तथाकथित महाशक्तीच्या दबावासमोर झुकल्याचे अनेक घटनांवरून दिसून येत आहे. विशेष म्हणजे शांघाय सहकार्य संघटनेच्या बैठकीत पहिल्यांदाच असे झाले नाही, तर यावेळी लागोपाठ दुसऱ्यांदा असे झाले आहे. याआधी २०२४ मध्ये झालेल्या बैठकीतही चीन आणि पाकिस्तान यांनी भारताची कोंडी केली होती. त्यावेळी कजाकिस्तानमधील अस्ताना येथे ही बैठक झाली होती. या बैठकीच्या घोषणापत्रातही पाकपुरस्कृत दहशतवादी संघटनांचा उल्लेख करण्यात आला नव्हता. दहशतवादाच्या मुद्यावर चीन आणि पाकिस्तान घेत असलेल्या दुटप्पी भूमिकेवर भारताने तेव्हाही नाराजी व्यक्त केली होती. यावेळीही बैठकीच्या संयुक्त निवेदनात लष्कर-ए-तोयबा आणि जैश-ए-मोहम्मदसारख्या दहशतवादी संघटनांचा नावानिशी उल्लेख करण्याची भारताची मागणी होती, पण चीन आणि पाकिस्तान यांनी याला विरोध केला. या दोन्ही संघटना पाकिस्तानमधील असल्यामुळे पाकिस्तानने त्याला विरोध करणे समजण्यासारखे आहे, मात्र चीनने याला विरोध करण्याचे कारण काय? पाकिस्तान आपला मित्रदेश असल्यामुळे त्याची पाठराखण करणे एवढीच चीनची यामागील भूमिका आहे की भारताला डिवचण्यासाठी चीन पाकिस्तानची पाठराखण करण्याची भूमिका तर घेत नाही ना, अशी शंका घ्यायला जागा आहे. पाकिस्तानमध्ये चीनचे हितसंबंध दडले आहेत. बेल्ट अँण्ड रोड अभियान (बीआरआय) हा चीनचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प पाकिस्तानातच आहे. हा प्रकल्प व्याप्त काश्मिरातून भारताच्या काश्मीरपर्यंत येतो आहे. यामुळे भारताच्या सुरक्षेला गंभीर असा धोका पोहोचू शकतो, त्यामुळे बीआरआय प्रकल्पाला भारताचा विरोध आहे. हा प्रकल्प म्हणजे चीन आणि पाकिस्तान यांच्यातील आर्थिक सहकार्याचा पाया आहे. त्यामुळे या करारात सहकार्य आणि इन्फ्रास्ट्रक्चर क्षेत्रातील सहकार्याचे आवाहन करण्यात आले होते. एकंदरीत शांघाय सहकार्य संघटनेचा उपयोग चीन आणि पाकिस्तान आपल्या हितसंबंधांचे रक्षण करण्यासाठी तसेच भारताची कोंडी करण्यासाठी करत आहे. एकप्रकारे या दोघांनी ही संघटना हायजॅक केली, असे म्हटले तरी ते चूक ठरू नये.

भारत आणि चीन या संघटनेशिवाय ब्रिक्स या समूहातही सोबत आहे. ब्रिक्समध्ये ब्राझील, रशिया, भारत, चीन आणि दक्षिण आफ्रिका हे देश आहेत. विशेष म्हणजे शांघाय सहकार्य परिषद आणि ब्रिक्स या दोन्ही संघटनेत चीनचा वरचष्मा आहे. ब्रिक्समध्ये पाकिस्तान नसला तरी या दोन्ही संघटनांच्या माध्यमातून चीन भारताची कोंडी करण्याचा प्रयत्न करत आहे, असे म्हटले तर ते चूक ठरू नये. शांघाय सहकार्य संघटनेतील भारत वगळून अन्य देशांना चीनने आपल्या बाजूला वळवल्याचा संशय येतो. कारण यातील सदस्य देशांपैकी कोणीच भारताच्या बाजूने आवाज उठवला नाही, वा भारताच्या दहशतवादाविरोधातील भूमिकेला पाठिंबा दिला नाही. त्यामुळे मग भारताने ब्रिक्स आणि शांघाय सहकार्य संघटनेतून बाहेर पडावे, अशी चर्चा होते. पण या दोन्ही संघटनांतून बाहेर पडले तर भारताचेही काही प्रमाणात नुकसान होऊ शकते. त्यामुळे या दोन्ही संघटनांतून बाहेर न पडता भारताने चीन आणि पाकिस्तानच्या दादागिरीविरुद्ध आवाज उठवला पाहिजे. भारताने या दोन्ही संघटनांतून बाहेर पडणे, हे एकप्रकारे चीन आणि पाकिस्तानच्या पथ्यावर पडण्यासारखे आहे. त्याऐवजी या दोन्ही संघटनांतील अन्य देशांना आपल्या बाजूला वळवण्यासाठी भारताने पावले उचलली पाहिजेत. संरक्षण मंत्री राजनाथसिंह यांनी संयुक्त निवेदनावर स्वाक्षरी न करता चीन आणि पाकिस्तान यांना धडा शिकवला आहे. भारताच्या भूमिकेमुळे चीन आणि पाकिस्तान तोंडघशी पडले. वेगवेगळ्या मुद्यांवर घेतलेल्या कठोर आणि राष्ट्रवादी भूमिकांमुळे सरदार वल्लभभाई पटेल यांचा उल्लेख देशाचे पोलादी गृहमंत्री असा केला जात होता, त्या मालिकेत आता भारताचे पोलादी संरक्षणमंत्री म्हणून राजनाथसिंह यांचा उल्लेख करावा लागेल. कारण त्यांनी चीन आणि पाकिस्तानला धडा शिकवला आहे.

## यंगिस्तान

### जयेश शत्रुघ्न मेस्त्री

# शहरी नक्षलींच्या माथी हाणू काठी...

प्रभू श्रीराम वनवासात असताना अचानक एक सुंदर सुवर्ण रंगाचे हरिण माता सीतेला दिसले. त्याच्या शरीरावर चंदेरी ठिपके होते. त्याची शिंगे रत्नांची होती. ते सोनेरी-चंदेरी हरिण पाहून सीता खूप आश्चर्यचकित झाली. तिने रामाला हरिण पकडून आपल्याकडे आणण्याची विनंती केली. लक्ष्मणाने सांगितले की, हे भ्रामक हरिण आहे. परंतु मातेने असहमती दर्शवली. पत्नीचा हट्ट पाहून प्रभू त्या हरणाच्या मागे गेले आणि त्या हरणाची शिकार केली. बाण लागल्यावर ते हरिण ओरडले, लक्ष्मणा! सीता, वाचवा मला! ही हाक सीतेने ऐकली तेव्हा तिला काळजी वाटली म्हणून हट्टाने लक्ष्मणाला तिने रामाला शोधायला पाठवलं. त्यानंतर रावणाने माता सीतेचे अपहरण केले. पुढचं सगळं रामायण तुम्हाला माहिती आहे. पण मुद्दा असा आहे की सुंदर हरणाचं रूप घेणारा राक्षस कोण होता? त्याचं नाव होतं मारीच. मारीच हा मायावी राक्षस होता. रावणाला सीतेचं अपहरण करता यावं म्हणून राम व लक्ष्मणाला दूर घेऊन जाण्यासाठी त्याने हे रूप धारण केलं होतं. त्याच्या या कृत्यामुळे रावणाला सहजतेने सीतेचं अपरहण करता आलं होतं. मारीच राक्षस हे प्रलोभनाचं प्रतीक आहे, मोहात पाडण्याचं प्रतीक आहे. पण हे प्रलोभन, हा मोह पुढे जाऊन खूप मोठे संकट आणतो. सीता माता हे हिंदू समाजाचं प्रतीक आहे. अशा प्रलोभनांना, मोहाला भुलून हिंदू स्वतःलाच संकटात टाकत असतो.

दरवर्षीप्रमाणे पंढरपूरची वारी सुरू झाली आहे. आषाढी एकादशीला मोठा उत्सव होणार, मग या वारीची सांगता होईल. या वारीचं वैशिष्ट्य आपण लक्षात घेतलं पाहिजे. महाराष्ट्रावर जिहादी आक्रमण झालं आणि यादव साम्राज्य पडलं. तेव्हाही पंढरपूरची वारी सुरू होती. छत्रपती शिवाजी महाराजांनी जिहादी प्रवृत्तींविरुद्ध तलवार उचलली त्याआधी आपल्या संतांनी हिंदुत्वाची ज्योत प्रत्येकाच्या मनात तेवत ठेवली आहे आणि यातले बहुतांश संत हे वारकरी परंपरेतील आहेत, विठ्ठलाचे भक्त आहेत. ''दिल्लीश्वरो वा जगदीश्वरो वा'' म्हणजे दिल्लीचा बादशाह (सम्राट किंवा महाराज नव्हे) हाच जगदीश्वर आहे, असं म्हणण्याची पद्धत रुजू झाली असताना आपल्या महाराष्ट्रात वारी सुरू होती. या वारीच्या माध्यमातून आपल्या संतांनी हिंदू धर्माचा ध्वज



फडकवत ठेवला होता. जर वारकरी संप्रदाय नसता तर महाराष्ट्रात हिंदू धर्मासाठी बिकट परिस्थिती निर्माण झाली असती. पुढे छत्रपती शिवाजी महाराजांनी भवानी तलवार धारण करून जिहाद्यांचा नायनाट केला आणि हिंदू साम्राज्य स्थापन केले. आपल्या संतांनी बऱ्याचदा कालबाह्य व असुरी सामाजिक रुढींवर टीका केली आहे. जातिभेदावर टीका केली आहे. मात्र म्हणून ते काही आजच्या संदर्भानुसार विद्रोही ठरत नाहीत. आपल्या संतांना विद्रोही ठरवण्याचा प्रचंड मोठा कट अनेक काळापासून रचला जात आहे. आता हे लोक काही वर्षांपासून वारीमध्ये घुसण्याचा प्रयत्न करत आहेत. या शहरी नक्षलींचे खरे चेहरे इतके राक्षसी आहेत म्हणून हे 'मारीच' बनून वारीमध्ये घुसत आहेत. ते जर त्यांचा खरा अजेंडा घेऊन आले तर त्यांचा चेहरा उघडा पडेल. म्हणून संविधान, समता, संविधान न मानणारे काफीर असतात इत्यादी मायावी शब्दप्रयोगांचा ते वापर करतात. हे लोक नास्तिक आहेत किंवा दुसऱ्याच एका विशिष्ट आकाशातल्या बापाला मानणारे आहेत. यांचा वारीशी, वारकरी संप्रदायाशी, विठ्ठलाशी आणि ज्ञानोबांपासून तुकोबांपर्यंत कोणाशीच कसलाही संबंध नाही. यांचा संबंध ब्रेकिंग इंडिया फोर्सेसशी आहे. यांना भारताचे तुकडे करायचे आहेत. हे ईश्वरभक्त तर नाहीतच परंतु देशभक्तही नाहीत, हे देशद्रोही आहेत. साधं लॉजिक आहे, वारकरी संविधान पाळतात मग वारकऱ्यांना संविधान शिकवून काय मिळवणार आहेत? संविधान त्यांना शिकवलं पाहिजे जे दंगली करतात, दगडं मारून लोकांचं आणि सार्वजनिक मालमत्तेचं नुकसान करतात, नक्षली कारवाई करतात. नागपूरमध्ये दंगल झाली तर ज्यांनी दंगल केली त्यांना संविधान नको का शिकवायला? काश्मीरमध्ये अतिरेक्यांना जे मदत करतात त्यांना नको का संविधान शिकवायला? जंगलात नक्षल्यांना जाऊन संविधान नको का शिकवायला? जे शांत, निर्मय, सात्त्विक, भक्तिमय व संवैधानिक जीवन जगतात त्यांना संविधान शिकवून काय होणार आहे? संविधान न मानणारा काफीर असतो हे अतिरेक्यांना व दंगली करणाऱ्यांना जाऊन सांगितलं पाहिजे की तुम्ही सर्वसामान्य जनतेला त्रास देऊ नका, ते संविधान मानणारे आहेत त्यामुळे ते काफीर नाहीत. उलट तुम्हीच संवैधानिक मूल्यांची हत्या करत आहात, त्यामुळेच तुम्ही काफीर आहात. ईद व ख्रिसमस हा सण विश्वभरात साजरा केला जातो, जगातल्या सर्वांत मोठ्या लोकसंख्येचा तो सण आहे. तिथे जाऊन समता, संविधान अशा गोष्टी केल्या तर त्याचा अधिक व जागतिक उपयोग नाही का होणार?

लक्षात घ्या, हे मारीच राक्षसाचे वंशज आजही आपल्यात वावरत आहेत. हिंदू समाजाने यांच्या प्रलोभनांना व मोहाला बळी पडू नये. लक्ष्मण काय सांगतोय यावर आपण लक्ष केंद्रित केलं पाहिजे आणि लक्ष्मणरेषा कधीही ओलांडू नये. ज्याप्रमाणे संतांनी हिंदूंमधील मागास प्रथांवर टीका केली तशी स्वा. सावरकरांनीही केली. मग सावरकरांना या लोकांनी कधी विद्रोही वगैरे म्हटल्याचे आठवते का? थोडक्यात काय तर हे लोक ढोंगी आहेत, भोंदू आहेत. यांना कोणतीही सुधारणा करायची नाही. यांना हिंदूंमध्ये फूट पाडायची आहे. भारताची शंभर शकले पाडायची आहेत. त्यामुळे हे मारीच बनून वारीमध्ये घुसले आहेत. संत तुकोबांनी अशा मारीच राक्षसांचा बंदोबस्त कसा करायचा हे सांगून ठेवले आहे. तुकोबा म्हणतात,

''भले तरी देऊ कासेची लंगोटी
नाठाळाचे माथी हाणू काठी''

writerjayeshmestry@gmail.com

## वेध

### विजय कुळकर्णी

# कोचिंग क्लास आणि शाळांचे टायअप

आमच्या पिढीने अनुभवलेले बालपण नव्या पिढीतील मुलांच्या वाट्याला येणे दुरापास्त झाले आहे. बाळ जेमतेम दोन अडीच वर्षांचे झाले की, त्याला प्लेग्रुपमध्ये पाठवले जाते. तेव्हापासूनच त्याचे बालपण संपते. आपल्या मुला-मुलींना शाळेची सवय झाली पाहिजे, हा त्यामागचा पालकांचा उद्देश असतो. आमच्या पिढीतील मुलं चार वर्षांची झाल्यावर बालक मंदिरात जात होती. त्यानंतर सहाव्या वर्षी पहिल्या वर्गात प्रवेश मिळत असे. मात्र, आता मूल बोलू लागलं की, त्याची आई त्याला कौतुकानं एबीसीडी म्हणायला शिकवते.

त्यानंतर केजी हा प्रकार सुरू होतो. मुलांना मराठी प्राथमिक शाळेत का नाही घालत, असे विचारले की, स्पर्धेत टिकण्यासाठी आपल्या मुला-मुलींना कॉन्व्हेंटमध्येच पाठवणे योग्य, असे उत्तर मिळते. केजीमध्येच प्रवेश घेताना शाळांकडून मोठ्या प्रमाणात शुल्क आकारले जाते. आजचा पालक ते भरण्यास तयार आहे. पुढे ८ वी ९ वी पासूनच त्या मुला-मुलींकडून दहावीच्या परीक्षेची तयारी करवून घेणे सुरू होते. ९ वीची परीक्षा संपली की, निकाल लागण्यापूर्वीच दहावीची तयारी सुरू. यावर्षी आपण कुठेच जायचं नाही. कोणी लग्नाचे आमंत्रण पाठविले तर, आमचा मुलगा/मुलगी यंदा दहावीत आहे ना. तेव्हा, आम्ही लग्नाला येऊ शकणार नाही, असे म्हणण्याची पद्धत सुरू झाली आहे. बाळूवर तर दहावीच्या परीक्षेचे खूपच टेन्शन आहे. मग, बाळूला एखाद्या नावाजलेल्या शिकवणी वर्गात घातले जाते. त्या कोचिंग क्लासची अवास्तव फी भरली जाते. त्या मुलाला दिवसभर शाळा आणि सकाळ, संध्याकाळ शिकवणी वर्गात पाठविले जाते. दहावी झाल्यावर लगेच १२ वीची तयारी सुरू होते. मग, एखाद्या नामांकित कोचिंग क्लासशी संपर्क साधला जातो. त्या कोचिंग क्लासचे संचालक त्यांचे ज्या महाविद्यालयाशी टायअप झालेले असते त्यात प्रवेश घेण्यास सांगतात. मग, ११ वीत कॉलेजमध्ये न जाताच मुलगा १२ वीत जातो. केवळ प्रात्यक्षिक परीक्षेपुरता शाळेत जातो. त्याची वर्षभराची हजेरी, प्रथमसत्र, सराव परीक्षांना गैरहजर असला तरीही हजर दाखविले जाते. कोचिंग क्लासशी कॉलेजचे टायअप असल्याने प्रात्यक्षिक परीक्षेचे गुण टाकले जातात.

मोठ्या शहरांमध्ये हे प्रकार अधिक आहेत. तेथील कोचिंग क्लासेसची फी देखील भरमसाट आहे. २ लाख रुपयांपर्यंत फी घेतली जाते. शिक्षण क्षेत्राचे बाजारीकरण झाले आहे. यावर नियंत्रण मिळविणे आवश्यक आहे. वास्तविक, शाळा किंवा महाविद्यालयात शिक्षकांना लाखाच्या जवळपास आणि प्राध्यापकांना दोन ते तीन लाख रुपये पगार मिळतो. सरकार शिक्षणावर करोडो रुपये खर्च करते. मग, विद्यार्थी कोचिंग क्लासकडे का वळतात? शिक्षक म्हणतात, विद्यार्थी शाळेत येत नाहीत आणि विद्यार्थी सांगतात शाळेत चांगले शिकवत नाहीत. पण, हेच विद्यार्थी कोचिंग क्लासेसमध्ये का जातात? याचा विचार होणे आवश्यक आहे. एखाद्या कनिष्ठ महाविद्यालयातील १२ वीच्या वर्गाला भेट दिल्यास त्या वर्गात फारच कमी विद्यार्थी दिसतात. तर, कोचिंग क्लासेसमध्ये जाऊन पाहिल्यास त्या खोलीत विद्यार्थी मावत नाहीत, अशी स्थिती दिसते. यावरून शाळा आणि कोचिंग क्लासेस ही आता समांतर व्यवस्था झाली आहे. वास्तविक शाळेतील शिक्षकांना लाख रुपयांच्या जवळपास पगार मिळतो व कोचिंग क्लासेसमध्ये शिकविणाऱ्या शिक्षकांना दहा, वीस हजार रुपये मिळत असतील. पण, कोचिंग क्लासमधील शिक्षक विद्यार्थ्यांना जीव तोडून शिकवितो. तशी काळजी शाळा, महाविद्यालयातील शिक्षक, प्राध्यापकांनी देखील घेतली पाहिजे. जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये तर, याहीपेक्षा बिकट परिस्थिती आहे. ८ वी, ९ वीतील विद्यार्थ्यांना गुणाकार, भागाकार देखील व्यवस्थित येत नाही, ही वस्तुस्थिती आहे. पण, सर्वच शाळांची अशी स्थिती नाही. तर, सर्वच विद्यार्थी देखील शिकवणी वर्गात जात नाहीत. अनेक शाळांमध्ये विद्यार्थ्यांना चांगले शिकविले जाते. त्यांची वैयक्तिक काळजी घेतली जाते. अशा शाळांची संख्याही मोठी आहे. तर, काही विद्यार्थी मुळातच हुशार असतात. त्यांना कोणत्याही कोचिंग क्लासमध्ये जाण्याची गरज नसते. शाळेत जे शिकवले ते मन लावून आत्मसात करून त्याचा घरी नियमित अभ्यास करतात. खरे म्हणजे मुळात विद्यार्थी हुशार असेल तर, त्याला कोणत्याही शिकवणीची गरज पडत नाही. तेव्हा, विद्यार्थ्यांनी नियमित शाळा, महाविद्यालयात जाऊन वर्गात शिक्षक शिकविताना लक्षपूर्वक आत्मसात केले व त्याचा घरी आल्यावर अभ्यास केल्यास कोणत्याही शिकवणी वर्गात जाण्याची गरज पडणार नाही. शिक्षकांनी शाळेतील प्रत्येक विद्यार्थी आपलाच मुलगा आहे, असे समजून शिकवल्यास कोचिंग क्लासेसचा धंदा बंद झाल्याशिवाय राहणार नाही.

८८०६००६१४९

## मुंबई वार्तापत्र

### नागेश दाचेवार

# ठाकरेंची फरफट आणि काँग्रेसची वटवट!

उबाठा गटाचे सातत्याने होत असलेले पतन बघता, पक्ष टिकविण्याची लागलेली चिंता आता उद्धव ठाकरेंना सतावत आहे. अस्तित्व कसे टिकवायचे यासाठी अत्यंत चिंतातुर झालेले उद्धव ठाकरे आता संपलेल्या पक्षाच्या मागे फरफटत चालल्याचे चित्र राज ठाकरेंच्या मोर्चाच्या निमित्ताने बघायला मिळत आहे. यावेळी राज ठाकरेंच्या मोर्चातील गर्दीत ''बेगानी शादी में अब्दुल्ला दिवाना'' होऊन उबाठाचे लोक नाचतानाचे चित्र महाराष्ट्रातील जनतेला बघायला मिळणार आहे. त्याचवेळी महाविकास आघाडीतील मोठा घटक पक्ष असलेल्या काँग्रेसच्या प्रदेशाध्यक्षोदेखील हिंदी द्वेषाची वटवट चालवलेली असल्याचे दिसते. मात्र, त्यांची ही वटवट राहुल गांधींना मान्य आहे का? हा खरा प्रश्न आहे. तसेही हर्षवर्धन सपकाळांनी आपण काँग्रेसमधील संजय राऊत असल्याचे अल्पावधीत सिद्ध केले असल्याने, राहुल गांधी त्यांना किती गंभीरतेने घेतात, हा वेगळाच प्रश्न आहे.

इंग्रजीचं महत्त्व राहणार नाही, आपल्याला भारतीय भाषांचा अभिमान वाटेल असे, अमित शाह एकदा म्हणाले होते. तेव्हा लगेच राहुल गांधींनी ट्विट करून इंग्रजीची तळी उचलली होती. यावेळी हिंदीच्या विषयावर राहुल गांधींना ट्विट करण्याचा विसर पडलेला आहे. ही यांची स्वदेश नीती आहे का? राज्यात हिंदी सक्तीच्या मुळात अस्तित्वात नसलेल्या कपोलकल्पित विषयावरून इतका गहजब माजलेला असताना, लहानसहान किरकोळ विषयात अत्यंत तत्परतेने नाक खुपसणारे, टिवटिव करणारे राहुल गांधी अजूनही गप्प का? महाराष्ट्रात हिंदीचा विरोध केला तर, उत्तरेकडील राज्यात फटका बसेल, अशी भीती मनात आहे की, होऊ घातलेल्या बिहार निवडणुकीत फटका बसण्याची धास्ती वाटत आहे. या कारणांनी राहुल गांधींनी चुप्पी साधली असावी का? काहीही असेल तरी, काँग्रेसच्या घटकपक्षाने घेतलेल्या भूमिकेवर गांधींना किंवा काँग्रेसला काहीतरी स्टॅण्ड घ्यावाच लागेल.

मविआचा घटकपक्ष असलेला उबाठा गटाने हिंदीला कडाडून विरोध चालवला आहे. दुसरीकडे तिसऱ्या घटकपक्षाचे प्रमुख शरद पवारांनी पहिली ते चौथी हिंदी सक्ती नको, पाचवीपासून पुढे चालेल. मराठीचा आग्रह आहे. कोणी म्हणते म्हणून, मोर्चात सहभागी होणार नाही. अशी सावध ''नरो वा कुंजरो वा'' भूमिका घेतली आहे. देशातील इंडिया आघाडीतील आणि राज्यातील महाविकास आघाडीतील घटकपक्ष हिंदीला कडाडून विरोध करत आहेत. त्यांच्या सुरात सूर काँग्रेसचे प्रदेशाध्यक्षदेखील मिळविताना दिसत आहेत. काँग्रेसच्या संगतीला जाऊन उद्धव ठाकरेंनी हिंदुत्व सोडलं आणि आता ठाकरेंच्या संगतीला जाऊन काँग्रेसने हिंदी सोडलं की काय असा प्रश्न यावेळी निर्माण झाला आहे. त्यामुळे काँग्रेसच्या प्रदेशाध्यक्षांनी घेतलेली हिंदीविरोधी भूमिका, अधिकृत पक्षाची



भूमिका असल्याचे राहुल गांधींनी स्वत: नाही तर किमान ट्विटवर करून तरी स्पष्ट करण्याची गरज आहे. कारण तामिळनाडू सोडता अन्य राज्यांनी त्रिभाषा सूत्र स्वीकारले आहे. ज्यात काँग्रेसची राज्ये तसेच इंडिया आघाडीतील घटक पक्षांच्या राज्यांचा समावेश आहे. त्यामुळे राष्ट्रीय पातळीवर इंडिया आघाडीची भूमिका हिंदी विरोधी नसल्याने राहुल गांधींची इकडे आड तिकडे विहीर अशी परिस्थिती झाली असल्याने, अद्याप राहुल गांधी या विषयावर मौन बाळगून असावेत.

**हिंदी सक्तीचा निर्णय ठाकरेंनीच घेतला**

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण- २०२० संदर्भात सखोल अभ्यास करण्यासाठी रघुनाथ माशेलकर यांच्या अध्यक्षतेत एका कृती दलाची स्थापना करण्यात आली होती. या कृती दलाने २०२२ मध्ये आपला अहवाल तत्कालीन मुख्यमंत्री उद्धव ठाकरेंच्या नेतृत्वातील मविआ सरकारच्या काळात सरकारला सादर केला होता. तो मविआ सरकारने उद्धव ठाकरेंच्या नेतृत्वात घेतलेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत स्वीकारला. त्या माशेलकर समितीच्या अहवालातील ८.१ परिच्छेदात त्रिभाषा सूत्री सक्तीचा उल्लेख केलेला आहे. यात पहिली ते बारावीदरम्यान, मराठी, इंग्रजी आणि हिंदी या तीन भाषा सक्तीच्या असल्या पाहिजेत, अशी शिफारस करण्यात आली आहे. सदर अहवाल उद्धव ठाकरेंनी आपल्या कॅबिनेटच्या बैठकीत स्वीकारला असल्याने सदर शिफारस सरकारला मान्य असून, ती राज्यात लागू करण्यास सरकार तयार आहे, असा त्याचा सरळ आणि स्पष्ट अर्थ निघतो. जर उद्धव ठाकरेंना मराठीविषयी प्रेम होतं, तर माशेलकर अहवाल सरकारसमोर आला तेव्हा त्यांनी तो स्वीकारण्याऐवजी नाकारायला हवा होता. एकीकडे आपण चूक करायची आणि उलट त्याच निर्णयाविरोधात पुन्हा मोर्चे काढायला सरसवायचे यापेक्षा दुसरी हास्यास्पद बाब नाही. यासोबतच दुसरीकडे याच मराठी भाषाप्रेमी ठाकरेंच्या युवराजांनी महापालिकेच्या मराठी शाळांमध्ये इंग्रजी सक्तीची मागणी लावून धरली होती. यांना इंग्रजीचं वावडं नाही मात्र हिंदीचा विरोध आहे. हा दुटप्पीपणा न कळण्याइतपत राज्यातील जनता दुधखुळी नाही. उद्धव ठाकरेंनी स्वीकारलेल्या अहवालावर पुढे आलेल्या फडणवीस सरकारने कार्यवाही करण्यास किंवा अंमलबजावणी करण्यास सुरुवात केली तर त्यात वावगं काय? आणि यातली महत्त्वाची बाब म्हणजे, उद्धव ठाकरेंनी हिंदी सक्तीच्या घेतलेल्या निर्णयाला फडणवीस सरकारने हिंदी सक्ती न करता, हिंदी ऐच्छिक करण्याचा निर्णय घेऊन, तसा शासन निर्णय जारी केला आहे. त्या निर्णयात अत्यंत स्पष्टपणे मराठी सक्ती आणि तिसरी भाषा ऐच्छिक असल्याचा उल्लेख करण्यात आला आहे. असे असताना आता मोर्चेकऱ्यांची मागणी आहे तरी काय? हा मोर्चा म्हणजे साप साप म्हणून भूई थोपटण्याचा प्रकारच म्हणावा लागेल.

**बॉम्बे क्वॉटिश शाळेविरोधात आंदोलन केले का?**

राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे यांची मुलं ज्या शाळेत शिकली, ती बॉम्बे क्वॉटिश शाळा मुंबईत ठाकरेंच्या निवासस्थानापासून फार जवळ आहे. या शाळेत मराठी तिसऱ्या क्रमांकावर शिकविली जाते. १९९५ मध्ये भाजप-सेना युतीचे सरकार असताना 'बॉम्बे' शहराचं नाव बदलून मुंबई असं करण्यात आलं होतं. त्यानंतर मुंबई बोलण्या आणि लिहिण्यासाठी आग्रह करणारी हीच मंडळी होती. मात्र, यांच्या मुलांची ही शाळा आजही 'बॉम्बे' नाव वापरते. त्यावर यांनी कधी आंदोलन केल्याचे किंवा विरोधात आवाज उठवल्याचे ऐकीवात नाही.

बरं एवढंच नव्हे या शाळेत इंग्रजी पहिली तर हिंदी आणि फ्रेंच दुसऱ्या क्रमांकाच्या भाषा म्हणून शिकवल्या जातात, तर मराठीला तिसऱ्या भाषेचा दर्जा दिला आहे. त्याहीपेक्षा दुर्दैव मराठी केवळ पहिली ते सातवीपर्यंतच शिकवले जाते. त्यापुढे मराठीचा लवलेशही नसतो. स्वत:ची मुलं येथे शिकत असल्याने आणि मराठीचा अभिमान असल्याने, या गोष्टींची जाण तर या ठाकरे बंधूंना असेल असं गृहीत धरायला हरकत नाही. मग यावेळी मराठी माणूस आणि मराठी भाषेच्या अस्मितेचा विसर कसा बरा ठाकरे बंधूंना पडला असावा? याविरोधात अजूनपर्यंत आवाज का उठवला नाही यांनी? केवळ राजकीय पोळी शेकण्याइतपत यांची मराठी अस्मिता आहे. यांचं मराठी प्रेम बेगडी आहे. नसलेल्या विषयासाठी मोर्चे काढायचे आणि असलेल्या विषयाकडे डोळेझाक करायची हा यांचा राजकीय धंद्याचा जुना फंडा आहे. यांच्या धंद्याला राज्यातील जनता ग्राहक बनून आता मूर्ख बणणार नाही, एवढं मात्र निश्चित!

९२७०३३३८८६

## चित्ताकर्षक दत्तावतार : स्वामी वासुदेवानंद सरस्वती

भारतीय संस्कृतीमध्ये विविध संप्रदाय, उपासना पद्धती या वैविध्यपूर्ण असून त्यांनी श्रेष्ठत्व प्राप्त केले आहे. प्रत्येक संप्रदायाने आपले संवर्धन करून अनुयायांना परमार्थ मार्गावर आरूढ होऊन मोक्षप्राप्ती करून घेण्यासाठी उपदेश केला आहे. भगवान श्री दत्त संप्रदाय हा त्या अनेकांपैकी एक असून त्यांचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. त्यांची महती प्रथम अवतार श्री श्रीपाद श्रीवल्लभ स्वामी महाराज पीठापूरम (आंध्र प्रदेश), श्री नृसिंह सरस्वती स्वामी महाराज संप्रदाय कारंजा ( विदर्भ) आणि यांचे जन्म गाव शोधून प्रसिद्धीस आणले आणि जनसामान्यांना ''दिगंबरा दिगंबरा श्रीपाद श्रीवल्लभ दिगंबरा'' हा अमृत महामंत्र ज्यांनी दत्त संप्रदायास दिला असे परम पूज्य परिव्रजकाचार्य श्री वासुदेवानंद सरस्वती स्वामी महाराज यांची पुण्यतिथी आषाढ शुद्ध प्रतिपदा म्हणजे गुरुवार २६ जून रोजी साजरी झाली.

या दिव्य विभूतीचे जन्मगाव माणगाव (कोंकण) असून आसेतुहिमालय दत्त ध्वजा फडकवणारे हे योगी महापुरुष होते. सन्यस्त आश्रमात चातुर्मास व्रताचरण अत्यंत महत्त्वाचे असते. स्वामींनी भारतातील विविध ठिकाणी एकूण २४ चातुर्मास मुख्यत: नर्मदा काठी व्यतीत केले. भंडारा जिल्ह्यातील वैनगंगा नदीकाठी तीर्थक्षेत्र पवनी यांचे पदस्पर्शाने पवित्र झाले आहे. स्वामींच्या जीवनाचे अवलोकन केले असता आद्य शंकराचार्य यांचे पश्चात् विविध तत्त्वज्ञान विषयांवर विपुल ग्रंथसंपदा निर्माण करणारे हे एकमेव योगी आहेत. श्री भगवान दत्तात्रेयाचे रूप हे सर्वगामी व स्मरतूगामी असेच असून यांचा परम चित्ताकर्षक अवतार म्हणजे श्री वासुदेवानंद सरस्वती स्वामी महाराज होय.

स्वामींचा गृहस्थाश्रम संपल्यानंतर आधीच अनासक्ती असलेली वृत्ती पूर्णत: विरक्त झाली होती. दंड ग्रहणानंतर महाराजांनी श्री दत्तात्रेय प्रभंच्या आज्ञेनुसार धर्म संस्थापनार्थ अखिल भारत वर्षात पायीच संचार करून प्रचंड धर्म जागृती निर्माण केली. स्वामींनी द्विसहस्री या ग्रंथाचा मूलाधार मराठी गुरुचरित्र या सिद्ध ग्रंथावर आधारित श्री गुरुसंहिता, त्रिशती गुरुचरित्र काव्य हे दोन संस्कृत व सप्तशती गुरुचरित्र मराठी असे तीन ग्रंथ लेखन केले. असे हे लोकोत्तर दत्तावतार कार्य आषाढ शुद्ध प्रतिपदा रोजी समाधिस्थ झाले असले तरी त्यांचे स्मरण मात्रेण काया- वाचा-मने पावन होतात, हे त्रिवार सत्य आहे.

**संजय पाठक**/नागपूर

## वाचक पत्रे

### वृक्षसंवर्धनासाठी काही उपाय

जागतिक पर्यावरण दिनानिमित्त अनेक संस्था दरवर्षी समारंभपूर्वक वृक्षारोपणाचा कार्यक्रम आयोजित करत असतात. बरेचदा असे कार्यक्रम सार्वजनिक उद्यानात पार पाडले जातात कारण आजकाल शहरांमध्ये झाडे लावण्यासाठी इतरत्र मोकळी



जागा मिळणे दुरापास्त होत चालले आहे. यावर उपाय म्हणून जर शहराबाहेर झाडे लावावी म्हटले तरी त्यासाठी रिकामी जागा मिळेल कशी आणि लावलेल्या झाडांची नंतर देखभाल करणार कोण? त्यामुळे अशी एखादी संस्था असावी की जी याबाबत पुढाकार घेऊ शकेल. ज्या कंपन्या सीएसआर अंतर्गत सामाजिक बांधिलकीतून समाजोपयोगी योजना राबवीत असतात त्या ही आवश्यकता पूर्ण करू शकतील. ढोबळमानाने ही योजना अशी असू शकेल : १. कंपनीतर्फे झाडे लावण्यासाठी व पुढे त्यांच्या देखभालीसाठी जागा व इतर व्यवस्था उपलब्ध करून दिली जावी. २. ज्या नागरिकांना एक पेड मां के नाम या किंवा तत्सम संकल्पनेनुसार वृक्षारोपण करायची इच्छा आहे ते या जमिनीवर झाडे लावू शकतील. झाड लावल्यावर ते प्रायोजित केल्याचा उल्लेख म्हणून त्यांच्या नावाचा बोर्ड झाडाजवळ लावला जावा. त्यासाठी यथायोग्य शुल्क आकारण्यात यावे. ३. कोणकोणती झाडे कुठे लावावीत ते कंपनीने ठरवलेले असावे. ४. झाडे वाढल्यावर त्यापासून जे उत्पन्न होईल त्याचा विनियोग या योजनेची व्याप्ती वाढवण्यासाठी केला जावा. अशा रीतीने गावाबाहेर उत्तम वनराई निर्माण झाल्यास तिचा उपयोग कंपनीतील कर्मचारी व इतर लोक सहलीसाठीदेखील करू शकतील.

**रवींद्र पंडित**/८४२४९८४३५०

### आणिबाणी उद्दिष्टाचे फलित

कोणत्याही देशात अराजकता माजू नये याकरिता आणिबाणी घोषित करण्याचा अधिकार संवैधानिक असतो. १९७५ साली पंजाब प्रांत सोडला तर सर्व राज्यांत शांतता होती. मग देशात आणिबाणी का लागू करण्यात आली? २५ जून हा काळा दिवस ठरविताना विनोबा भावे यांनी अनुशासन पर्व का म्हटले? बरे तत्कालीन पंतप्रधान आणि राष्ट्रपती यांच्यात राष्ट्रविषयक सुसंवाद होता का? कारण आणिबाणी घोषित करणाऱ्या राष्ट्रपतीचा अकाली मृत्यू का व्हावा? हे सारे प्रश्न आणिबाणीच्या उद्दिष्टावर बोट ठेवणारे आहेत!

तत्कालीन पंतप्रधानाला १९७७ च्या निवडणुकीत लोकांनी नाकारले होते पण निवडून दिलेले सरकार पाच वर्षे पूर्ण न करताच कोसळते आणि १९८० ला आणिबाणीप्रिय पंतप्रधान विराजमान होतात, या प्रकाराला लोकशाहीचा विजयच म्हणावा लागेल! गेली ११ वर्षे देशात अघोषित आणिबाणी सुरू असल्याचा कांगावा विरोधी पक्षाच्या अध्यक्षाने केला आहे. त्यामुळे देशात गृहयुद्धसदृश परिस्थिती निर्माण झाली आहे का? आणि असेल तर वर्तमान सरकारने आणिबाणी लागू करायलाच पाहिजे कारण आणिबाणी ही देशहितार्थ असते स्वहितार्थ नाही.

**वि. ल. उईके**/८२७५५२८०१६

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास **९८५०७५३२८१** या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

# नागेशवाडीत धरती बाबा जनजातीय ग्राम उत्कर्ष अभियान संपन्न

## लाभार्थींना विविध प्रमाणपत्रांचे उपविभागीय अधिकाऱ्यांच्याहस्ते वितरण



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २८ जून**
औंढा नागनाथ तालुक्यातील नागेशवाडी येथील श्री सरस्वती आदिवासी आश्रम शाळेत धरती आबा जनजातीय ग्रामउत्कर्ष अभियान व छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर घेण्यात आले. या उपक्रमातर्गत एकाच छताखाली विविध प्रमाणपत्र वाटप करण्यात आले. उपविभागीय अधिकारी विकास माने, तहसीलदार हरीश गाडे यांच्या मार्गदर्शनाखाली धरती आबा जनजातीय ग्राम उत्कर्ष अभियान व छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर घेण्यात आले.

या अभियानाचे उद्घाटन तहसीलदार हरीश गाडे तर दीपप्रज्वलन एस बारसे प्रकल्प अधिकारी व सरपंच प्रकाश घाटोळे, उपसरपंच तुळसाबाई टारफे यांच्या हस्ते झाले.यावेळी तालुका आरोग्य अधिकारी डॉ. गजानन चव्हाण, संस्थेचे सहसचिव संतोष गुट्टे,पुरवठा निरीक्षण अधिकारी हेमा खाडे, ग्रामीण पाणीपुरवठा उप विभागीय अभियंता राजू नरवाडे, कनिष्ठ अभियंता अभिषेक गिरी, मंडळ अधिकारी आशा गीते तलाठी ग्रामसेवक राम चौधरी, एस काळे, व्ही पी नागरे, इम्रान पठाण,संगीता बामनपल्ले, संगीता कीर्तने, पांडुरंग क-हाळे, नितीश कुलकर्णी, भगवान कदम, वामन मोरे, कैलास जाधव, विनोद साळवे यांच्यासह नागरिक, महिला व पुरुष यांची उपस्थिती होती.

धरती आबा जनजातीय ग्रामउत्कर्ष अभियानअंतर्गत तालुक्यातील आदिवासी जमातीच्या आर्थिक व सामाजिक विकास करणे हे या अभियानाचे उद्दिष्ट असून आदिवासी कुटुंबांना पायाभूत सुविधा पक्की घरे, रस्ते, पाणी, वीज, आरोग्य सुविधा, पोषण, शिक्षण, विद्युतीकरण सर्व पायाभूत सुविधा उपलब्ध करून देणे हे या अभियानाचे उद्दिष्ट आहे.

गतिमान प्रशासन तथा आपत्कालीन व्यवस्थेचे बळकटीकरण योजना अंतर्गत छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर प्रत्येक मंडळ स्तरावर आयोजित केले जात आहे.ग्रामीण भागातील शेतकरी, विद्यार्थी व महिला यांना महसूल विभागाशी संबंधित विविध सेवा आणि योजनांचा लाभ एकाच देतांना रहिवाशी, उत्पन्न, जात प्रमाणपत्र, नवीन रेशन कार्ड सेवा, सामाजिक न्याय विभागाच्या योजना, संजय गांधी निराधार योजना, श्रावणबाळ योजनेअंतर्गत लाभार्थी ऑनलाईन अर्ज करणे, याशिवाय जिवंत सातबारा मोहीमेअंतर्गत वारस फेरफार व सात बाराचे वाटप करण्यात आले. अभियान व शिबीरास महसूल विभाग, कृषी विभाग, वनविभाग, आरोग्य विभाग, बँका, पुरवठा विभाग, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, इतर सर्व विभाग, मंडळ अंतर्गत तलाठी सज्जातील शेतकरी, लाभार्थी, नागरिक उपस्थित होते. प्रस्तावना सूत्रसंचालन राजेंद्र तळेकर तर आभार सुरेश उंदरे यांनी मानले.

# अग्रवाल बहु मंडळाच्यावतीने कादम्बिनी प्रदर्शनीला प्रतिसाद



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २८ जून**
कारवाडी येथील गंगा नगर मधील राणीसती मंदिरातील कयाल मंगल कार्यालयात शनिवार दि २८ जून रोजी अग्रवाल बहु मंडळाच्यावतीने कादम्बिनी प्रदर्शनीचे उद्घाटन सुप्रसिध्द कंत्राटदार राम कयाल यांचेहस्ते करण्यात आले.

यावेळी कळमनुरीच्या उपविभागीय अधिकारी प्रतिक्षा भुते, व्यापारी महासंघाचे शहराध्यक्ष पंकज अग्रवाल, बहु मंडळाच्या अध्यक्षा शिखा लदनिया, सचिव ज्योती अग्रवाल यांची प्रमुख उपस्थिती होती. मान्यवरांच्याहस्ते अग्रसेन महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. या प्रदर्शनीमध्ये महिलांनी तयार केलेल्या विविध वस्तुंची विक्री करण्यात येत आहे. महिलांना सक्षम व उद्योगशील बनविण्यासाठी या प्रदर्शनीचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये आभूषण साड्या, राखी, ज्वेलरी, मुखवास, हॅण्डलूम, सनग्लासेस, सौंदर्य प्रसाधने, बेडसिटस, वेस्टर्न वियर आदी वस्तू विक्रीसाठी आल्या होत्या. देशातील २५ पेक्षा जास्त शहरातील महिलांनी तयार केलेल्या वस्तू विक्रीसाठी आल्या होत्या.

प्रदर्शनाच्या यशस्वीतेसाठी बहु मंडळाच्या कोषाध्यक्षा मोनीका बगडीया, आरती अग्रवाल, डॉ सोनाली अग्रवाल, रूचीता अग्रवाल, प्रीती अग्रवाल, किरण अग्रवाल, टीना लदनिया, अल्का अग्रवाल, कुसुम अग्रवाल, रोमा अग्रवाल, किर्ती लदनिया, अर्चना अग्रवाल, रूपाली बगडीया, ममता अग्रवाल, नेहा अग्रवाल, रक्षा बगडीया, श्रुती कयाल, स्वप्ना अग्रवाल, नीता बगडीया आदींनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन डॉ रोली अग्रवाल आणि प्रीती झुनझुनवाला यांनी केले. या प्रदर्शनीला उत्स्फुर्त प्रतिसाद मिळाला.

# मालवाहतुक वाढविण्यासाठी रेल्वे अधिकाऱ्यांशी चर्चा



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २८ जून**
हिंगोली व वसमत ही दोन शहरे मोठी व्यापार पेठ असल्याने येथून मालवाहतूक वाढावी, यासाठी रेल्वेचे वरिष्ठ अधिकारी श्रीनिवास सूर्यवंशी यांनी शनिवारी हिंगोलीत व्यापाऱ्यांशी चर्चा केली. दक्षिण मध्य रेल्वेचे नांदेड मंडळाचे सहाय्यक वाणिज्य प्रबंधक श्रीनिवास सूर्यवंशी यांनी शनिवारी हिंगोलीत व्यापाऱ्यांची चर्चा केली. यावेळी व्यापाऱ्यांनी रस्ते वाहतुकीपेक्षा रेल्वे वाहतुकीचा उपयोग घ्यावा, असे आवाहन श्रीनिवास सूर्यवंशी यांनी केले. यावरून व्यापाऱ्यांनी रेल्वे वाहतुकीला प्रतिसाद कमी असण्याची कारणे रेल्वे प्रशासनाच्या निदर्शनास आणून दिली. लहान व्यापाऱ्यांना पूर्ण मालगाडी ऐवजी जेवढा माल उपलब्ध आहे तेवढा पाठविण्याची सुविधा मिळाल्यास वाहतूक वाढू शकेल, असे व्यापाऱ्यांनी निदर्शनास आणून दिल्याने लवकरच याबाबत मंडळ स्तरावर निर्णय घेण्याचे आश्वासन श्रीनिवास सूर्यवंशी यांनी दिले. हिंगोलीच्या बाजारपेठेतून गुजरात, कर्नाटक, तामिळनाडू, पश्चिम बंगाल, नवी दिल्ली आदी राज्यात विविध कृषी उत्पादने जात असतात. ही वाहतूक रेल्वेद्वारे सोयीस्कर व स्वस्त व्हावी यासाठी प्रयत्न करण्याचे आश्वासन सहाय्यक मंडळ वाणिज्य प्रबंधक श्रीनिवास सूर्यवंशी यांनी दिले. या बैठकीस इंडस्ट्रीज असोसिएशनचे अध्यक्ष ज्ञानेश्वर मामडे, माजी नगराध्यक्ष जगजीत खुराणा, राजेश बगडिया, पत्रकार संघाचे कार्याध्यक्ष वसंत भट्ट, रविंद्र सोनी आदि सहित आडते व व्यापारी उपस्थित होते.



**हिंगोली– संत शिरोमणि श्री संत नामदेव महाराज यांची जन्मभूमी असलेल्या नर्सी येथील नामदेव महाराज मंदिरात आषाढी एकादशीनिमित्त दररोज भजन आणि किर्तन, हरिपाठ कार्यक्रम वारकरी संप्रदायाकडून साजरा होत आहे. या कार्यक्रमात सहभागी वारकरी मंडळी, भाविक दिसत आहेत. छाया– विजय गुंडेकर**

## संक्षिप्त वृत्त

### २ व ३ जुलैला सरपंच पदासाठी आरक्षण सोडत

हिंगोली– महाराष्ट्र ग्रामपंचायत (सरपंच व उपसरपंच) निवडणूक नियम, १९६७ च्या नियम २ (अ) मधील तरतुदीनुसार हिंगोली जिल्ह्यातील अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती तसेच नागरिकांचा मागास प्रवर्ग व महिला (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, नागरिकांच्या मागास प्रवर्ग व खुल्या प्रवर्गातील महिला) आरक्षण निश्चित करण्यासाठी तालुकास्तरावर आरक्षण सोडतीचे आयोजन करण्यात आले आहे. त्यासाठीच्या तारखाही निश्चित करण्यात आलेल्या आहेत. प्रत्येक तालुक्यासाठी त्या त्या तालुक्याच्या तहसीलदारांना आरक्षण सोडत काढण्यासाठी प्राधिकृत करण्यात आले आहे. सेनगाव व वसमत तालुक्याची आरक्षण सोडतीची बैठक तालुका मुख्यालयाच्या ठिकाणी दि. २ जुलै, २०२५ रोजी दुपारी १२ वाजता होणार आहे. तर हिंगोली, औंढा नागनाथ व कळमनुरी तालुक्याची आरक्षण सोडतीची बैठक संबंधित तालुका मुख्यालयाच्या ठिकाणी दि. ३ जुलै रोजी दुपारी १२ वाजता निश्चित करण्यात आली आहे. वरील तालुका मुख्यालयाच्या ठिकाणी नमूद दिनांकास अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, नागरिकांचा मागास प्रवर्ग व महिलांसाठीचे आरक्षण संबंधित तालुक्याच्या नियुक्त केलेल्या समन्वय अधिकारी यांच्या नियंत्रणाखाली पूर्ण करावेत, असे आदेश जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी दिले आहेत.

### आ. नवघरेंच्याहस्ते धनादेशाचे वाटप



वसमत– तहसील कार्यालय, वसमत येथे स्व. गोपीनाथ मुंडे अपघात विमा योजना अंतर्गत अपघाती निधन झालेल्या लाभार्थ्यांच्या वारसांना वसमत विधानसभाचे आमदार राजू भैय्या नवघरे यांच्या हस्ते धनादेशाचे प्रमाणपत्र वाटप करण्यात आले. या योजनेअंतर्गत अपघातामध्ये मृत्यू झालेल्या व्यक्तींच्या कुटुंबीयांना आर्थिक मदत दिली जाते. आमदार राजू नवघरे यांच्या प्रयत्नातून ही योजना लाभार्थ्यांपर्यंत पोहोचवण्यात महत्त्वाची भूमिका बजावण्यात आली. कार्यक्रम प्रसंगी आमदार नवघरे यांनी लाभार्थी कुटुंबियांचे सांत्वन करत शासनाच्या विविध योजनांची माहिती दिली आणि गरजूंना मदतीचे आश्वासन दिले. उपस्थित लाभार्थ्यांनी या मदतीबद्दल समाधान व्यक्त केले. या कार्यक्रमास तहसीलदार सौ. शारदा दळवी, तालुका कृषी अधिकारी भीसे तसेच संबंधित लाभार्थ्यांचे नातेवाईक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### मराठा सेवा संघाची आज विभागीय बैठक

हिंगोली– मराठा सेवा संघ केंद्रीय निवड समिती बैठक (मराठवाडा विभाग) रविवार दिनांक २९ जुन रोजी दुपारी ०३ वाजता शासकीय विश्रामगृह हिंगोली येथे निवड समिती प्रमुख शिवश्री संदिपान जाधव यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली आहे.

# भगवान परशुराम उद्यान विकासासाठी एक कोटीचा निधी– आ. मुटकुळे



**तभा वृत्त सेवा**
**हिंगोली, २८ जून**
शहरातील एनटीसी तापडिया इस्टेट भागात असलेल्या भगवान परशुराम उद्यान विकास कामासाठी एक कोटीचा निधी वैशिष्टपूर्ण योजनेतून देणार असल्याची घोषणा भाजपचे आ. तान्हाजीराव मुटकुळे यांनी केली आहे.

शहरातील एनटीसी तापडिया इस्टेट परिसरात भगवान परशुराम उद्यानाची जागा निश्चित करण्यात आली असून उद्यानाच्या विकासासाठी तसेच भव्य अशा सभागृहासाठी एक कोटी रुपयांचा निधी देण्यात येणार आहे. या उद्यानाला संरक्षण भिंत बांधण्यात येणार आहे. यावेळी आ. तान्हाजीराव मुटकुळे यांचेहस्ते परिसरात वृक्षारोपन करण्यात आले. यावेळी माजी नगराध्यक्ष बाबाराव बांगर, प्रा.दुर्गादास साखळे, शहराध्यक्ष रजनीश पुरोहित, अशोक शर्मा, अनिल खांडल, दिलीप शर्मा, श्याम खंडेलवाल, डॉ. माहूरकर डॉ. जवळेकर, आशिष शर्मा, संजय मानका, गोपाल महाराज दुबे, मनोज शर्मा, केशव दुबे, सौ.रजनी पाटील, डॉ. स्नेहश्री जवळेकर, शुभांगी पोफली, रोहिणी धर्माधिकारी यांच्यासह सकल ब्राम्हण समाजातील पदाधिकारी व कार्यकर्ते एनटीसी भागातील नागरिक उपस्थित होते.

# अप्पर पोलिस अधीक्षक अर्चना पाटील यांची भोकर येथे बदली



**तभा वृत्त सेवा**
**हिंगोली, २८ जून**
जिल्हा पोलिस दलात कार्यरत असतांना अडीच वर्षाच्या कालावधीत अनेक गुन्हेगारांना वठणीवर आणत लेडी सिंघम म्हणून ओळख निर्माण झालेल्या अप्पर पोलिस अधीक्षक अर्चना पाटील यांची भोकर येथे बदली झाली असून त्यांच्या बदलीचे आदेश शुक्रवार दि २७ जून रोजी काढण्यात आले आहेत.

डिसेंबर २०२२ मध्ये हिंगोली पोलिस दलात अप्पर पोलिस अधीक्षक म्हणून अर्चना पाटील रूजू झाल्या. वेगवेगळ्या कामगिरीतून त्यांनी कामाचा ठसा उमटवला. शहरातील जलेश्वर तलावाचे अतिक्रमण हटविताना जमावाने गोंधळ केल्यानंतर थेट जमावामध्ये जाऊन कारवाई सुरू केली होती. त्यामुळे जमाव नियंत्रणात आला आणि पुढील अनर्थ टळला होता. याशिवाय वसमत, औंढा नागनाथ, हट्टा पोलिस ठाण्यांतर्गत काही गावांतून उद्भवलेल्या दंगल सदृश्य परिस्थितीत त्यांनी पोलिस बंदोबस्तासह घटनास्थळी जाऊन जमावाला नियंत्रणात आणले होते. या प्रकरणात गुन्हे दाखल करून गोंधळ घालणाऱ्यांना अटकही करण्यात आली होती. याशिवाय गुन्हेगारांवर वचक बसवण्यासाठी सततचे गुन्हे करणाऱ्यांना जिल्ह्यातून हद्दपार तसेच स्थानबध्दतेच्या कारवाईमधूनही त्यांनी महत्वाची भुमिका बजावली आहे. सध्या सुरू असलेल्या अवैध व्यवसाय विरोधी मोहीमत त्यांनी स्वत: भल्या पहाटेच ग्रामीण भागात जाऊन दारू अड्ड्यावर छापे टाकून दारू अड्डे उध्वस्त केले तसेच दारू गाळप करणाऱ्यांवर गुन्हे दाखल केले. जिल्ह्यात विविध आंदोलनाच्यावेळी तसेच मोठ्या सभांच्यावेळी बंदोबस्ताची धुरा त्यांच्या खांद्यावर होती. त्यांच्या शिस्तप्रिय आणि कडक भूमिकेमुळे त्यांची पोलिस दलातील लेडी सिंघम अधिकारी म्हणून ओळख निर्माण झाली होती.

# उपप्रादेशिक परिवहन विभागाच्यावतीने अवैध वाहनांवर कारवाई



**तभा वृत्त सेवा**
**हिंगोली, २८ जून**
जिल्ह्यात ट्रॅक्टर, टिप्पर, जेसीबी तसेच इतर वाहने अवैधपणे रस्त्यावर फिरत असून या वाहनांवर उप प्रादेशिक विभागाच्यावतीने कारवाई करण्यात येत आहे. उशिरा का होईना उप प्रादेशिक परिवहन विभागाला उपरती झाल्याचे दिसत आहे.

जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर विना नंबर प्लेटचे ट्रॅक्टर, टिप्पर अवैधपणे वाळू वाहतुक करीत आहेत. तसेच वाळू माफीया या वाहनांतून सर्रासपणे पक्षाची नावे किंवा स्वत:ची नावे टाकून भरधाव वेगाने नेतांना दिसत आहेत. तसेच अनेक वाहनांकडे हजारो ते लाखो रूपयांची दंडाची रक्कम थकीत आहे. तरीही ही वाहने रस्त्यावर फिरत आहेत. या वाहनांवर कारवाई करण्याचे काम उप प्रादेशिक विभागाचे आहे. अवजड वाहनांमध्ये क्षमतेपेक्षा जास्त माल वाहून नेत असतांना दिसत आहेत. परंतु राजकीय मंडळी आणि पदाधिकारी यांच्या आशिर्वादाने या वाहनांवर कारवाई करण्यास टाळाटाळ केली जात होती मात्र अचानक आता उप प्रादेशिक विभागाला उपरती झाली असून शहरासह जिल्ह्यात अनेक ठिकाणी परिवहन विभागाच्यावतीने कारवाई करीत असतांना अधिकारी व कर्मचारी दिसत आहेत.

# हिंगोलीत मोबाईल रिटेलर्स संघटनेतर्फे रक्तदान शिबीरास प्रतिसाद



**तभा वृत्त सेवा**
**हिंगोली, २८ जून**
शहरातील गरजुनां रक्त मिळावे या सामाजिक भावनेतून व रक्ताचा तुटवडा लक्षात घेऊन ऑल इंडिया मोबाईल रिटेलर्स असोसिएशन, जुनवेईइलेक्ट्रॉनिक्स प्रायव्हेट लिमिटेड, हिंगोली मोबाईल रिटेलर्स असोसिएशन, हिंगोली जिल्हा व्यापारी महासंघ कॅट यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक २७ जून रोजी भव्य रक्तदान शिबिर घेण्यात आले त्या मध्ये ११२ रक्तदात्यांनी रक्तदान केले.

या रक्तदान शिबिरास हिंगोली व्यापारी महासंघ(उखढ) तर्फे दिलीप चव्हाण यांच्याहस्ते उद्घाटन करण्यात आले. यावेळी अनिल नेणवानी, सुमित चौधरी, सुरेश अप्पा सराफ, प्रशांत सोनी, राजेश बगडिया, राजेश जैस्वाल, राजेश बगडिया, रवी सोनी आदींची प्रमुख उपस्थिती होती. शिबीराच्या यशस्वीतेसाठी मोबाईल रिटेलर्स असोसिएशनचे सुमित नैनवाणी, सचिन लखोटिया, महेश मोकाटे, खिजर शेख, कुलदीप पांडे, शहबाज शेख, अशीष खंदारे, सुशील नैनवाणी यांनी परिश्रम घेतले. संघटनेच्या या सामाजिक उपक्रमाबद्दल सर्व स्तरातून त्यांचे कौतुक होत आहे.

धाराशिव
# दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## रामचंद्र आलूरे यांना जगद्गुरुंच्या हस्ते आशीर्वाद पदवी प्रदान

शनिवार, दि. २८ जून २०२५

**तभा वृत्तसेवा**
**अणदूर, दि.२८ जून -**

तुळजापूर तालुक्यातील अणदूर ग्रा.पं.चे सरपंच रामचंद्र आलूरे यांना केदार पिठाची आशीर्वाद पदवी, श्रीश्रीश्री १००८ भीमाशंकर लिंग शिवाचार्य महास्वामीजी यांच्या हस्ते प्रदान करण्यात आली.

गुरुवारी केदार पिठाचे दिवंगत जगद्गुरु श्री सिद्ध लिंगेश्वर शिवाचार्य महास्वामीजी यांच्या पंधराव्या पुण्यतिथीनिमित्त त्यांच्या समाधीस



अभिषेक रुद्र पूजा व महाप्रसाद विविध धार्मिक कार्यक्रमाने पार पडला. यावेळी जगद्गुरु श्री श्री श्री १००८ भीमाशंकर लिंग शिवाचार्य महास्वामीजी यांच्या प्रमुख उपस्थितीत धर्मसभा पार पडली. यावेळी सरपंच रामचंद्र आलूरे यांना सामाजिक व धार्मिक कार्यातील विशेष योगदानाबद्दल त्यांना आशीर्वाद पदवी देऊन सन्मानित करण्यात आले.

यावेळी गहिनीनाथ महाराज औसेकर, आ. प्रवीण स्वामी, आप्पासाहेब पाटील, गुरुनाथ बडूरे, गुलचंद व्यवहारे, गोविंदराव माकने, डॉ.अजिंक्य पाटील, आनंद कंदले, अमरराजे कदम, महेश चोपदार, बाबा घोगते, अभिषेक कोरे, सोमनाथ शेटे, गोविंद खुरुद व मठाचे शिवाचार्य उपस्थित होते.

## संक्षिप्त वृत्त...



### प्राचार्य मोरे यांचा सत्कार

**वाशी, दि.२८ जून -**

दसमेगावचे भूमिपुत्र तथा तेरणा कॉलेज धाराशीवचे नवनियुक्त प्राचार्य ज्ञानेश्वर मोरे यांचा सत्कार शुक्रवार (दि.२७) रोजी तेरणा कॉलेज येथे दसमेगावचे जेष्ठ दादासाहेब लगाडे, विलास गपाट आदीच्या हास्ते पुष्पगुच्छ देऊन करण्यात आला. व पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या. यावेळी कॉलेजचे प्राध्यापक डॉ. तुळशिराम उकीरडे, प्रा. सुनिल पाटील, डॉ. दिपीका देशमुख, डॉ. अनघा तोडकर, डॉ. सुशिलकामार सरवदे आदीच्या उपस्थित हा सत्कार समारंभ सपन्न झाला.



### अंजली कावरे यांचा सेवानिवृत्तीनिमित्त सत्कार

**तुळजापूर, दि.२८ जून -**

जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा तिर्थ खुर्द येथील मुख्याध्यापिका अंजली कावरे (क्षिरसागर) यांच्या सेवानिवृत्ती निमित्त शिक्षण विस्तार अधिकारी रंजना मैंदर्गी, केंद्रप्रमुख तानाजी महाजन, सरपंच शैला मोरे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी पुजारी मंडळ अध्यक्ष विपिन शिंदे, नितीन सूर्यवंशी, ग्रामपंचायत सदस्य नाना पटाडे, शिक्षक व ग्रामस्थ उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सोमनाथ केवटे यांनी, सूत्रसंचालन रेखा गोरे यांनी तर आभार संतोष माडजे यांनी मानले. तसेच भुताळे राजेश्वरी यांचा प्र. मुख्याध्यापिका निवडीबद्दल सत्कार करण्यात आला.



### होळकर वाचनालय कक्षास नातेवाईकांच्या भेटी


**वाशी, दि.२८ जून -**

कर्मवीर मामासाहेब जगदाळे महाविद्यालयातील कै. किसनराव होळकर वाचन कक्षास नातेवाईकांनी भेट दिली. येथील महाविद्यालयांमधील ग्रंथालयास वाशी येथील ग्रामस्थ संजय होळकर यांनी त्यांचे वडील बंधू कै. किसनराव होळकर यांचेकडील वैयक्तिक ९९७५ ग्रंथ महाविद्यालयास भेट दिली म्हणून महाविद्यालयाने त्या कक्षास कै. किसनराव होळकर वाचन कक्ष असे नाव दिले. या कक्षाला संजय होळकर त्यांचे चिरंजीव शुभम तसेच भाचे प्रसाद ढमाळ, शिवशंकर चौधरी यांचे समवेत भेट दिली.


### अणदूरचे गुरबसप्पा करपे यांना संस्कृत विषयात पीएच.डी.

**अणदूर, दि.२८ जून -**

अणदूरचे सुपुत्र गुरबसप्पा नीलकंठ करपे यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती



संभाजीनगरकडून आधुनिक संस्कृत साहित्यात ह.भी. चिकेरूर यांचे योगदान या विषयावर पीएच.डी. पदवी प्रदान करण्यात आली. या विषयावर भारतातील पहिलेच संशोधन ठरले आहे. त्यांना डॉ. मंजूषा कुलकर्णी यांचे मार्गदर्शन लाभले. या यशाबद्दल विविध संस्थांनी, प्राध्यापकांनी व मित्रपरिवाराने करपे यांचे अभिनंदन केले आहे.



### गोलेगाव शाळेत शाहू महाराज जयंती साजरी

**वाशी, दि.२८ जून -**

गोलेगाव तालुका वाशी येथील प्राथमिक शाळेत छत्रपती राजश्री शाहू महाराज यांच्या जयंतीनिमित्त प्रतिमेची पूजा केली. यावेळी मदने, सोने, जाणीव संघटनेचे जिल्हाध्यक्ष रामभाऊ लगाडे यांच्या हस्ते करण्यात आली. यावेळी मदने व रामभाऊ लगाडे यांची भाषणे झाली. यामध्ये ८४ मुले-मुली सहभागी झाले. यानंतर अभिरुची वर्ग घेऊन खेळ गाणी गोष्टी शिकवल्या.



### प्रा. भोसले यांचा सेवानिवृत्ती सत्कार संपन्न

**तुळजापूर, दि.२८ जून -**

यशवंतराव चव्हाण महाविद्यालयाचे राज्यशास्त्र व जिमखाना विभागातील प्रा. संभाजी शिवाजीराव भोसले यांच्या सेवानिवृत्तीनिमित्त सेवापूर्ती समारंभ आयोजित करण्यात आला. बालाघाट शिक्षण संस्थेचे सचिव उल्हास बोरगावकर यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. याप्रसंगी डॉ. प्रविण भाले, प्रा. रमेश नन्नवरे, डॉ.जे.एस. मोहिते व कुटुंबीयांसह अनेक मान्यवर आणि प्राध्यापक, कर्मचारी उपस्थित होते.

# सौर व पवन ऊर्जा प्रकल्पांच्या सावलीत शेतकऱ्यांवर अन्याय

## शेतकरी नेते अनिल जगताप यांची थेट मुख्यमंत्र्यांकडे तक्रार...

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२८ जून -**

धाराशिव जिल्ह्यात ग्रीन एनर्जी प्रकल्पांचा जलद वेगाने विस्तार सुरू असताना, स्थानिक शेतकऱ्यांवर अन्याय होत असल्याचा गंभीर आरोप शेतकरी नेते अनिल जगताप यांनी केला आहे. लोहारा तालुक्यातील होळी येथील शेतकरी तुकाराम बिराजदार यांनी तहसील कार्यालयासमोर सुरु केलेल्या उपोषणाला काल अनिल जगताप यांनी भेट दिली आणि शेतकऱ्याची बाजू समजून घेतल्यानंतर थेट मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना ईमेलद्वारे तक्रार सादर केली.

जगताप यांनी आपल्या तक्रारीत म्हटले आहे की, बीएन पीक पावर कंपनीने बिराजदार यांची ४० आर जमीन जबरदस्तीने घेतली असून, आजतागायत कोणताही मोबदला दिलेला नाही. उलट त्यांच्यावर गुंडाच्या माध्यमातून दबाव टाकला जात आहे. यामुळे बिराजदार कुटुंबीयांना उपोषणाचा मार्ग पत्करावा लागला आहे.



तक्रारीत पुढे असेही नमूद केले आहे की, पवन ऊर्जा व सौर ऊर्जा कंपन्या शेतकऱ्यांकडून जमिनी अत्यंत अल्प दराने लीजवर घेत आहेत. काही वेळा शेतकऱ्यांना कायदेशीर कराराचे स्वरूपही नीट सांगितले जात नाही, ज्याचा गैरफायदा घेत २८-३० वर्षांचे करार करण्यात येत आहेत, जे प्रत्यक्षात जमिनीच्या हस्तांतरासारखेच ठरतात. अनेक ठिकाणी परवानगी न घेता मोठ्या प्रमाणावर वृक्षतोड करण्यात आली आहे. तसेच पाटबंधारे विभाग तसेच सामाजिक वनीकरणाच्या जमिनीवर देखील टॉवर व विद्युत वाहिन्यांचे पोल उभारण्यात आले आहेत, असे जगताप यांनी आपल्या तक्रारीत म्हटले आहे.

मेढा (महाराष्ट्र एनर्जी डेव्हलपमेंट एजन्सी) कडून या संदर्भातील माहिती घेण्याची प्रक्रिया सुरू असल्याचेही जगताप यांनी सांगितले. तसेच सोमवारी तालुका व जिल्हा सनियंत्रण समितीकडे औपचारिक तक्रार दाखल केली जाणार आहे.

जगताप यांनी सांगितले की, काही कंपन्यांनी जिल्हा व तालुका पातळीवरील विविध शासकीय विभागांच्या आवश्यक परवानग्या न घेता थेट प्रकल्प राबवले आहेत. अशा कंपन्यांची चौकशी व्हावी आणि दोषींवर कारवाई व्हावी, अशी मागणी त्यांनी मुख्यमंत्र्यांकडे केली आहे.

तालुका व जिल्हा सनियंत्रण समितीची नियमावली जाहीर करून सर्वसामान्य जनतेला माहिती करून द्यावी, अशी ठाम मागणी देखील अनिल जगताप यांनी आपल्या निवेदनातून केली आहे.

ही लढाई केवळ एका शेतकऱ्याची नसून संपूर्ण जिल्ह्यातील अन्यायग्रस्त शेतकऱ्यांचा हक्क मिळवून देण्यासाठी सुरू असल्याचे अनिल जगताप यांनी स्पष्ट केले आहे.



गरीब शेतकऱ्याच्या अज्ञानाचा फायदा घेऊन सौर व पवन ऊर्जा कंपन्या त्यांना अतिशय अल्प मोबदला देत आहेत. काही ठिकाणी तर जबरदस्तीने जमीन ताब्यात घेऊन उलट शेतकऱ्यांना गुंडाकडून मारहाण करण्यात येत आहे. मेडा, तहसील व जिल्हा कार्यालयाकडून या संदर्भात मी माहिती घेत आहे. शेतकऱ्यावर अन्याय करणाऱ्या कंपन्याची गय करणार नाही. दोन आठवड्यात शेतकऱ्यांच्या तक्रारीचे निवारण न झाल्यास धरणे आंदोलन, मोर्चा, आमरण उपोषण यासारखे तीव्र स्वरूपाचे आंदोलन करण्यात येईल.

**- अनिल जगताप,** शेतकरी प्रतिनिधी

## चिवरी येथील महालक्ष्मी मंदिर रस्त्यावर अस्ताव्यस्त खडी; ठेकेदारावर कारवाईची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.२८ जून -**

चिवरी (ता. तुळजापूर) येथील प्रसिद्ध श्री महालक्ष्मी मंदिराकडे जाणाऱ्या मुख्य रस्त्यावर ठेकेदाराने रस्त्याच्या कामासाठी मोठमोठे दगड व खडी रस्त्यातच टाकल्याने भाविकांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे. या ठेकेदारावर तातडीने कारवाई करण्याची मागणी भाविकांकडून करण्यात येत आहे.

नळदुर्ग-तुळजापूर मार्गावरील चिवरी पाटी ते श्री महालक्ष्मी मंदिरापर्यंतचा रस्ता आधीच अरुंद आहे आणि ठिकठिकाणी मोठे खड्डे पडलेले आहेत. या रस्त्याचे डांबरीकरणाचे काम लवकरच सुरू होणार आहे. मात्र, ठेकेदाराने कामासाठी लागणाऱ्या खडीचे मोठमोठे ढिगारे व दगड रस्त्यावरच टाकल्यामुळे रस्ता जवळपास पायवाटदेखील राहिलेला नाही. त्यामुळे या मार्गावरून ये-जा



करणाऱ्या भाविकांना तारेवरची कसरत करावी लागत आहे.

सध्या आषाढ महिन्यात प्रत्येक मंगळवार व शुक्रवार, तसेच इतर दिवशी देखील महालक्ष्मी मंदिरात नवस फेडण्यासाठी भाविकांची मोठी गर्दी होते.

पुढील महिन्यात येणाऱ्या श्रावण महिन्यात भाविकांची संख्या आणखी वाढणार आहे. हिंदू धर्मातील परंपरेनुसार श्रावण महिन्यात मांसाहार वर्ज्य असल्यामुळे अनेक भाविक आषाढ महिन्यातच बकरे, कोंबडे कापून नवस फेडतात. त्यामुळे दर मंगळवार व शुक्रवारी येथे यात्रेसारखीच गर्दी उसळते.

अशा काळात ठेकेदाराने रस्त्यावरच मोठमोठे दगड व खडी टाकल्याने वाहतुकीला अडथळा निर्माण होत आहे. भाविकांना मंदिरापर्यंत वाहन नेणे तर कठीण झालेच आहे, शिवाय पायदळ जाणाऱ्यांना देखील जीव मुठीत धरून चालावे लागत आहे.

भाविक व स्थानिक ग्रामस्थांनी संबंधित विभागाकडे ठेकेदारावर तातडीने कारवाई करून रस्त्यावरून हे दगड व खडी हटवून रस्ता मोकळा करण्याची मागणी केली आहे, जेणेकरून भाविकांना होणारा त्रास दूर होईल.

## लोहारा येथे गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**लोहारा, दि.२८ जून -**



राजर्षी छत्रपती शाहू महाराज जयंतीनिमित्त लोहारा तालुका राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने शुक्रवारी (दि.२७) दहावी, बारावी तसेच नीट परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव करण्यासाठी भव्य सत्कार समारंभाचे आयोजन लोहारा येथील भानुदासराव चव्हाण महाविद्यालयात करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश उपाध्यक्ष सुरेश बिराजदार होते. प्रमुख उपस्थितीत जि.प. उपमुख्य कार्यकारी अधिकारी सूर्यकांत भुजबळ, तहसीलदार रणजितसिंह कोळेकर, अमोल ताकभाते, किशोर साठे, माजी सरपंच नागन्ना वकील, तालुकाध्यक्ष सुनील साळुंके, सूर्यकांत सांडसे, बाबा जाफरी, गोविंदराव साळुंके, अमर बिराजदार आणि प्राचार्य रामदास ढोकळे यांचा समावेश होता.

यावेळी तालुक्यातील सर्व शाळांमधील दहावी, बारावी तसेच नीट परीक्षेत उत्तम यश मिळवलेल्या विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. विशेषतः तालुक्यातील उदयपूर गावातील शेतकरी तुकाराम रावण पवार यांनी आपल्या मुलाचा विवाह मुलगा सरकारी नोकरीत असतानाही रजिस्टर पद्धतीने केला. समाजात आदर्श निर्माण केल्याबद्दल त्यांचा देखील विशेष सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक तालुकाध्यक्ष सुनील साळुंके यांनी केले. त्यांनी सांगितले की, गुणवंत विद्यार्थ्यांच्या पाठीवर कौतुकाची थाप देणे आणि प्रोत्साहन देणे हेच या कार्यक्रमाचे उद्दिष्ट आहे. भविष्यात देखील असे उपक्रम सातत्याने राबवले जातील, असेही त्यांनी स्पष्ट केले. अध्यक्षीय समारोपात सुरेश बिराजदार यांनी विद्यार्थ्यांना यशासाठी कठोर परिश्रम घेण्याचे आवाहन केले.

कार्यक्रमास नगरसेवक जालिंदर कोकणे, शमशोद्दीन जमादार, अमोल ओवंडकर, हाजी बाबा शेख, गगन माळवदकर, प्रकाश भगत, अभिजित लोभे, मुक्तार चाऊस, रफिक पटेल, प्रशांत सोमवंशी, वैजीनाथ कागे, माधवराव पाटील, दादासाहेब जानकर, ब्रम्हा सोमवंशी, ॲड. सयाजी शिंदे, मोहन शिंदे, मुरली पाटील, स्वप्निल माटे, मनोज देशपांडे, सचिन रणखांब, गोपाल माने, लक्ष्मण बिराजदार, व्यंकट राजपूत आदींसह पदाधिकारी, पालक व विद्यार्थी उपस्थित होते.

## संत तुकाराम सामाजिक संस्थेच्या वतीने गुणवंत शिक्षकांचा सन्मान



**तभा वृत्तसेवा**
**अणदूर, दि.२८ जून -**

येथील संत तुकाराम सामाजिक संस्थेच्या वतीने अणदूर येथील जि.प.प्रा. शाळा वत्सलानगर येथील गुणवंत शिक्षकांचा यथोचित सन्मान करण्यात आला.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आंबेडकर चळवळीतील जेष्ठ कार्यकर्ते अरविंद गायकवाड हे होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून जवाहर महाविद्यालयातील डॉ. मल्लीनाथ बिराजदार, मुख्याध्यापक सुरेखा दराडे, ग्रा.पं. सदस्या अनुसया कांबळे, बाबुराव हागलगुंडे, पोलीस पाटील जावेद शेख, अजय अणदूरकर, संत तुकाराम सामाजिक संस्थेच्या संचालिका अनिता काळुंके, भानुदास सुरवसे, डॉ.प्रसन्न कंदले, शालेय व्यवस्थापन समीतीचे अध्यक्ष सोमनाथ लंगडे, यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी संत तुकाराम सामाजिक संस्थेच्या वतीने जि.प.प्रा. शाळा वत्सलानगर येथील शिवदास भागवत यांनी नवोदय विद्यालय प्रवेश परिक्षा हे पुस्तक निर्माण केल्याने त्यांचा यथोचित सन्मान करण्यात आला तर शाळेची गुणवत्ता वाढीसाठी मुख्याध्यापिका सुरेखा दराडे, एस.बी. स्वामी, बी.बी. पांचाळ, व्ही.व्ही. आडम, व्ही. आर. खलाटे, डी.आर. आरदवाड, एस.डी. हगरी, बी.बी. घोडके, पल्लवी लंगडे, गणेश नन्नवरे या शिक्षक कर्मचाऱ्यांचा यथोचित सन्मान करण्यात आला.

यावेळी डॉ.एम.बी. बिराजदार, सुरेखा दराडे, शिवशंकर तिरगुळे, डॉ. प्रसन्न कंदले, लेखक शिवदास भागवत यांनी मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक दयानंद काळुंके यांनी केले. सुत्रसंचलन प्रबोध कांबळे यांनी तर आभार एस.डी. गिरी यांनी मानले.

## लाखात एखादाच शीतल जमगेसारखा सेवाभावी असतो : डॉ. रणजित गांधी

**तभा वृत्तसेवा**
**वाशी, दि.२८ जून -**

वर्षभरात अनेक सेवानिवृत्ती समारंभ होतात, परंतु शेकडो कर्मचाऱ्यांतून एखादाच असा असतो की जो सर्वांच्या मनात आपले स्थान निर्माण करतो. शीतल जमगे हे असेच एक उदाहरण आहे. समाजाला आणि संस्थेला निष्ठेने, प्रामाणिकपणे सेवा देणारे असे कर्मचारी तयार व्हायला हवेत, असे गौरवोद्गार वालचंद शिक्षण समूहाचे मानद सचिव डॉ. भैय्यासाहेब रणजित गांधी यांनी व्यक्त केले.

श्री देशभूषण कुलभूषण विद्यालय, कुंथलगिरीचे कनिष्ठ लिपिक शीतल जमगे यांच्या सेवानिवृत्ती निमित्त आयोजित करण्यात आलेल्या गौरव व कृतज्ञता समारंभात अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते.

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून कोठारी उद्योग समूहाचे किरण कोठारी, रवि मसाले उद्योग समूहाचे प्रमुख फुलचंद इंगलवार जैन, ऐल्लक पन्नालाल दिगंबर जैन पाठशाळा सोलापूर संस्थेचे विश्वस्त परागभाई शहा, विद्यालयाचे मुख्याध्यापक प्रेमचंद देवसाळे आदी मान्यवर मंचावर उपस्थित होते.

## आ. लोणीकर यांच्या वादग्रस्त वक्तव्याचा नळदुर्ग येथे निषेध

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.२८ जून -**

आमदार आणि माजी मंत्री बबनराव लोणीकर यांच्या शेतकऱ्यांविषयीच्या अपमानकारक वक्तव्याचा नळदुर्ग येथे शिवसेना ठाकरे गटाच्या वतीने जोरदार निषेध करण्यात आला. २८ जून रोजी बसस्थानकासमोर राष्ट्रीय महामार्गावर रास्ता रोको आंदोलन करत शिवसैनिकांनी लोणीकर यांच्या प्रतिमेला जोडे मारले.

या आंदोलनात शिवसेनेचे माजी उपजिल्हा प्रमुख कमलाकर चव्हाण, उपतालुका प्रमुख सरदारसिंग ठाकुर, शहर प्रमुख संतोष पुदाले, डॉ. जितेंद्र कानडे, जगन्नाथ गवळी आदींसह मनसेचे जिल्हा सरचिटणीस ज्योतिबा येडगे, शेतकरी संघर्ष समितीचे दिलीप जोशी, महादेव बिराजदार व मोठ्या संख्येने शिवसैनिक सहभागी झाले होते.

## संस्थेची बदनामी करणाऱ्या पालकावर कारवाईची मागणी

### तुळजाभवानी सैनिकी विद्यालय व पालकांचा जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन...

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.२८ जून -**

श्री तुळजाभवानी मंदिर संस्थान संचालित श्री तुळजाभवानी सैनिकी विद्यालयातील एका विद्यार्थ्याला शिक्षक व वसतीगृह अधिक्षक दलाल यांनी मारहाण केल्याचा आरोप करून आणि दैनंदिन साहित्य खरेदीसाठी ८ हजार रूपये घेतल्याच्या गैरव्यवहाराबाबत तक्रार देणाऱ्या पालकावर कायदेशीर कारवाई करण्याची मागणी विद्यालय व्यवस्थापन समितीने व अन्य पालकांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे केली आहे.

या निवेदनात म्हटले आहे की, महाराष्ट्रातील इतर सैनिकी विद्यालयांच्या तुलनेत या विद्यालयाची फी तुलनेने खूपच कमी आहे व येथे प्रामुख्याने ग्रामीण भागातील विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. आजपर्यंत अनेक विद्यार्थी विविध क्षेत्रात उच्च पदावर कार्यरत झाले आहेत. विद्यालयातील सैनिकी शिस्त, दर्जेदार शिक्षण व क्रिडा क्षेत्रातील उल्लेखनीय यश पाहता, सध्या नवीन प्रवेशासाठी पालक मोठ्या प्रमाणात प्रतीक्षेत आहेत.

निवेदनात नमूद केल्याप्रमाणे, सोशल मिडियावर तक्रार करणाऱ्या पालकाच्या आरोपांची खात्री करण्यासाठी वसतीगृह अधिक्षक श्री दलाल व विद्यालयातील इतर विद्यार्थ्यांची चौकशी करण्यात आली. चौकशीत असे स्पष्ट झाले की, संबंधित विद्यार्थ्याला शिक्षणामध्ये गोडी नसल्याने त्यास इतर शाळेत प्रवेश घेण्याची इच्छा होती. तसेच, संबंधित पालक सुरक्षा रक्षक व वसतीगृहातील कर्मचाऱ्यांशी उद्धट व



अरेरावीच्या भाषेत बोलल्याचे निदर्शनास आले आहे.

संस्थेचे म्हणणे आहे की, चुकीचे आरोप करून संस्थेची व विद्यालयाची बदनामी करण्यात आली असून त्यामुळे इतर पालकांमध्ये अस्वस्थता पसरली आहे. अशा आरोपांमुळे कर्मचाऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण होऊन विद्यालयातील शिस्त व शैक्षणिक गुणवत्ता धोक्यात येऊ शकते. या पार्श्वभूमीवर, चुकीचे आरोप करून संस्थेची प्रतिमा मलिन करणाऱ्या पालकावर योग्य ती कायदेशीर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी या निवेदनातून करण्यात आली आहे.

या निवेदनावर शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष दत्तात्रय हुंडेकरी, उपाध्यक्ष प्रकाश पेंदे, सहसचिव गोकुळ मगर, तसेच नारायण चव्हाण, प्रकाश लांडगे, राणी मलकुनाईक, मीनाक्षी केदार, शामल रुपदास, चंद्रसेन पाटील, प्रशांत सावंत, संगीता गंगणे, संजय शिंदे, पैगंबर शेख, सतीश दरेकर, सुवर्णा शिंदे, घनश्याम शिंदे, मनोहर शिंदे यांसह अनेक पालकांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# जलजीवनसाठी 'बालजिवन' धोक्यात

## रस्ता दुरुस्तीच्या कामासाठी गुत्तेदाराने चक्क बाल कामगार जुपंले !

**तभा वृतसेवा**
**इस्लापूर, दि.२८ जून -**

इस्लापूर शहरासाठी मंजूर असलेल्या जलजीवन मिशन योजनेअंतर्गत कोट्यावधी रु च्या कामाचा बोजवारा उडाला असून पाईपलाईनसाठी खोदून ठेवलेल्या रस्त्याच्या डागडूजीसाठी तर आता गुत्तेदाराने कोणाचीही पर्वा न करता प्रशासनाच्या नाकावर टीचुन थेट बाल कामगार जुम्पल्याने संताप व्यक्त होत असून या गंभीर प्रकरणाची जिल्हाधिकाऱ्यांनी तात्काळ दखल घेऊन गुत्तेदारासह पाणीपुरवठा योजनेतील अधिकाऱ्यावर कठोर कारवाई करावी अशी मागणी इस्लापूर वासियांनीकडून केली जात आहे.



दुर्गम,मागास व कायम पानीटंचाईग्रस्त म्हणून ओळखल्या जाणाऱ्या इस्लापूर शहराच्या पाणीपुरवठ्यासाठी शासनाने जल जीवन मिशन योजनेअंतर्गत कोट्यावधी रुपयाचा निधी मंजूर केला. परंतु संबंधित गुत्तेदाराच्या मनमानी कारभारामुळे तसेच पाणीपुरवठा विभागातील अधिकाऱ्यांच्या दुर्लक्षामुळे गेल्या दोन वर्षापासून या कामाचे भिजत घोंगडे कायम आहे. निकृष्ट व अर्धवट कामाविरोधात स्थानिक नागरिकाकडून वारंवार वरिष्ठ प्रशासनाकडे तक्रारी करून सुद्धा त्याची दखल घेतली जात नसल्याने 'आलेया भोगासी असावे सादर' म्हणण्याची दुर्दैवी वेळ नागरिकांवर ओढावली आहे.अशातच काम पूर्ण होण्याची प्रतीक्षा लागून असताना गुत्तेदाराचा नवा कारनामा समोर आला आहे.जलजीवन मिशन योजनेच्या पाईपलाईनचे काम करण्यासाठी गुत्तेदाराने दोन वर्षापासून इस्लापूर शहरातील प्रत्येक प्रभागातील मजबूत स्थितीत असलेले रस्ते खोदून ठेवले परंतु मुदतीत पाईप न टाकल्यामुळे मागील दोन वर्षापासून येथील नागरिकाना रस्त्यावरून फिरणे अवघड बनले. दरम्यान खोदून ठेवलेल्या रस्त्याबद्दल नागरिकांनी रोष व्यक्त केल्यानंतर गुत्तेदाराने पाईपलाईनचे काम हाती घेऊन रस्त्यांची डागडुजी सुरू केली मात्र या रस्त्याच्या कामासाठी गुत्तेदाराने चक्क बालकामगार जुम्पल्याचे दिसून येत असून गोरगरीब कुटुंबातील १८ वर्षापेक्षा कमी वयाची मुले अत्यल्प मजुरीवर गुत्तेदाराच्या सांगण्याप्रमाणे दिवस रात्र रस्ता दुरुस्त करू लागले आहेत.एकीकडे शासनाकडून बालकामगार प्रतिबंधक कायद्याची युद्धस्तरावर अंमलबजावणी होत असताना गुत्तेदाराने मात्र कमी पैशात काम करून घेण्याच्या उद्देशाने व मजूरदार मिळत नसल्याचे कारण सांगून बालकांचे एकप्रकारे आर्थिक व शारीरिक शोषण सुरु केल्याने आश्चर्य व्यक्त होत आहे.या गंभीर प्रकाराकडे प्रशासनाचे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप नागरिक करू लागले आहेत.

इस्लापूर शहराला दरवर्षीच भीषण पाणीटंचाईला सामोरे जावे लागते.जलजीवन मिशन योजनेतुन पाण्याची समस्या कायमची मिटेल अशी नागरिकांची अपेक्षा होती मात्र गुत्तेदार आणि पाणीपुरवठा विभागातील अधिकाऱ्यांच्या मनमानी कारभारामुळे व दुर्लक्षामुळे इस्लापूरवासीयांचा घसा अद्याप कोरडा असून त्यात याच योजनेतील रस्त्याच्या कामासाठी बाल कामगारांचा वापर हा चिंतेचा विषय बनला आहे.या गंभीर बाबीची जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी गंभीर दखल घेऊन गुत्तेदारासह पाणीपुरवठा विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यावर कठोर कार्यवाही करावी या मागणीने जोर धरला आहे.

**जलजीवन मिशन योजना बनली भ्रष्टाचाराचे कुरण**

प्रत्येक कुटुंबाला बारमाही घरपोच पाणी मिळावे यासाठी केंद्र शासनाने हर घर नल से जल हे ब्रीद घेऊन जलजीवन मिशन ही महत्त्वकांक्षी योजना सुरू केली मात्र गुत्तेदार आणि पाणीपुरवठा विभागातील अधिकाऱ्याच्या अर्थपूर्ण संगणमतामुळे या योजनेचा पुरता बोजवारा उडाला असून ही योजना गुत्तेदार व अधिकाऱ्यांसाठी भ्रष्टाचाराचे कुरण बनली आहे.कामात दर्जा नाही, तक्रारीची दखल नाही. त्यामुळे पाणीपुरवठ्याचा कोट्यावधी रु.निधी पाण्यात गेला की काय? असा सवाल यानिमित्ताने उपस्थित केला जात आहे.

# आर्दडा नक्षत्राच्या पावसाने दिली पिकांना संजिवनी



**तभा वृतसेवा**
**नायगाव, दि.२८ जून -**

गेल्या काही आठवड्यांपासून उकाड्याने हैराण झालेल्या नायगाव तालुक्याला अखेर आर्द्रता या नक्षत्राच्या पावसाने दिलासा दिला आहे.या वेळेच्या पावसामुळे नायगांव,नरसीसह अन्य गावातील परिसरातील शेती शिवार सध्या फुलू लागले आहेत, सुकलेली पिकांची मने पुन्हा एकदा नव्या आशेने उजळून निघाली आहेत.

तालुक्यातील अनेक भागांत पेरणीनंतर पिकांमध्ये उगवन होऊन,उष्णतेमुळे जमिनीतील कोवळी मोडे कोमेजून जाणे अशा समस्या दिसून येत होत्या. मात्र आर्दडा नक्षत्राच्या सुरू होताच दोन-तीन दिवसात झालेल्या संततधार पावसा ने जमिनीला हवी तशी ओल मिळवून दिल्यामुळे. परिणामी सोयाबीन, तूर,उडीद, कापूस या खरीप हंगामातील पिकांना नव संजीवनी लाभली आहे.

तालुक्यातील नरसीसह अन्य गावच्या परिसरातील शेतकरी वर्गात सध्याआनंदाचे वातावरण निर्माण झालेआहे.नायगांव, ,नरसी,कांडाळा,होटाळा, कुंचेली,धानोरा, मुगांव,बेंद्री खंडगांव या परिसरातील शेतकऱ्यांनी समाधान व्यक्त केले असून, या पावसाने आमच्या पिकांना जणू दुसरा श्वास दिला आहे, अशा प्रतिक्रिया उमटत आहेत. अनेक शेतकऱ्यांनी पिकांवर प्रथम टप्प्यातील खते फवारणीची तयारी ही सुरू केली आहे.

कृषी विभागाकडून वेळोवेळी शेतकऱ्यांना मार्ग दर्शन होत नसल्याने शेतकऱ्यांत संताप व्यक्त केला जात आहे.

नायगांव तालुका कृषी विभागातील अधिकारी वर्गाकडून या परिसरातील शेतकऱ्यांना योग्यवेळी मार्गदर्शन दिले जात नसल्याने सध्या शेतकरी वर्गात कृषी विभागा बद्दल नाराजी व्यक्त केल्या जात आहे. दरम्यानच्या काळात ,हवामान विभागाच्या अंदाजानुसार येत्या काही दिवसांत पावसाचे प्रमाण सातत्याने राहण्याची शक्यता असून, त्या मुळे खरीप हंगामाची वाट अधिक सफल होण्याची आशा आता शेतकऱ्यांमध्ये निर्माण झाली आहे.

आर्दडा या नक्षत्रातील झालेल्या पावसामुळे तालुक्यातील नरसीसह सर्वच शेतकऱ्यांना नव्या उमेदीनं पुन्हाशेतीची आस लागली आहे. आर्दडा नक्षत्राच्या कृपेमुळे यंदा पीक उत्पादनात वाढ होऊन शेतकऱ्यांची मेहनत सफल होईल. अशी अपेक्षा सर्वत्र व्यक्त होत आहे.

## संक्षिप्त वृत्त

### उमरी मुकबधीर शाळेत वह्या-पेना खाऊ देवून नगरसेवकांनी केला वाढदिवस साजरा

**उमरी**-शहरातील सामाजीक बांधलकी जोपासून राजकीय क्षेत्रातील नेतृत्व जोपसनारे नगरसेवक प्र सोनुभाऊ वाघमारे यांनी इतर बॅर्नर बाजी अनाटाई खर्च टाळून मुखबधीर शाळेत वहया पेना खाऊ देवून वाढदिवस साध्या पद्धतीने उपस्थित मान्यवरा सोबत साजरा केला आहे. यावेळी सोनुभाऊ वाघमारे यांच्या सोबत धर्माबाद पत्रकार संघाचे माजी तालुकाध्यक्ष जी. पी. मिसाळे, राज्य पुरस्कार सेवानिवृत शिक्षक जी.एम. वाघमारे, पत्रकार सुदर्शन वाघमारे, पत्रकार गंगाधर धडेकर, पत्रकार आकाश सैदमवार, मुकबधीर शाळेचे मुख्याध्यापक व शिक्षकवृंद, नगरसेवक प्रतिनीधी सोनुभाऊ वाघमारे मित्रमंडळ उपस्थित होते.



### नागरबाई गायकवाड यांचे निधन

**बिलोली** -सगरोळीतील साठे नगर येथील रहिवासी नागरबाई गंगाराम गायकवाड वय (९५ वर्ष) यांचे सगरोळी येथे रहात्या घरी वृद्धपकाळाने दि.२८ जुन रोजी निधन झाले आहे. त्याच्या पश्चात दोन मुल,चार मुली,सुना,नातु,नातवंड असा मोठा परिवार आहे. कुंडलावाडी येथील शिक्षक शंकर गायकवाड यांच्या त्या आई होत्या.

# हिंदीसक्ती विरोधातील मोर्चात सहभागी व्हावे

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि.२८ जून -**

राज्यात पहिलीपासून हिंदी सक्तीचा निर्णय घेण्यात आला असून हा मराठी वरचा अन्याय आहे. त्यामुळे महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे संस्थापक अध्यक्ष राज ठाकरे यांच्या नेतृत्वात ५ जुलैला गिरगाव चौपाटीवरून भव्य मोर्चा काढण्यात येणार असून या मोर्चात नांदेड जिल्ह्यातील मराठी भाषिकांनी सहभागी व्हावे असे आवाहन मनसेचे जिल्हा अध्यक्ष विनोद पावडे आणि जिल्हाध्यक्ष मॉन्टीसिंग जहागिरदार यांनी केले आहे. यावेळी शहर अध्यक्ष अब्दुल शफीक, महिला आघाडी जिल्हाध्यक्ष उषा नरवाडे, सोपान कदम, काशिनाथ भोंग, मनविसे जिल्हाध्यक्ष अनिकेत परदेशी, दीपक स्वामी, वाहतूक सेना जिल्हाध्यक्ष संतोष सुनेवाड आदींची उपस्थिती होती.

I मोर्चा कोणत्याही पक्षाच्या झेंड्याखाली काढण्यात येणार नाही तर हा मोर्चा मराठी भाषेसाठी आणि मराठी अस्मितेसाठी काढण्यात येणार आहे.

दरम्यान नांदेड मधून ५० ट्रॅव्हल्स मधून आणि नांदेडहून मुंबई जाणाऱ्या अनेक रेल्वे गाड्यातून मनसेचे सैनिक, विद्यार्थी सेनेचे, महिला आघाडीचे पदाधिकारी कार्यकर्ते मोर्चात सहभागी होण्यासाठी जातील अशी माहितीही त्यांनी दिली.

# लोह्यात छत्रपती शिवाजी महाराज चौकाच्या सुशोभीकरणासाठी ६० लक्ष रुपयांचा निधी

**तभा वृतसेवा**
**लोहा, दि.२८ जून -**

शहराच्या विकासासाठी ६६३ कोटी रुपयांच्या विकास आराखडयाचे प्रस्ताव अंतिम टप्प्यात असून त्यात ड्रेनेज, सर्व भागात रस्ते यासह विविध विकास कामाचा समावेश आहे.



मुंबई येथे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या उपस्थितीत आ. चिखलीकर यांच्या पुढाकाराने शहराच्या विकासाठी येत्या पंधरवाड्यात बैठक होणार आहे. तत्पूर्वी शहरवासीयांना दिलेल्या आश्वासनाची पुर्ती करत आमदार प्रताप पाटील चिखलीकर यांनी छत्रपती शिवाजी महाराज चौकाच्या सुशोभीकरणासाठी ६० लक्ष रुपयांचा निधी मंजूर केला असून बेनाळ अंतर्गत रोडसाठी ४० लाख रुपये मंजूर झाले आहेत. चौकाच्या सुशोभिकरणामुळे शहराच्या वैभवात भर पडणार आहे.

आमदार प्रताप पाटील चिखलीकर यांनी १३ जून रोजी शहराच्या विकासाठी नगर परिषदेच्या सभागृहात बैठक घेतली. लोहा शहर व बेनाळ वाडी तांडे या संपूर्ण भागात ड्रेनेज, पाणी पुरवठा योजनेचे पाईप टाकण्याचे काम सुरू आहे. त्याची टेस्टिंग केल्यानंतर शहरात मुख्य व अंतर्गत रस्ते सिमेंटचे होतील. पोलीस ठाण्याच्या इमारतीचे प्रलंबित काम, लगतच्या जागेत बीओटी तत्वावर कॉम्प्लेक्स, सुनेगाव तलावालगत गार्डन, क्रीडा संकुल,विविध विकास कामासाठी ६६३ कोटी रुपयांचा प्रस्ताव अंतिम टप्प्यात आहेत.

मुंबई येथे शहराच्या विकासाठी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या उपस्थितीत बैठक होणार आहे. शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक हा तीन राष्ट्रीय महामार्गाना जोडणारा आहे. याच भागात छत्रपती शिवाजी महाराज यांचे भव्य स्मारक दीड कोटी रुपयांच्या निधीतून साकारले जात आहे. त्यामुळे हा चौक सुंदर व आकर्षक करण्यासाठी मागील आठवड्यात सुशोभीकरण करण्याचे आ. चिखलीकरांनी जाहीर केले होते आणि १९ जून रोजी ६० लक्ष रुपयांचा निधी मजूर केला. याच चौकात भव्य तिरंगा उभारण्यात येणार आहे. विद्युत रोषणाईत हा परिसर उजाळून निघणार आहे. दिलेल्या आश्वासनाची आठवडाभरातच आमदारांनी पूर्तता केली आहे. शिवाय बेनाळ अंतर्गत रस्त्याचे काम सुरू आहे. आता उर्वरित कामासाठी ४० लक्ष रुपयांची निधी मंजूर झाला आहे. दुभाजकाचे सुद्धा सुशोभीकरण करून तेथे वेगवेगळे पुतळे उभारण्याचा मनोदय आहे. आ. प्रताप पाटील चिखलीकर यांनी व्यक केला आहे.

# खासदार नागेश पाटील आष्टीकर यांची सवेंदनशिलता; स्वखर्चाने केला रस्ता दुरुस्ती

**तभा वृतसेवा**
**हदगाव, दि.२८ जून -**

शहरातील राठी चौकात कैलाशचंद्र बलदवा यांच्या दुकानासमोर भला मोठा खडा पडल्याने त्यात पावसाचे पाणी जमा झाल्याने खाजगी शिकवणी साठी, शाळेत जाणाऱ्या लहान मुलांना अडचणी निर्माण होत्या. त्याची दखल घेत खा. नागेश पाटील आष्टीकर यांनी स्वखर्चाने खड्डा बुजवुन दिला.

शहरातील मुख्य रस्त्यावर अनेक जागी मोठे मोठे खड्डे पडले आहेत त्याकडे नगरपालिका लक्ष देत नाही ना अन्य कोणी लोकप्रतिनिधी त्यामुळे वयोवृद्ध नागरिक लहान मुले याना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत आहे. शहरातील व्यापारीपेठेत मुख्य चौकात रस्ते अस्तित्वात राहिले नसून पाणी पुरवठा च्या कामात जीवन प्राधिकरण च्या कंत्राटदार यांनी रस्ते खोदले मात्र ते रस्ते दुरुस्त न केल्याने आझाद चौक,भाई बन्सीलाल चौक,राठी चौक भागातून जनतेला प्रवास करणे अवघड झाले होते. शहरातील राठी चौकात कैलाशचंद्र बलदवा यांच्या दुकानासमोर भला मोठा खडा पडल्याने त्यात पावसाचे पाणी जमा झाल्याने खाजगी शिकवणी साठी, शाळेत जाणाऱ्या लहान मुलांना अडचणी निर्माण होत्या अनेकदा वयोवृद्ध नागरिक लहान बालके पाय घसरून पडल्या च्या घटना घडल्या होत्या. व्यापारी बांधवांनी अनेकदा नगर पालिकेत तक्रारी करूनही कोणाचा पायपोस कोणाला नसल्याने जनतेला त्रास सहन करावा लागत होता. दरम्यान या बाबतीत माजी नगराध्यक्ष गणेश तोष्णीवाल यांनी खा. नागेश पाटील यांना गाऱ्हाणे मांडले होते. त्याची दखल घेत स्वखर्चाने खा. नागेश पाटील आष्टीकर यांनी दिल्ली येथे असताना सुद्धा त्यांचे स्वीय सहाय्यक विनोद हमणे यांना पाठवून व जातीने हजर राहून शहरातील राठी चौकात बलदवा यांच्या दुकान समोर पडलेला मोठा खड्डा बुजवून रस्त्याची दुरुस्ती करून दिली आहे. यामुळे शाळेत जणारे लहान मुले, वयोवृद्ध नागरिक यांच्या चेहऱ्यावर हास्य दिसून आले तर व्यापारी बांधवांनी पण खा. नागेश पाटील आष्टीकर यांचे आभार मानले आहेत.




# डोणगाव येथील दलित वस्तीतील नालीवरचे धाबे करण्याची मागणी

**तभा वृतसेवा**
**मुदखेड, दि.२८ जून -**

तालुक्यातील मौजे डोणगाव येथील दलित वस्ती येथील गावातील मेन रोड असून त्या ठिकाणी दहा महिन्यापासून नाली वरचे धाबे पडून गेलेले असुन नालीवरचे धाबे करावे अशी मागणी गावकऱ्यांनी केली आहे.

या ठिकाणी रात्रीच्या वेळी लहान मुले आणि वृद्ध व्यक्ती पडण्याचे प्रमाण वाढले आहेत त्यामुळे गावकऱ्यांना त्रास होत असल्याची सूचना ग्रामपंचायत कार्यालय येथे सरपंच, ग्रामसेवक, उपसरपंच, यांना वारंवार तोंडी सूचना देऊनही त्यांनी कामावर लक्ष दिले नाही. आणि गेल्या काही महिन्यात दलित वस्तीतील नविन नालीचे काम झालेले आहे



परंतू मिटर प्रमाणे नाली चे काम झालेले नाही. उर्वरित नालीचे काम ग्रामसेवक यांनी काही दिवसात करतो म्हणून अश्वासन दिले होते पण त्यांनी त्या कामावर लक्ष दिले नसल्याचे निवेदनात नमूद केले आहे. यावेळी निवेदनकर्ते कल्याणे व्यंकटी दिगंबर,गंड्रस राजेश बालाजी, गंड्रस साहेबराव मारुती, शिंदे मारुती, धोंडीबा चोखोबा वाघमारे,बालाजी दिगंबर उपासे,मारुती किशन सूर्यवंशी,कोंडीबा शामराव गोरठेकर, संजय नागनाथ पांचाळ,यांनी डोणगांव ग्रामपंचायत कडे निवेदनाद्वारे मागणी केली आहे.

# श्री. सुभाष रुरल को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटीचे उद्घाटन



**तभा वृतसेवा**
**हदगाव, दि.२८ जून -**

श्री. सुभाष शुगर प्रा. लि.हडसणी तथा शिऊर साखर कारखाना लि.वाकोडीचे चेअरमन सुभाषराव लालासाहेब देशमुख यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधत श्री. सुभाष रुरल को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी लि. नांदेड या पतसंस्था चे प्रथम मुख्य शाखेच्या उद्घाटन सोहळा मोठ्या थाटात संपन्न झाले असून नेहमीच शेतकरी बांधवांचे उन्नती व आर्थिक विकास हे ध्येय बाळगून ऊस उत्पादक शेतकरी बांधवांच्या सेवेत ही पतसंस्था फायदेशीर ठरणार आहे. यामुळे कारखान्याच्या यशात आणखीन एक मानाचा तुरा रोवला गेला. याप्रसंगी कार्यकारी संचालक सुशीलकुमार देशमुख, सोसायटीचे संचालक मंडळ ,सभासद, शेतकरी बांधव, ऊस वाहतूक ठेकेदार सह दोन्ही कारखान्याचे जनरल मॅनेजर ,अधिकारी व कर्मचारी बांधव उपस्थित होते.

श्री. सुभाष रुरल को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी लिमिटेड नांदेड या सोसायटीचे प्रथम शाखेचा उद्घाटन करण्यामागचा मुख्य हेतू म्हणजे ऊस उत्पादक शेतकरी बांधवांची हदगाव शहरातील बँकेत होणारी गळचेपी व गर्दी या सगळ्या घटनेचा फटका ऊस उत्पादक शेतकरी बांधवांना बसत असून त्यामुळे त्यांचा वेळ व पैसा मोठ्या प्रमाणावर वाया जात होता ही बाब लक्षात घेता ही पतसंस्था उभारण्यात आली आहे. यामुळे ऊस उत्पादक शेतकरी बांधवांचे पैशाची व इथल्या कर्मचाऱ्यांची पगाराची व्यवस्था चांगल्या प्रकारे होणार आहे. यावेळी सगळ्यांच्या उपस्थितीत चेअरमन सुभाषराव देशमुख यांच्या वाढदिवसानिमित्त वृक्ष लागवड मोठ्या प्रमाणात करण्यात आली तदनंतर शिऊर साखर कारखाना वाकोडी येथे गाळप हंगाम २०२५-२६ च्या मिल रोलर पूजनाचा कार्यक्रम कारखान्याचे चेअरमन सुभाषराव देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली व कार्यकारी संचालक सुशीलकुमार देशमुख यांच्या प्रमुख उपस्थितीत वर्क्स मॅनेजर देविदासराव कराळे त्यांच्या सुविधा पत्नी यांच्या हस्ते संपन्न झाला. शिऊर या ठिकाणी सुद्धा दोन्ही कारखान्याचे चेअरमन सुभाषराव देशमुख यांना वाढदिवसानिमित्त शुभेच्छा देण्यात आले.


## टि.सी.हरवली

कू.प्रतिभा तूकाराम माझळकर या नावाची इयत्ता बारावी उत्तीर्णची टि.सी.नांदेड भोकर बस प्रवासात गहाळ झाली असून कूणाला सापडल्यास खालील पत्त्यावर संपर्क करावा

**संपर्क पत्ता**
**तूकाराम माझळकर**
**रा.वाकद ता,भोकर जी.नांदेड.**


### श्री रेणुकादेवी मंदिर संस्थानची पुरातन भिंत कोसळल्याची घटना;

# मोठे नुकसान टळले, परंतु देखरेख व सुरक्षेसह अनेक प्रश्न अनुत्तरित

**तभा वृतसेवा**
**माहूर, दि.२८ जून -**

श्री रेणुका देवी मंदिरालगतची पुरातन भिंत गुरुवारी दुपारी १ वाजता कोसळली, त्यानंतर सुमारे ३ वाजता भिंतीचा उरलेला अर्धवट भागही खाली कोसळला. ही घटना मंदिर परिसरातील सुरक्षेच्या दृष्टीने अत्यंत गंभीर मानली जात असून, यामध्ये अनेक महत्त्वाच्या वस्तूंचे नुकसान झाल्याचे समोर आले आहे.

**भाविकांनी दिलेल्या भेटवस्तूंचे नुकसान**

घटनास्थळी पडलेल्या भिंतीच्या ढिगाऱ्याखाली भाविकांनी मंदिराला अर्पण केलेल्या अनेक मौल्यवान वस्तू दबून गेल्याचे आढळून आले. त्यामध्ये महागडी धातूच्या पितळी समया, घंट्या, डउऊ टीव्ही, शोभेच्या वाघाचे कातडे, महावस्त्र आणि इतर अनेक पूजावस्तूंचा समावेश आहे.काही वस्तूंना झाकण्यासाठी घटनास्थळी टिनपत्रे टाकून ठेवण्यात आल्याचेही प्रत्यक्षदर्शींनी सांगितले. त्यामुळे नुकसान लपवण्याचा प्रयत्न झाल्याचा आरोपही होत आहे.

संस्थानचे प्रभारी व्यवस्थापक यांनी नुकसानीबाबतची अधिकृत माहिती देण्यास सध्या असमर्थता दर्शवली आहे. त्यामुळे एकूण नुकसानीचा अंदाज अद्याप स्पष्ट झालेला नाही. मात्र, घटनास्थळी



पाहणी केलेल्या माध्यम प्रतिनिधींनी दिलेल्या माहितीनुसार अनेक महत्त्वाच्या वस्तूंना नुकसान पोहोचले असण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. नुकसान झाकण्याच्या या केविलवाण्या प्रयत्नामुळे राज्यातील साडेतीन शक्तिपीठांपैकी एक असलेल्या श्री क्षेत्र माहूरगड येथील श्री रेणुकादेवी मंदिर संस्थानच्या निदान मंदिर व परिसरातील देखरेख व सुरक्षा व्यवस्थेच्या पारदर्शकतेबाबत शंका निर्माण होत आहेत.

**मनुष्यहानी टळली,**
**पण धोका मात्र कायम**

भिंत कोसळण्याची घटना ज्या ठिकाणी घडली, त्यापासून अगदी काही अंतरावरच संस्थानचे महिला व पुरुष कर्मचारी दुपारचे जेवण करत होते. हे पाहता, भविष्यात अशा प्रकारच्या दुर्घटना टाळण्यासाठी तात्काळ उपाययोजना करणे या घटनेनंतर तर खुप अत्यावश्यक बनले आहे.

**लिफ्ट व स्कायवॉक प्रकल्पाच्या कामातील दिरंगाई कारणीभूत?**

या घटनेला लिफ्टसह स्कायवॉक प्रकल्पाच्या कामात कंत्राटदाराकडून होत असलेल्या दिरंगाईचे दुष्परिणाम कारणीभूत असल्याचे बोलले जात आहे. श्री रेणुका देवी मंदिरात दिव्यांग आणि वयोवृद्ध भाविकांना सोयीस्कर दर्शन मिळावे म्हणून केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या पुढाकाराने हा प्रकल्प मंजूर झाला होता. दिड वर्षाचा कालावधी देऊन काम सुरु करण्यात आले, परंतु अद्याप केवळ ३०% कामच पूर्ण झाले आहे. कामाची गती अत्यंत संथ असून, मंदिरालगत केलेले खोदकाम आणि वेळेवर संरक्षक उपाय न केल्यामुळेच ही भिंत कोसळली, असे जाणकार प्रत्यक्षदर्शी सांगतात. प्रकल्प वेळेत पूर्ण करण्यासाठी जिल्हाधिकारी राहुल कर्डीले यांच्या प्रयत्नांना काम करणाऱ्या खाजगी कंपनीची पुरेशी साथ मिळेल का? याबद्दल मात्र या घटनेनंतर निश्चितच शंका उपस्थित होत आहे.

**१८ महिन्याची कालमर्यादा**

नांदेड जिल्ह्यातील माहूरच्या रेणुकामातेचे मंदिर महाराष्ट्रातील साडेतीन शक्तीपिठांपैकी एक आहे. माहूरच्या विकासाबाबत मार्च २०२३ मध्ये मंत्री नितीन गडकरी यांनी भक्तांना आश्वासित केल्यानुसार माहूर गडावर लिफ्टसह स्कायवॉकची सुविधा अवघ्या १८ महिन्यांत भक्तांना उपलब्ध होणार असे सांगण्यात आले होते.वयोवृद्ध, ज्येष्ठ नागरिकांसाठी अत्यावश्यक असलेल्या या सुविधेच्या निर्मितेचे भूमीपूजन २० मे २०२३ रोजी केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते उत्साहात संपन्न झाले. माहूरला लाखोंच्या संख्येने भाविक येतात. तत्कालीन मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांनी येथे मोठ्या प्रमाणावर निधी उपलब्ध करून दिला होता. मंदिर परिसराचा विकास झाला असला, तरी इतर अनेक गैरसोयीमुळे भक्तांना नाहक त्रास सहन करावा लागत होता. विशेष म्हणजे श्रीच्या दर्शनासाठी जवळपास अडीचशे गड पायऱ्या चढून जाणे दिव्यांग, बाल्य व वयोवृद्ध व्यक्तींना मोठे त्रासदायक आणि आव्हानात्मक काम ठरत होते. या गोष्टीची जाणीव झाल्यावर केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचे कुलदैवत असलेल्या माहूरच्या रेणुकादेवी मंदिराच्या विकासासाठी केंद्र सरकारने ५० कोटी ६० लाख रुपयांच्या निधीला तांत्रिक मान्यता देत १८ महिन्यांत प्रकल्पाचे काम पूर्ण करण्याची कालमर्यादा ठरवून दिली व याची जबाबदारी 'व्यापकॉस लि. गुरुग्राम'चे डी. सी. गुरुबक्षांनी यांना देण्यात आली.

सोलापूर तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
https://epaper.dainiktarunbharat.com

# संतश्रेष्ठ नामदेव महाराज पालखीचे बीड जिल्ह्यातील जवळबन येथे जल्लोषात स्वागत;भव्य अश्वरिंगण सोहळा



**जवळबन गावाला अनेक वर्षाची परंपरा**

**तभा वृत्तसेवा**
**केज दि.२८ जून**

हिंगोली जिल्ह्यातील नरसी नामदेव महाराज पालखीचे बीड जिल्ह्यातील जवळबन येथे आज शनिवारी सकाळी वाजत- गाजत जंगी स्वागत करण्यात आले. यावेळी पालखीच्या स्वागतासाठी रस्त्यावर रांगोळी काढल्या होत्या.

मराठवाड्यातील ग्रामीण भागातील पहिला अश्व रिंगण सोहळा जवळबन या ग्रामीण भागातील गावात संपन्न झाला आहे. तर यावेळी फुगडी, वारकऱ्यांचे रिंगण अश्या विविध कार्यक्रमाने गावकऱ्यांच्या डोळ्याचे पारणे फेडले आहे. गावात अगदी भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते. गावातील कै. निवृती सोपानराव करपे यांनी १९९५ साली संतश्रेष्ठ नामदेव महाराजांच्या दिंडीला गावात सुरुवात केली ती आजतागायत सुरू आहे. गावातील हनुमान मंदिरात कीर्तन, भजन करून, महाप्रसाद घेऊन ही पालखी आज पुढे युसुफवडगाव येथे मुक्काम करणार असून उद्या रविवारी पंढरपूरसाठी प्रस्थान करणार असल्याची माहिती वारकऱ्यांनी दिली आहे.

# सरपंच श्रीकांत फड यांनी आंदोलनाचा इशारा देताच

## परळी-गंगाखेड राष्ट्रीय महामार्गाचे रखडलेले काम झाले सुरू, रस्ता रोको आंदोलन स्थगित

**तभा वृत्तसेवा**
**परळी वैद्यनाथ दि.२८ जून**



परळी - गंगाखेड रस्त्याचे रखडलेले काम तातडीने सुरू करावे यासाठी रस्ता रोको आंदोलन करण्याचा इशारा दाउतपुरचे सरपंच श्रीकांत (कांताभाऊ) फड यांनी देताच प्रशासन खडबडून जागे झाले आणि रखडलेले काम सुरू केले. मागणीला यश आल्याने सरपंच श्रीकांत (कांताभाऊ) फड यांनी दि. ३० जुन रोजीचे रस्ता रोको आंदोलन तात्पुरते स्थगित केले असुन नागरीकांच्या अतिशय जिव्हाळ्याचा प्रश्न सोडल्याबद्दल प्रशासनाचे आभार व्यक्त केले.

परळी वैजनाथ ते गंगाखेड या राष्ट्रीय महामार्गाचे काम गेल्या काही दिवसांपासून बंद होते. यामुळे नागरिक, वाहनधारक, गावकऱ्यांची गैरसोय होत होती. तसेच रूग्णांची ने-आण करण्यासाठीही वाहन चालकाला तारेवरची कसरत करावी लागत होती. मागील वर्षी पुलाचे काम अर्धवट असल्याने सरस्वती नदीला आलेल्या पुरामुळे २ ते ३ वेळा २ दिवस शहराचा संपर्क तुटला होता. याबाबत वेळोवेळी सांगुनही रस्ता आणि पुलाचे काम केले जात नसल्याने दाउतपुरचे सरपंच श्रीकांत (कांताभाऊ) फड यांनी सदरचे काम तात्काळ पुर्ण करण्यात यावे अन्यथा दि. ३० जुन २०२५ रोजी रस्ता रोको आंदोलन करण्यात येईल असा इशारा निवेदनाद्वारे कार्यकारी अभियंता, राष्ट्रीय महामार्ग, विभाग लातूर, उपविभागीय अभियंता, राष्ट्रीय महामार्ग, उपविभाग परळी वैजनाथ यांना दिला होता. याबाबत तहसिलदार व्यंकटेश मुंडे, संबंधित विभागाचे अधिकारी व दाउतपुरचे सरपंच श्रीकांत (कांताभाऊ) फड आणि सहकारी यांच्यात चर्चा झाली.

# आ. बबनराव लोणीकर यांनी केलेले वक्तव्य म्हणजे बालिश बहुबायकांत बडबडला - तुळशीराम पवार

आमदार लोणीकरांनी जनतेची माफी मागावी; जनसंग्राम संघटनेची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**परळी वैद्यनाथ दि.२८ जून**

सोशल मीडियावर बसलेले चार-पाच कार्टी असतात. त्याच्या माईचा पगार बबनराव लोणीकरने केला. त्याच्या बापाचं पेन्शन बबनराव लोणीकरने केलं. नरेंद्र मोदींनी सहा हजार रुपये तुझ्या बापाला पेरणीला दिले, तुझ्या मायच्या तुझ्या बहिणीच्या तुझ्या बायकोच्या नावावर लाडक्या बहीण योजनेतून पैसे दिले. तुझ्या अंगावरचे कपडे आमच्या सरकारचे आणि तुझ्या पायातली चप्पल आमच्यामुळेच. हातातलं ते मोबाईलचं डबडं आमच्यामुळेच आहे. आमचंच घे आणि आमच्याच तंगड्या वर करतो, असं वादग्रस्त वक्तव्य भाजपाचे आमदार माजी मंत्री बबनराव लोणीकर यांनी केले. एखाद्या लोकप्रतिनिधीने असे वक्तव्य करणे म्हणजे बालिश बहुभायकांत बडबडला असेच आहे. जनसंग्राम संघटनेचे संस्थापक अध्यक्ष तुळशीराम पवार यांनी आमदार बबनराव लोणीकर यांच्या वक्तव्याचा एका प्रसिद्धीपत्रकाद्वारे तीव्र निषेध व्यक्त केला आहे .

# अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाच्या अध्यक्षांकडून कामकाजाचा आढावा

## महामंडळ अध्यक्ष नरेंद्र पाटील यांनी केली नियोजित उपविभागीय कार्यालयाच्या जागेची पाहणी

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२८ जून**



अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाचे अध्यक्ष नरेंद्र अण्णासाहेब पाटील यांनी शनिवारी बीडच्या जालना रोड येथे होत असलेल्या महामंडळाच्या उपविभागीय कार्यालयाच्या जागेची पाहणी केली. यासह याठिकाणी महामंडळाच्या कामकाजाचा सविस्तर आढावाही घेतला.मराठवाड्यातील महामंडळाचे सर्व जिल्हा समन्वयक, संबंधित कर्मचारी उपस्थित होते.

मराठवाडा विभागातील हे कार्यालय सुसज्ज आणि अद्ययावत असणार आहे. पात्र लाभार्थ्यांना या ठिकाणी महामंडळाकडून देण्यात येणाऱ्या सर्व सुविधा येथे उपलब्ध असतील. या उपविभागीय कार्यालयामुळे मराठवाड्यातील लाभार्थी यांचा वेळ वाचेल. अधिकाधिक लाभार्थी यांना महामंडळाच्या योजनांचा लाभ देण्यासही लाभार्थी व महामंडळ यांना सोयीचे होईल. तालुकास्तरावर देखील महामंडळाच्या योजना पोहोचविण्यासाठी आगामी काळात दौरे करण्यात येणार असल्याचे पाटील म्हणाले.

# तंत्रशिक्षण मंडळाच्या उन्हाळी परीक्षेत टी.बी.गिरवलकर पॉलिटेक्निकचे यश

**निकालात मुलींची बाजी ; गणितात मिळविले शंभर गुण**

**तभा वृत्तसेवा**
**अंबाजागोई दि.२८ जून**



येथील महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्था संचलीत टी.बी.गिरवलकर पॉलिटेक्निकच्या, विद्यार्थ्यांनी महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाने घेतलेल्या उन्हाळी परीक्षा-२०२५ मध्ये उज्ज्वल निकालाची परंपरा कायम ठेवत दैदीप्यमान यश संपादन केले. त्यामध्ये गणित विषयात अंकिता हाके, योगेश्वरी जाधव आणि शुभ्रा हालगे या विद्यार्थीनींनी १०० पैकी १०० गुण घेऊन स्पृहणीय यश संपादन केले आहे. कॉम्प्युटर इंजिनीअरींग शाखेचा निकाल ९८ टक्के, इलेक्ट्रिकल इंजिनीअरींग शाखेचा निकाल ९५ टक्के, मेकॅनिकल इंजिनिअरींग शाखेचा निकाल ९० टक्के, सिव्हिल इंजिनिअरींग शाखेचा निकाल ८० टक्के, ईलेक्ट्रॉनिक्स कॉम्प्युटर इंजि.शाखेचा निकाल ९५ टक्के लागला आहे.

प्रथम वर्ष कॉम्प्युटर इंजिनीअरींग शाखेतून अंकिता हाके (९४.१२ टक्के), योगेश्वरी गाढवे (९३.१८ टक्के), शुभ्रा हालगे (९२ टक्के), द्वितीय वर्ष कॉम्प्युटर इंजिनीअरींग शाखेतून समाधान छत्रे (९०.२४ टक्के), क्षितीजा आगळे (८९.७७ टक्के), वैभवी रांदड (८७.०६ टक्के), तृतिय वर्ष कॉम्प्युटर इंजिनीअरींग शाखेतून अभिषेक सुरवसे (९३.५४ टक्के), स्नेहल पवार (९१.७७ टक्के), बालाजी गायकवाड (९१.०६ टक्के), प्रथम वर्ष ईलेक्ट्रॉनिक्स कॉम्प्युटर इंजिनिअरींग शाखेतून गायत्री मुंडे (८५.६३ टक्के), अंजली धायतिडक (८२.२५ टक्के), अस्मिता गित्ते (७८.१३ टक्के), प्रथम वर्ष स्थापत्य इंजिनिअरींग शाखेतून आदित्य दराडे (७७.४४ टक्के), सुमित चटप (७३.८९ टक्के), आशिष पवार (६९.४४ टक्के), प्रथम वर्ष इलेक्ट्रिकल इंजिनिअरींग शाखेतून आदित्य औताडे (७६ टक्के), विशाल शितोळे (७५ टक्के), गौरी फुण्णे (७१.२९ टक्के), अभिषेक मुसळे (७१.२९ टक्के), द्वितीय वर्ष इलेक्ट्रिकल इंजिनिअरींग शाखेतून योगिता निळे (८०.८२ टक्के), पांडूरंग पवार (७५.७७ टक्के), वैष्णवी नागरगोजे (७२.९४ टक्के), तृतिय वर्ष इलेक्ट्रिकल इंजिनिअरींग शाखेतून मुक्ता बिडगर (८९.८९ टक्के), ओम भगत (८९.७८ टक्के), आकांक्षा मुंगळे (८९.२८ टक्के), प्रथम वर्ष मेकॅनिकल इंजिनिअरींग शाखेतून ओंकार रेणवकर (७८.५६ टक्के), रितेश घोरपडे (७५ टक्के), अभय खरटमोल (७४.२२ टक्के), द्वितीय वर्ष मेकॅनिकल इंजिनिअरींग शाखेतून ज्ञानेश्वरी सिरसाठ (८१.७८ टक्के), आदित्य चव्हाण (७७.७८ टक्के), सिद्धार्थ गवळी (७३.३३ टक्के), तृतिय वर्ष मेकॅनिकल इंजिनिअरींग शाखेतून मेघराज साठे (८३.३३ टक्के), संकेत डोंगरे (७६.४४ टक्के), वेदांत तट (७५ टक्के) या विद्यार्थ्यांनी यश संपादन केले. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्थेचे अध्यक्ष अदीनाथ सांगवे, उपाध्यक्ष माधवराव पाटील चिंचोलीकर, सचिव माधवराव पाटील टाकळीकर, सहसचिव सुनिल मिटकरी, अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.बी.आय.खडकभावी. कार्यवाहक प्राचार्य डॉ.एन.ए.रावबावले, तंत्रनिकेतनचे प्राचार्य लक्ष्मीकांत बगले, विभागप्रमुख व्हि.व्हि.कन्नुर, श्रीमती अंजली कुलकर्णी, कु.रेणुका डबीर, प्रा.व्हि.व्हि.रावबावले, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी केले आहे.

# दुकान जळाल्याने आर्थिक विवंचनेत सापडलेल्या मित्राला सुरू करून दिला नवा व्यवसाय

**रोटरी क्लबचा अनोखा उपक्रम**

**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.२८ जून**





आगीत रेडीमेड कपड्यांचे दुकान जळून खाक झाले.यात गणेश राऊत यांचे २५ लाखांचे नुकसान झाले. हताश झालेल्या राऊत यांना रोटरी क्लबच्या सर्व मित्रांनी एकत्रित येत भरघोस मदत केली. या मदतीतून आज त्यांच्या नवीन हॉटेल व्यवसायाची सुरुवात झाली. मित्रांच्या या मदतीच्या झऱ्याने उध्वस्त झालेल्या कुटुंबाला जगण्याचे नवे बळ मिळाले.

येथील अत्यंत सामान्य कुटुंबातील गणेश राऊत यांनी १० वर्षापूर्वी अल्प भांडवलावर रेडीमेड कपड्यांचे दुकान सुरू केले. हळू हळूहळू त्यांनी या व्यवसायात मोठी प्रगती केली. ते स्वतःच्या कष्टातून उभ्या केलेल्या साम्राज्यावर उभे असतानाच नियतीने डाव साधला. अचानक लागलेल्या आगीत त्यांचे रेडीमेड कपड्यांचे दुकान जळून खाक झाले. यात त्यांचे २५ लाखांपेक्षाही ज्यात नुकसान झाले. तांत्रिक अडचणी मुळे त्यांना कसलाही विमा,अथवा मदत मिळाली नाही. अचानक कोसळलेल्या संकटामुळे राऊत कुटुंबीय मोठ्या आर्थिक विवंचनेत सापडले. गणेश राऊत हे रोटरी क्लब चे माजी सचिव होते. त्यांच्या या दुःखात रोटरी परिवार सहभागी झाला. मात्र केवळ दुःख न करीत बसता या आर्थिक विवंचनेतून त्यांना सावरण्यासाठी प्रयत्न झाले पाहिजेत. असा निर्धार रोटरी क्लबचे अध्यक्ष कल्याण काळे व सचिव धनराज सोळंकी यांनी केला. रोटरी क्लब मधील ८६ सदस्यांची बैठक घेतली. व पुन्हा राऊत यांना नव्याने व्यवसायात उभा करण्याचा संकल्प केला. सर्व सदस्यांनी जशी जमेल तशी आर्थिक मदत राऊत यांना केली. दुर्घटने नंतर चारच महिन्यात गणेश राऊत यांना नवीन हॉटेल व्यवसाय उभा करून दिला. शनिवारी सकाळी या नवीन व्यवसायाची शानदार सुरुवात जेष्ठ सामाजिक कार्यकर्ते नंदकिशोर मुंदडा,राऊत यांच्या मातोश्री कस्तुरबाई राऊत,रोटरीचे अध्यक्ष कल्याण काळे,सचिव धनराज सोळंकी व सर्व रोटरी पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत झाली. आर्थिक संकटात सापडलेल्या आपल्या मित्राला पुन्हा नवी उभारी देण्यासाठी त्यांच्या पंखात आर्थिक बळ निर्माण केले. व विवंचनेत सापडलेल्या कुटुंबाला धीर दिला. रोटरीच्या या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# यशाचे मुल्यांकन निर्धारावर अवलंबून असते

## गुणवंत विद्यार्थांच्या कौतुक सोहळ्यात पोलीस अधीक्षक डॉ. सोमय मुंडे यांचं प्रतिपादन

**तभा वृत्तसेवा**
**उदगीर दि.२८ जून**



कोणतेही यश अथवा अपयश अंतिम नसते.यशाचं मुल्याकंन आपल्या मनातील निर्धारावर अवलंबून असते.असे उद्गार भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेच्या वर्धापन दिनानिमित्त लाल बहादूर शास्त्री शैक्षणिक संकुल उदगीर आयोजित गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्कार सोहळ्यात लातूर चे पोलीस अधीक्षक सोमय मुंडे यांनी गुणवंतांना संबोधित करतांना काढले.

लाल बहादुर शास्त्री शैक्षणिक संकुलाच्या वतीने शालांत प्रमाणपत्र परीक्षेत तसेच विविध शालेय व अन्य स्पर्धेत गुणवंत ठरलेल्या विद्यार्थांचा तसेच उपक्रमशील पुरस्कार प्राप्त मुख्याध्यापक व शिक्षकांचा सत्कार सोहळा उदगीर येथील राधेकृष्ण मंगल कार्यालयात संपन्न झाला.

सत्कार सोहळयाचे अध्यक्ष भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेचे अध्यक्ष डॉ.सुरेंद्र आलूरकर तर व्यासपीठावर प्रमुख पाहुणे पोलीस अधीक्षक डॉ सोमय मुंडे, शल्यचिकित्सक डॉ.विनायक मुंडे, शिलाताई आलूरकर, स्थानिक समन्वय समितीचे अध्यक्ष मधुकरराव वट्टमवार,कार्यवाह शंकरराव लासुणे,लातूर जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष राहूल केंद्रे,भाजपा युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष अमोल निडवदे ,डॉ. प्रकाश येरमे, शालेय समितीचे अध्यक्ष सतनप्पा हुरदळे , व्यंकटराव गुरमे, प्रशांत राजूरकर,अंजलीताई नळगीरकर, चंद्रकांत धनबा,मुख्याध्यापक संजय कुलकर्णी प्राथमिकचे मुख्याध्यापक अंकुशराव मिरगुडे प्राचार्य श्रीपाद सिमंतकर उपस्थित होते.

याप्रसंगी शालांत प्रमाणपत्र परीक्षेत शंभर टक्के प्रांप्त गुण घेतलेल्या सहा व नव्वद टक्केच्या वर गुण प्राप्त केलेल्या अठ्यान्नव विद्यार्थांचा,एन एम एस परीक्षेत उत्तीर्ण विद्यार्थी,इंडियन ऑलिंपियाड स्पर्धा परीक्षेत गोल्ड मेडल व स्कॉलरशीप प्राप्त,संसद स्कूल संसद स्पर्धेत तृतीय क्रमांक व पंतप्रधान पद मिळवणारी अक्षरा दुरूगकर,वेगवेगळ्या क्रीडा प्रकारात बक्षीसप्राप्त ,निबंध स्पर्धा, संस्कृती संवर्धन स्पर्धत व एन सी.सी बेस्ट कॅडेट उपक्रमात बक्षीसप्राप्त विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. तसेच शंभर शिक्षक क्लब जालन्यातील संस्थेचा पुरस्कार प्राप्त करणारे मुख्याध्यापक संजय कुलकर्णी, जिल्हास्तरीय आदर्श पुरस्काराने सन्मानित झालेल्या नीता मोरे, दहावी विभाग प्रमुख रामेश्वर मलशेट्टे, सहप्रमुख श्रद्धा पाटील यांचाही मान्यवरांच्या हस्ते यथोचित सन्मान करण्यात आला.

पोलीस अधीक्षक डॉ. सोमय मुंडे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना म्हणाले की ,यशस्वी विद्यार्थ्यांचे मी मनापासून अभिनंदन करतो.परंतु यश कायम टिकवायचे असेल तर आपल्या प्रयत्नात सातत्य असणे गरजेचे आहे. कोणतेही यश एका रात्रीतून मिळत नसते.यशासाठी मनाचा निर्धार पक्का असावा लागतो. तोच माणूस यशस्वी होऊ शकतो की जो रोजचा दिवस जिंकतो. जीवनात आलेलं अपयश मोठ्या ताकदीने पचवणारी माणसचं भविष्यात कर्तृत्ववान होऊ शकतात. म्हणून यशाबरोबरच आपण अपयश पचवायला शिकले पाहिजे. ध्येयपूर्तीसाठी एक दिवसही वाया न घालवता तुम्ही प्रयत्नशील असले पाहिजे तरच यश हे तुमच्या पुढ्यात उभं राहू शकते.असा मौलिक सल्ला दिला.

देगलूरचे प्रसिद्ध शल्यचिकित्सक व सोमेय मुंडे यांचे वडील डॉ. विनायक मुंडे यांनी संस्थेबद्दल गौरवोद्गार काढून भारतीय शिक्षण प्रसारक संस्था गुणवत्तेचे शिखर पदाक्रांत करीत असल्याचा आनंद व्यक्त करून विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या.तर अध्यक्षीय समारोपात डॉ. सुरेंद्र आलूरकर यांनी विद्यार्थ्यांना संबोधित करताना म्हणाले की, विद्यार्थ्यांनी अभ्यासक्रमाचे नियोजन करून त्यात सातत्य ठेवले पाहिजे. विद्यार्थ्यांच्या यशाबरोबरच पालक व शिक्षकांचेही कष्ट महत्वपूर्ण ठरतात आणि त्यामुळेच आपल्या सगळ्यांच्या प्रयत्नातून संस्थेचा नावलौकिक वाढतो. ही आमच्यासाठी अभिमानास्पद बाब असून विद्यार्थ्यांनी समाजासाठी राष्ट्रासाठी सामाजिक भान जपलं पाहिजे. असे सांगितले.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बालाजी पडलवार, प्रीती शेंडे तर प्रास्ताविक मुख्याध्यापक संजय कुलकर्णी आभार उपमुख्याध्यापक ज्ञानेश मातेकर यांनी मानले. कार्यक्रमाची सांगता जान्हवी देशमुख यांच्या कल्याण मंत्राने झाली. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी लालबहादूर शैक्षणिक संकुलातील सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# निर्गुण निराकाराशी नात जोडणारी भा.शि.प्र.ही विवेकशील संस्था-बाळराजे दादा पवार

**तभा वृत्तसेवा**
**गेवराई दि.२८ जून**



भारतीय शिक्षण प्रसारक संस्था अंबाजोगाई संचलित श्री चिंतेश्वर प्राथमिक व माध्यमिक विद्यालय,गेवराई येथे आज भा. शि.प्र.संस्था वर्धापन दिन व गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव सोहळा संपन्न झाला या प्रसंगी व्यासपीठावर कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून स्थानिक समन्वय समिती अध्यक्ष तथा श्री चिंतेश्वर संस्थान चे मठाधिपती श्री. मसाननाथ महाराज, प्रमुख उपस्थिती म्हणून बाळराजे दादा पवार, सौ.गीताभाभी बाळराजे पवार,भा.शि.प्र.संस्था कार्यवाह हेमंतजी वैद्य स्थानिक उपाध्यक्ष राधेश्यामजी झंवर, कार्यवाह दत्ताजी पत्की, शालेय शिक्षण समिती अध्यक्ष अक्षयजी कुलकर्णी,शिशुवाटिका प्रमुख श्रीमती धनश्री ताई पत्की यांची व्यासपीठावर उपस्थिती होती. प्रतिमा पूजन व दीपप्रज्वलनाने कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.शालेय विद्यार्थ्यांसाठी शालेय वाहन व शुद्ध पिण्याच्या पाण्याचे व्यवस्थेचे उद्घाटन प्रसंगी मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.संस्थेच्या वाटचालीचा आढावा घेणारे मा.कार्यवाहांच्या संकल्पनेतून साकार झालेल्या ध्येय पथ... या पुस्तिकेचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये शालांत प्रमाणपत्र परीक्षेत विशेष प्राविण्यासह उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार व गुणगौरव प्रसंगी करण्यात आला. दत्ताजी पत्की यांनी पंचप्रण या विषयी माहिती सांगत ते अंगीकृत करण्याची अपेक्षा व्यक्त केली.संस्थेच्या ७४ वर्षाचा इतिहासाचा मागोवा घेत पूर्व परिस्थितीतील काही प्रसंग मा.संस्था कार्यवाह हेमंतजी वैद्य यांनी सांगत त्या प्रसंगातून शिक्षक व विद्यार्थांनी प्रेरणा घ्यावी असे प्रतिपादन केले व संस्था ७५ व्या वर्षात (अमृत महोत्सवी वर्षात) पदार्पण करत असल्याचे सांगितले, बाळराजे दादा पवार यांनी अज्ञानाचा शोध घेणारी संस्था असे गौरवद्गार काढत भा.शि.प्र.संस्था निसर्गाशी नाती जोडणारी आहे असे सांगितले. अध्यक्षीय समारोप करतांना ह.भ.प.मसाननाथ महाराज यांनी संस्थेच्या वाटचालीस शुभेच्छा देत संस्था भारतीयत्वाचा ठसा समाजात उमटवणारी ठरो ही ईच्छा व्यक्त केली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक प्रदीप जोशी,पद्य गायन चंद्रकांत घोलप,सुत्रसंचलन श्रीमती नम्रता कुलकर्णी तर,आभार प्रदर्शन माध्यमिक विभागाचे मुख्याध्यापक अमोल गोरकर यांनी केले.या कार्यक्रमास तालुक्यातही विविध श्रेणी निहाय पदाधिकारी, स्थानिक समन्वय समितीचे सभासद,सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी, पालक उपस्थित होते.